


जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
✦ अमरावती, शुक्रवार २३ ऑक्टोबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

# एकाच मोबाइल क्रमांकावरून तब्बल २२ हजार मतदारांची नोंद...!

## काँग्रेसचा खळबळजनक आरोप, मोबाइल नंबरही एआय जनरेटेड?

**नागपूर/ प्रतिनिधी-** नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पूर्वसंध्येला काँग्रेसने मतदार यादीतील घोळावर बोट ठेवले आहे. तब्बल २० ते २२ हजार मतदारांची नोंदणी एकाच बोगस मोबाइलवरून करण्यात आल्याचा खळबळजनक आरोप काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केला. या संपूर्ण घोळाची तक्रार मुख्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयुक्त तसेच नागपूरच्या विभागीय आयुक्तांना ई-मेल पाठवून अधिकृतपणे करण्यात आली आहे. अतुल लोंढे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, एकाच मोबाइल नंबरचा (उदा. ५४३२१५४३२१) वापर करून तब्बल २० ते २२ हजार मतदारांची नोंदणी करण्यात आली आहे. हा नंबर एआय जनरेटेड किंवा काल्पनिक असल्यासारखा आहे. या सिरीजचा कोणताही प्रत्यक्ष फोन नंबर अस्तित्वात नाही, त्यामुळे हा नंबर नेमका कुणाचा पत्ता लागत नाही. या सर्वांनी आधार कार्ड कुठले जोडले आहेत, यांच्या कागदपत्रांची पडताळणी केली का, या मतदारांना मतदान का करू देण्यात यावे? असे प्रश्न लोंढे यांनी उपस्थित केले. एका मोबाइल नंबरवर एवढ्या नोंदी कशा झाल्या, असा सवाल करीत निवडणूक आयोग भाजपला निवडणुकीत जिंकवण्यासाठी काम करत असून हा एकप्रकारे निवडणुकीत 'फिक्सिंग' करण्याचा प्रकार असल्याचा आरोपही त्यांनी केला.



**बोगस मतदारांना पकडून पोलिसात देणार-** दरम्यान, बोगस मतदान रोखण्यासाठी काँग्रेस पक्षाने आपली चोख यंत्रणा सज्ज ठेवली असून, कोणी दुबार किंवा बोगस मतदान करताना आढळल्यास आमचे कार्यकर्ते कायदेशीर व कडक कारवाई करायला तयार आहेत. संबंधितांना पकडून पोलीसांच्या स्वाधीन केले जाईल, असा इशारा अतुल लोंढे यांनी दिला. भाजपचे हे गैरप्रकार जनता व मतदार उघड्या डोळ्यांनी पाहत असून निवडणुकीत त्यांना योग्य उत्तर देईल, असेही लोंढे म्हणाले.

**८ हजार ७४४ मतदारांच्या दुबार नोंदी-** मतदार यादीत ८ हजार ७४४ मतदारांच्या दुबार नोंदी आहेत. हे मतदार दुबार नोंदींचा गैरवापर करून एकाच व्यक्तीला एकापेक्षा अधिक वेळा मतदान करण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी निवडणूक यंत्रणेने खबरदारी घ्यावी, अशी मागणी लोंढे यांनी केली. मतदान केंद्रातील काँग्रेस पक्षाच्या प्रतिनिधीनींकडे दुबार मतदारांची यादी असेल. एका केंद्रावर मतदान झाले की ते सर्व केंद्रांवरील प्रतिनिधींना अलर्ट करतील. त्यामुळे कुणी दुबार मतदानाचा प्रयत्न केला तर त्यांना रंगेहाथ पकडू, असा इशाराही काँग्रेसने दिला आहे.

## महाराष्ट्रात सामायिक सातबारा जमिनीच्या विक्रीचे नियम बदलले

**मुंबई / प्रतिनिधी-** सामायिक सातबारा उता-यावर नोंद असलेल्या जमिनींच्या खरेदी-विक्री व्यवहारांमध्ये पारदर्शकता वाढवण्यासाठी आणि सहहिस्सेदारांची फसवणूक रोखण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडून महत्त्वाची पावले उचलण्यात आले आहे. सामायिक मालमत्तेच्या विक्री व्यवहारात संबंधित सहहिस्सेदारांची संमती आणि आवश्यक कागदपत्रांची पडताळणी यांना महत्त्व देण्यात येणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून जमिनींच्या व्यवहारांमधील अनियमितता रोखण्यावर भर दिला जात आहे.



### सामायिक सातबारा उता-यावरील जमीन विकण्यासाठी संमती आवश्यक

ग्रामीण भागात अनेकदा एकाच सातबारा उता-यावर अनेक व्यक्तींची नावे असतात. वारसाहक्काने मिळालेली जमीन, कुटुंबाची सामायिक मालमत्ता किंवा अद्याप अधिकृत वाटणी न झालेली जमीन अशा प्रकारांत ही परिस्थिती दिसून येते. अशा जमिनींच्या खरेदी-विक्रीच्या वेळी संबंधित व्यक्तींचे हक्क, प्रत्यक्ष हिस्सा आणि उपलब्ध महसुली नोंदी तपासणे महत्त्वाचे ठरते. काही प्रकरणांमध्ये सहहिस्सेदारांना विश्वासात न घेता किंवा त्यांच्या हक्कांबाबत स्पष्टता नसताना व्यवहार करण्याचे प्रयत्न होऊ शकतात. त्यामुळे भविष्यात मालकी हक्कावरून वाद निर्माण होणे, न्यायालयीन लढाईला सामोरे जाणे किंवा आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते. ही जोखीम कमी करण्यासाठी व्यवहारापूर्वी ➩(पान २ वर)

## पदवीधरच्या मतदानाच्या पूर्वसंध्येला कराळे मास्तरांची राष्ट्रवादी काँग्रेसमधून सहा वर्षांसाठी हकालपट्टी

**नागपूर/ प्रतिनिधी-** नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अभिजीत वंजारी यांच्या विरोधात उमेदवारी कायम ठेवणारे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे वर्ध्यातील नितेश कराळे यांची पक्षातून सहा वर्षांसाठी हकालपट्टी करण्यात आली आहे. पक्षशिस्तीचे उल्लंघन आणि महाविकास आघाडीच्या निर्णयाविरोधात भूमिका घेतल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाची जागा महाविकास आघाडीत काँग्रेसच्या वाट्याला गेली आहे. या मतदारसंघातून काँग्रेसचे अभिजीत वंजारी निवडणूक लढवत आहेत. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे नितेश कराळे यांनीही उमेदवारी अर्ज कायम ठेवल्याने आघाडीच्या अधिकृत उमेदवारासमोर आव्हान निर्माण झाले आहे. पक्षाच्या धोरणानुसार आघाडीच्या उमेदवाराला पाठिंबा देणे अपेक्षित असताना कराळे यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. ➩(पान २ वर)



## पदवीधर मतदारांना मतदानासाठी चार तासांची सवलत

**चंद्रपूर :** नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी शुक्रवारी, २३ ऑक्टोबर रोजी मतदान होत असून, चंद्रपूर जिल्ह्यातील ३२ हजार २६२ पदवीधर मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. जिल्ह्यात ५८ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली असून, मतदानाची प्रक्रिया सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत पार पडणार आहे. खासगी आस्थापनांमधील पदवीधर मतदारांना मतदान करता यावे, यासाठी दोनऐवजी चार तासांची विशेष सवलत देण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.या जिल्ह्यात २० हजार ९०५ पुरुष, तर ११ हजार ३५७ महिला मतदारांची नोंद आहे. मतदान केंद्रापर्यंत पोहोचण्यासाठी लागणारा वेळ लक्षात घेऊन खासगी आस्थापनांतील कर्मचाऱ्यांना मतदानासाठी पुरेसा अवधी मिळावा, यासाठी या सवलतीची व्यापक प्रसिद्धी करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.जिल्ह्यातील ५८ मतदान केंद्रांचे नियंत्रण नऊ क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आले आहे. ब्रह्मपुरी उपविभागात सर्वाधिक ११ मतदान केंद्रे असून, वरोरा येथे नऊ, चंद्रपूर येथे आठ, मूल येथे सात, तर चिमूर, बल्लारपूर आणि राजुरा येथे प्रत्येकी सहा केंद्रे आहेत. कोरपना येथे पाच मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. जिल्ह्यात संवेदनशील किंवा अतिसंवेदनशील मतदान केंद्रांची नोंद नसल्याचे निवडणूक आढाव्यात नमूद आहे.



**मतदान यंत्रणा सज्ज-** मतदान सुरळीत पार पाडण्यासाठी ५८ केंद्राध्यक्ष आणि १७४ मतदान अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय सात केंद्राध्यक्ष आणि २१ मतदान अधिकारी राखीव ठेवण्यात आले आहेत. मतदान साहित्याचे वाटप, मतपेट्यांची व्यवस्था आणि वाहतुकीचे नियोजन पूर्ण करण्यात आले आहे. एकूण १३६ मतपेट्यांची व्यवस्था करण्यात आली असून, मतदान पथकांच्या वाहतुकीसाठी मिनी बस आणि जीप तैनात करण्यात आल्या आहेत. दरम्यान, आचारसंहितेच्या अंमलबजावणीदरम्यान १७ ऑक्टोबरपर्यंत सार्वजनिक ठिकाणांच्या विद्रूपीकरणाच्या १,०६४ बाबींवर कारवाई करण्यात आली आहे. या कालावधीत गुन्हे किंवा तक्रारींची नोंद नसल्याचे निवडणूक आढावा टिप्पणीमध्ये नमूद आहे.

## तक्रार केल्यास जरांगे यांच्या आरोपांची चौकशी



**नागपूर :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी सकाळी पत्रकार परिषद घेऊन खळबळजनक ऑडिओ क्लिप ऐकवली. या ऑडिओ क्लिपमध्ये शिंदेंच्या शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्फत मनोज जरांगेंना ५०० कोटी रुपये पोहोचवल्याचा उल्लेख आहे. तसेच भाजपकडून षडयंत्र रचले जात असल्याचा दावा देखील मनोज जरांगेंनी केला आहे. या ऑडिओ क्लिपमध्ये तीन ते चार व्यक्तिचे संभाषण असून यावर मंत्रीमंडळातील एका मंत्र्यांने प्रतिक्रिया व्यक्त करीत तक्रार आल्यास चौकशी केली जाईल, असे नमुद केले. मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज देशाचे राजकारण हादरवूनस सोडणाऱ्या ध्वनिफित पत्रकार परिषदेत ऐकवल्या. त्यानंतर त्यांनी त्यातील संवादावर आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाश शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी या ध्वनिफितीतील संवादाचा छडा लावला पाहिजे, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. यावर आता राज्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

## पत्रकार परिषदेत जरांगेंनी ऑडिओ क्लिप ऐकवत उडवून दिली खळबळ

**छ. संभाजीनगर / प्रतिनिधी-** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी नारायणगडावरील दसरा मेळाव्यातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर गंभीर आरोप केले होते. शिंदे यांनी भाजपकडून माझ्या नावाने ५०० कोटी रुपये घेतलेत अशी भाजपात कुचबूज सुरू असल्याचा दावा जरांगे यांनी केला होता. मनोज जरांगेंच्या दाव्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जरांगे यांनी पुरावे द्यावेत, असे आव्हान दिले होते. त्यानंतर आज जरांगे पाटील यांनी पुरावे देण्यासाठी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी मराठा समाजासाठी लढणा-या लोकांना त्रास दिला जात असल्याचा आरोप केला.



तीन वर्षापासून माझ्याविरोधात षढयंत्र सुरू असल्याचेही पाटील यावेळी म्हणाले. माझ्याबाबत हे शत्रू आणि दुष्मनासारखे का वागत आहेत. मी तुमच्यासाठी लढत आहे. शिंदे साहेबांनी काल सांगितले की मी कोणाकडून पैसे घेतले नाहीत आणि दिले नाहीत. मग हे इतक्या भयंकर स्वरूपाचे षडयंत्र का रचले जात आहे. त्याचा शोध पंतप्रधान आणि मुख्यमंत्री तसंच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केलं.

दरम्यान, यावेळी पत्रकार परिषदेत जरांगे पाटील यांनी एक ऑडिओ क्लिप ऐकवली. ही क्लिक राज्याला हादरवून सोडणारी असल्याचंही ते म्हणाले. आणि या प्रकरणात शिंदे आणि फडणवीस साहेबांनी स्वत: लक्ष घालावं असं आवाहनही त्यांनी यावेळी केले.या क्लिपमध्ये दोन व्यक्तींमध्ये चर्चा सुरू आहे. त्याच्यातील एक जण म्हणतो की, त्याच्याविरोधात (मनोज जरांगेंच्या) मराठवाड्यातील लोकं बोलायला तयार आहेत ना. आपण फक्त म्हणतोय की, त्याला हा पैसे देतोय तो देतोय, शरद पवार पैसे देतायत, असा आरोप करून आपण मोकळे होतो. त्याच्या विरोधातल्या चार जणांना आपण का पैसे द्यायचे नाहीत. आपल्याकडे पैसे नाहीत की काय? मी एकाची दरेकरांना भेट घालून दिली आहे, असा गंभीर दावा या क्लिपमधील व्यक्तीने केला आहे. ➩(पान २ वर)

## पदवीधर शिक्षक निवडणूक विशेष नैमित्तिक रजा परिपत्रक

**वर्धा :** पदवीधर व शिक्षक मतदारसंघात उद्या म्हणजेच २३ ऑक्टोबर रोजी निवडणूक होत आहे. यात मतदान करण्यासाठी सुट्टी दिल्या जाते. पण सरसकट नाहीच. मात्र काही शाळांनी या दिवशी सुट्टी जाहीर करून टाकली. म्हणजे शाळा पूर्णपणे बंद. सर्व शिक्षक मतदार आहेत कां, अशी शंका उपस्थित झाली. त्यामुळे ➩(पान २ वर)

## आमदार बच्चू कडूंविरोधात गुन्हा

**चंद्रपूर/ प्रतिनिधी-** राजकीय वर्तुळातून एक मोठी बातमी समोर आली आहे. शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि आमदार बच्चू कडू यांच्यासह सहा जणांविरोधात गुन्हा दाखल झाला. विनापरवानगी पायदळ मार्च काढल्याप्रकरणी आणि प्रक्षोभक वक्तव्यांचा ठपका ठेवत त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांनी तहसीलदारांना पुलाखाली फेकण्याची देखील धमकी दिली होती. या प्रकरणी आता त्यांच्याविरोधात कारवाई करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, चंद्रपुरातील स्थानिक भूमिपुत्रांना वेकोलिमध्ये (कोळसा खाणीतील) ८० टक्के नोक-यांमध्ये प्राधान्य देण्यासह विविध मागण्यांसाठी आमदार बच्चू कडू यांच्या अध्यक्षतेखाली मोर्चा काढण्यात आला होता. विनापरवानगी पायदळ मार्च काढणे, बेकायदेशीर जमाव जमविणे तसेच भाषणातून पोलिसांना शिवीगाळ आणि तहसीलदारांना पुलाखाली फेकण्याची धमकी दिल्याच्या आरोप बच्चू कडू यांच्यावर करण्यात आला.या प्रकरणी पोलिसांनी त्यांच्याविरोधात कारवाई केली. बच्चू कडू यांच्यासह



६ जणांविरोधात घुग्घूस पोलिसांनी गुन्हा दाखल केला. या सर्वांविरोधात बीएनएस २०२३ मधील कलम १९०, १९१(२) २९६, २२३, २२४, ३५१ (२) तसंच महाराष्ट्र पोलिस अधिनियम, १९५१ च्या कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.आमदार बच्चू कडू यांच्यासह शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा संघटक मुकेश जिवतोडे, रोशन राजाराम हरबडे, अमोल नथ्थूजी मांढरे, नथ्थू भाऊराव नवले आणि सतीश बीडकर यांच्याविरुद्ध हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.






# विजयाच्या दिशेने किरणराव सरनाईक यांची घोडदौड

**अमरावती/प्रतिनिधीः-**

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार किरणराव सरनाईक यांच्या प्रचाराने आता वेग घेतला असून, विभागातील पाच जिल्हे आणि ५६ तालुक्यांमध्ये प्रचाराची जोरदार मोहीम राबविण्यात येत आहे. मागील सहा वर्षांत शिक्षकांच्या प्रश्नांसाठी केलेल्या कामाचा लेखाजोखा मांडणारा कार्यअहवाल घेऊन कार्यकर्ते थेट शिक्षकांच्या घरापर्यंत पोहोचत आहेत. त्यामुळे सरनाईक यांच्या प्रचाराला व्यापक स्वरूप प्राप्त होत असून, त्यांच्या विजयाच्या दृष्टीने समर्थकांकडून अनुकूल वातावरण असल्याचा दावा केला जात आहे.

आमदार किरणराव सरनाईक यांच्या मागील सहा वर्षांतील कामांची माहिती शिक्षक मतदारांपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. सुमारे ३६ हजार शिक्षक मतदारांशी प्रत्यक्ष संपर्क

## -पाच जिल्हे, ५६ तालुक्यांत वेगवान प्रचार

साधण्यावर भर देण्यात येत असून, प्रत्येक मतदारापर्यंत वारंवार पोहोचण्याची रणनीती आखण्यात आली आहे. शिक्षकांच्या प्रश्नांवर विधान परिषदेत आवाज उठविण्यापासून ते रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यापर्यंतच्या त्यांच्या कार्याची माहिती प्रचारादरम्यान दिली जात आहे.

**शिक्षकांच्या प्रश्नांवरील कामांचा प्रचारात ठळक उल्लेख**-शिक्षकांच्या प्रश्नांवर विधान परिषदेत सर्वाधिक प्रश्न उपस्थित केल्याचा दावा प्रचारात केला जात आहे. टप्पा अनुदानाचा लाभ मिळवून देण्यासाठी केलेले प्रयत्न, शिक्षण सेवकांच्या मानधनवाढीसाठीचा पाठपुरावा, नोकरभरती प्रक्रियेला चालना, वरिष्ठ व निवडश्रेणी

## -सहा वर्षांच्या कार्यअहवालाच्या माध्यमातून शिक्षकांपर्यंत पोहोचण्यावर भर

प्रशिक्षणाचा प्रश्न तसेच विविध शैक्षणिक संस्थांच्या समस्यांवर केलेले काम हे प्रचाराचे प्रमुख मुद्दे ठरत आहेत.

कॉन्व्हेंट शाळा, वरिष्ठ महाविद्यालये, आश्रमशाळा, पॉलिटेक्निक आणि आयटीआय महाविद्यालयांशी संबंधित प्रश्नांवरही सरनाईक यांनी मागील सहा वर्षांत पाठपुरावा केल्याचे कार्यकर्त्यांकडून सांगण्यात येत आहे. शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांसाठी विधिमंडळापासून रस्त्यावरील आंदोलनांपर्यंत सक्रिय सहभाग घेतल्याचा मुद्दाही मतदारांपर्यंत पोहोचविला जात आहे.

**महायुतीच्या नेत्यांची प्रचाराला साथ-** सरनाईक यांच्या प्रचारासाठी महायुतीतील विविध नेते, मंत्री, आमदार आणि



पदाधिकारी सक्रिय असल्याचे चित्र आहे. चंद्रशेखर बावनकुळे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दिपक सावंत, संजय गायकवाड, संजय कुटे, रवी राणा, सुलभाताई खोडके, संजय खोडके, भावना गवळी, सईद खान, संजय राठोड, बच्चू कडू, प्रतापराव जाधव, श्वेताताई महाले आणि शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्यासह

## -महायुतीचे नेते, शिक्षक संघटना आणि कार्यकर्ते प्रचारात सक्रिय

महायुतीतील विविध नेत्यांच्या सहभागामुळे प्रचाराला राजकीय बळ मिळत असल्याचे समर्थकांचे म्हणणे आहे. महायुतीचे जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष आणि शिवसैनिकही प्रचाराची धुरा सांभाळत आहेत.

**शिक्षक संघटनेच्या प्रचारसभांना प्रतिसाद-**

अमरावती विभागीय शिक्षक संघाचे पदाधिकारी, तालुका कार्यकारिणी आणि कार्यकर्तेही प्रचारात सक्रिय झाले आहेत. तालुकानिहाय सभा, शिक्षकांशी वैयक्तिक संपर्क आणि मागील कार्यकाळातील कामांचा आढावा यांद्वारे मतदारांच्या घरापर्यंत पोहोचले आहे. या प्रचारसभांना चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे संघटनेच्या कार्यकर्त्यांकडून सांगण्यात येत आहे.

राज्य आणि केंद्रात महायुतीचे सरकार असल्याने शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी सरकारशी समन्वय साधता येईल, असा विश्वासही समर्थक व्यक्त करीत आहेत. मागील सहा वर्षांतील कामांचा लेखाजोखा, शिक्षकांच्या प्रश्नांवरील भूमिका आणि व्यापक प्रचारयंत्रणा या मुद्द्यांवर सरनाईक यांच्या विजयाचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

एकीकडे महायुतीच्या नेत्यांची ताकद, तर दुसरीकडे शिक्षक संघटनेचे संघटनात्मक जाळे आणि कार्यकर्त्यांचा थेट जनसंपर्क, अशा तिहेरी रणनीतीतून किरणराव सरनाईक यांनी प्रचारात आघाडी घेतली हे ठामपणे सांगता येते. किरणराव सरनाईक यांचे अभ्यासू नेतृत्व,प्रश्न सोवडण्याची हातोटी, जन संपर्क इत्यादीमुळे त्यांचा विजय निश्चित मानला जातो आहे.

लागत आहे. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने जमीन तुकडेबंदी व तुकडेजोड अधिनियमातील सुधारणा व त्याअनुषंगाने महसुली नोंदी अद्ययावत करण्याचे पत्र दिनांक ०८/१२/२०२५ रोजी तसेच दिनांक ०३ नोव्हेंबर २०२५ रोजी संबंधित अध्यादेश जारी केला आहे. सदर शासनपत्रामध्ये नमूद केलेल्या लागू तरतुदींनुसार संबंधित अटी व निकष पूर्ण करणाऱ्या जमिनींच्या हस्तांतरणाचे नियमीतीकरण आणि अधिकार अभिलेखातील नोंदी अद्ययावत करण्याबाबत कार्यवाही होणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे विठ्ठल नगर, प्रभाग क्र. ०४ मधील संबंधित भूखंडाची कागदपत्रे व कायदेशीर स्थिती तपासून शासनाच्या लागू तरतुदींनुसार पात्र प्रकरणांमध्ये आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

सदर विषय हा विठ्ठल नगर, प्रभाग क्र. ०४ मधील नागरिकांच्या मालमत्तेच्या नोंदी आणि घरकुलाच्या लाभाशी संबंधित असल्याने अत्यंत महत्वाचा आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या लागू कायदे, अध्यादेश, शासन निर्णय व मार्गदर्शक सूचनांनुसार या प्रकरणाचा सहानुभूतीपूर्वक लवकरात लवकर निपटारा करण्यात यावा, अशी नम्र विनंती अन्सारी यांनी केली आहे.या निवेदनाच्या प्रती पालकमंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे, खासदार बळवंत वानखडे, आमदार गजानन लवटे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, उपविभागीय अधिकारी वैष्णवी वावस्कर व तहसीलदार पुष्पा सोळंके (दाभेराव) यांना पाठविण्यात आल्या आहेत.

### चिखलदऱ्यातील टाऊन

अनेक आदिवासी मजूरही रोजगारासाठी याच मार्गाने पायी मरियमपूरला जातात. अशा परिस्थितीत, वन्यजीवांच्या हालचालींमुळे लोकांच्या सुरक्षेबद्दल प्रश्न निर्माण झाले आहेत. या मार्गाच्या काही भागांवर पुरेशा प्रकाश व्यवस्थेअभावी रात्रीच्या वेळी धोका वाढू शकतो. विद्यार्थी, मजूर आणि इतर नागरिकांची सकाळ-संध्याकाळची मोठी वर्दळ लक्षात घेता, प्रशासनाने ठोस सुरक्षा उपाययोजना करणे आवश्यक आहे.

### वडाळीत गावठी दारू हातभट्टीवर

७५ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी नंदा देविदास भारद्वाज (वय ५०, रा. परिहारपुरा, वडाळी) या महिलेविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी घटनास्थळी तपासणी केली असता, संबंधित महिला हातभट्टीवर गावठी दारू तयार करताना आढळून आल्याचे नमूद आहे. पथकाने घटनास्थळावरून ७५ लिटर तयार गावठी दारू, १५० लिटर मोहमास आणि इतर साहित्य जप्त केले. जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत ७५ हजार ७५० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (क), ६५ (फ) आणि ६५ (ड) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर आणि पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक महेश इंगोले, पोलीस उपनिरीक्षक गजानन सोनुने तसेच पोलीस अंमलदार सुनील लासुरकर, दीपक सुंदरकर, गजानन ठेवले, आस्तिक देशमुख, मनोज ठोसर, मंगेश परिमल, सचिन बहाळे, जहीर शेख, मिर्झा नईम बेग, अतुल संभे, विकास गुडधे, विशाल वाकपांजर, योगेश पवार, राजीक रायलीवाले, चेतन गुल्हाणे, चालक संदीप खंडारे आणि राहुल दुधे यांनी केली.

### कॅन्सर जनजागृती अभियान

प्रज्ञा चिंगुरूपति, डॉ. भरत वसानी, डॉ. मनिष माथनकर,चौथे सेशन मध्ये डॉ. शलाका जोशी, डॉ. अरोरा, डॉ. रोहित मुंधडा, डॉ. अरुंधती लोटे, डॉ. मंगेश पाटील, डॉ. शंतनु पेंडसे, डॉ. आदित्य भागवत, पाचवे सेशन डॉ. दिपेंद्र सरकार,अखेरचे सेशन मध्ये डॉ. वैशाली जमरे, डॉ. अमित भांगडिया, डॉ. संदीप बिपटे, डॉ. अनंत पोरे, डॉ. अभिनव देशपांडे यांचे व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. मुरलीधर बुब, सचिव डॉ. कौस्तुभ सारडा, डॉ. योगेश गोडे, डॉ. राजेंद्र गनेडिवाल, डॉ. जयश्री इंगोले,डॉ. राजेंद्रसिंग अरोरा, डॉ. आशिष डगवार आदि प्रयत्न करत आहे. या पत्रकार परिषदेला डॉ. मुरलीधर बुब, डॉ. राजेंद्र गनेडीवाल, डॉ. कौस्तुभ सारडा, डॉ. जयश्री इंगोले उपस्थित होते.

तसेच २५ ऑक्टोबर रोजु संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत जाहीर चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये तज्ज्ञ डॉक्टर स्तन कर्करोगाबाबत असलेल्या शंका आणि गैरसमजांचे समाधान करणार आहेत.

या कार्यक्रमात स्तन कर्करोगावर यशस्वी मात केलेल्या महिलांचा सत्कार करण्यात येणार आहे. तसेच दोन महिला व कर्करोग विजेत्या आपले अनुभव व्यक्त करतील.

### बडनेरा झिरी मंदिरातून चांदीचा

गाभाऱ्यात असलेल्या हनुमानजीच्या मूर्तीवरील चांदीचा एक किलो आणि दोन किलोचा मुकुट, २ चांदीचे छत्र, १ चांदीची गदा, चांदीचा हार, खडावा आणि 'श्रीराम' लिहिलेली चांदीची पाटी असा लाखो रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.एवढ्यावरच न थांबता चोरट्यांनी मंदिराबाहेर असलेली मुख्य दानपेटी फोडून त्यातील सुमारे २० हजार रुपये रोख रक्कमही लंपास केली.आज सकाळी मंदिराचे पुजारी सुरज पांडे हे नेहमी प्रमाणे पूजा करण्या साठी मंदिरात आले असता त्यांना चोरीचा प्रकार लक्षात आला. त्यांनी तात्काळ मंदिर संचालक आनंद श्रीराम अग्रवाल (वय ४४, मारवाडीपुरा, बडनेरा) यांना माहिती दिली. अग्रवाल यांनी बडनेरा पोलिसांना सुचित केले.माहिती मिळताच बडनेरा पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. मंदिर परिसरातील ठसे आणि इतर पुरावे गोळा करण्यात आले आहेत.सीसीटीव्ही बंद असला तरी आजूबाजूच्या परिसरातील कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले जात आहे. सध्या आरोपी फरार असून, त्यांना लवकरात लवकर पकडणे हे बडनेरा पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### पदवीधरच्या मतदानाच्या पूर्वसंध्येला

शरद पवारांच्या पाठिंब्याबाबत संभ्रम

कराळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली होती. या भेटीदरम्यान पवार यांनी नागपूर विभागाची जागा महाविकास आघाडीत काँग्रेसला मिळाल्याचे स्पष्ट केले होते. तरीही कराळे यांनी उमेदवारी अर्ज कायम ठेवल्याने पक्षाच्या भूमिकेच्या विरोधात जाण्याचा प्रकार घडल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसकडून सांगण्यात आले. तसेच, शरद पवार यांचा आपल्याला पाठिंबा असल्याचा संभ्रम मतदारांमध्ये निर्माण केला जात असल्याचा आरोपही पक्षाने केला आहे.

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि गोंदिया या सहा जिल्ह्यांचा समावेश होतो. मागील निवडणुकीतही कराळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्या वेळी ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नव्हते. त्यांना पाच हजारांहून अधिक मते मिळाली होती. यंदाही त्यांनी उमेदवारी कायम ठेवल्याने महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवाराच्या मतविभाजनावर त्याचा कितपत परिणाम होतो, याकडे राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे.

### पत्रकार परिषदेत जरांगेंनी

तसेच यावेळी तो पुढचा माणूस ठीक आहे मी बघतो मी प्रयत्न करतो असे म्हणत आहे. दरम्यान, यावेळी त्याला नाही आवरलं तर तो तुम्हाला मराठवाड्यात गिळेल असंही या क्लिपमध्ये एकजण म्हणत आहे. या क्लिपमध्ये या दोन्ही लोकांमध्ये आणखी अनेक मुद्यांवर गंभीर चर्चा सुरू असल्याचे दिसत आहे. शिवाय लोकल मिडिया कसं मॅनेज करायचे याबाबतही चर्चा करत आहेत.

### पदवीधर शिक्षक निवडणूक

शाळा बंद कशाला असा सवाल शिक्षण वर्तुळत उपस्थित झाला. त्याची दखल घेत आज विशेष पत्र प्रकाशित करण्यात आले आहे.

**विशेष नैमित्तीक रजा-**महाराष्ट्र राज्यातील ३ पदवीधर आणि २ शिक्षक मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी शुक्रवारी, २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर, मतदारांना आपला मतदानाचा हक्क सुलभतेने बजावता यावा यासाठी संबंधित अधिकारी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना 'विशेष नैमित्तिक रजा' (एजर्मेंट ऐर्ल्ट थैन) मंजूर करण्यात आली आहे. यासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण संचालनालयाने २२ ऑक्टोबर २०२६ रोजी अधिकृत परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांच्या स्वाक्षरीने हे परिपत्रक जारी करण्यात आले असून, सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) आणि शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम) यांना याबाबतच्या आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

### महाराष्ट्रात सामायिक सातबारा

आवश्यक कागदपत्रे आणि संबंधितांची संमती तपासण्यावर भर दिला जात आहे. सामायिक सातबारा असलेल्या जमिनीच्या विक्री व्यवहारात संबंधित सहहिस्सेदारांचे ना हरकत प्रमाणपत्र अर्थात ठडउ आवश्यक असल्याची तरतूद या निर्णयाच्या माहितीत नमूद करण्यात आली आहे. त्यामुळे व्यवहार करणा-या व्यक्तीला जमिनीवरील स्वत:च्या हक्कापुरतीच विक्री करता येते की संपूर्ण मालमत्तेच्या व्यवहारासाठी इतरांचीही संमती आवश्यक आहे, हे स्पष्ट करण्यास मदत होईल. सहहिस्सेदारांची संमती आणि हक्कांची पडताळणी झाल्यास एका व्यक्तीने संपूर्ण जमिनीवर स्वत:चा अधिकार असल्याचे भासवून व्यवहार करण्याची शक्यता कमी होऊ शकते. मात्र, कोणत्या प्रकारच्या व्यवहारासाठी किती सहहिस्सेदारांची संमती आवश्यक असेल, हे लागू कायदे, मालकीची स्थिती आणि शासनाच्या अधिकृत आदेशातील अटींनुसार ठरेल.

सामायिक मालमत्तेच्या व्यवहारात आवश्यक संमती, परवानग्या किंवा इतर बंधनकारक कागदपत्रे उपलब्ध नसल्यास दस्त नोंदणी रोखण्याची भूमिका या निर्णयाच्या माहितीत स्पष्ट करण्यात आली आहे. यामुळे केवळ व्यवहार करणा-या व्यक्तीच्या दाव्यावर अवलंबून न राहता संबंधित कागदपत्रांची तपासणी करण्याला महत्त्व मिळणार आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून जमिनींच्या व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणणे, बेकायदेशीर किंवा अनियमित व्यवहारांना आळा घालणे आणि नागरिकांचे मालमत्तेवरील हक्क सुरक्षित ठेवणे यावर भर दिला जात आहे. जमिनीच्या व्यवहारात फसवणूक झाल्यानंतर नागरिकांना महसूल कार्यालये आणि न्यायालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, यासाठी व्यवहाराच्या सुरुवातीलाच कागदपत्रांची पडताळणी महत्त्वाची ठरणार आहे. सामायिक सातबारा असलेल्या जमिनींच्या विक्री व्यवहारात सहहिस्सेदारांची संमती, भूमिअभिलेखाची पडताळणी आणि वैध कागदपत्रांची पूर्तता यांना महत्त्व दिल्यास जमीन व्यवहार अधिक सुरक्षित आणि पारदर्शक होण्यास मदत होऊ शकते.

### आज शिक्षक आमदारांच्या

विजयासाठी महायुतीचे नेते कामाला लागले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री उदय सामंत, मंत्री संजय राठोड यांच्यासह महायुतीतील घटक पक्षांचे स्थानिक नेते प्रचारात सक्रिय राहिले. मात्र, शिक्षक मतदार आमदार सरनाईक यांच्याकडून गेल्या सहा वर्षांतील कामांचा हिशोब मागत आहेत. मागील निवडणुकीचा अनुभव पाहता सरनाईक अजूनही शर्यतीत टिकून असून, त्यांची खरी लढत आदिती पोहरे यांच्याशीच मानली जात आहे.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे बुलढाणा येथील उमेदवार दत्तात्रय लहाने यांनीही या निवडणुकीत आपली मजबूत पकड निर्माण केली आहे. प्रचारात त्यांनी घेतलेली आघाडी पाहता ते कडवी टक्कर देत आहेत. शिक्षक मतदार त्यांना पहिल्या व दुसऱ्या पसंतीचे हक्काचे उमेदवार मानत आहेत. बुलढाण्याव्यतिरिक्त यवतमाळ जिल्ह्यातही त्यांचे मोठे समर्थक आहेत.

या सर्वांमध्ये डॉ. प्रशांत विघे यांनीही निवडणुकीत रंगत आणली आहे. शिक्षक मतदारांनी स्वतः वर्गणी गोळा करून त्यांच्या प्रचाराला वेग दिला. या निवडणुकीच्या इतिहासात उमेदवारासाठी शिक्षकांनी वर्गणी गोळा करण्याची ही कदाचित पहिलीच वेळ ठरली आहे. युनायटेड रिपब्लिकन फोरमनेही त्यांना उघड पाठिंबा दिला आहे. शिक्षक भारतीचे अधिकृत उमेदवार सुरेश देवकर यांनीही प्रचारात आपले अस्तित्व टिकवून ठेवले आहे.

या निवडणुकीत जरी २६ उमेदवार रिंगणात असले, तरी मुख्य लढत या पाच प्रमुख उमेदवारांमध्येच मानली जात आहे. पक्षाशी बंडखोरी करणाऱ्या उमेदवारांना चांगलाच धडा शिकवण्याच्या मनस्थितीत शिक्षक मतदार दिसत आहेत. पहिल्या पसंतीतून विजयाचा कोटा पूर्ण करणे कोणत्याही उमेदवारासाठी कठीण असल्याने, विजयाचे अंतिम समीकरण दुसऱ्या पसंतीच्या मतांवरच ठरणार आहे. सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत मतदान पार पडेल.

### कट्टर वैरी रवी राणा - बच्चू कडू एकत्र

यामुळे अनेक चर्चा रंगू लागल्या आहेत. विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीचा जाहीर प्रचार संपला असला, तरी गोपनीय बैठका सुरू आहेत. महायुती तर्फे शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार आणि विद्यमान आमदार किरण सरनाईक हे निवडणूक रिंगणात आहेत. ही निवडणूक महायुतीसाठी प्रतिष्ठेची मानली जात आहे. किरण सरनाईक यांच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वत: अमरावतीत येऊन सभा घेतली. दरम्यान, आज येथील श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळात आमदार बच्चू कडू आणि रवी राणा यांनी एकत्र येऊन चर्चा केली. यावेळी भाजपचे कार्यकर्ते देखील उपस्थित होते. जिल्ह्याच्या राजकारणात दोघे कट्टर शत्रू मानले जातात. त्यांची ही भूमिका चर्चेचा विषय ठरली आहे. राज्यात सध्या विधान परिषद निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. पाच जागांसाठी निवडणूक होणार आहे. यामध्ये अमरावती शिक्षक मतदारसंघ, पुणे शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघ, नागपूर पदवीधर मतदारसंघ आणि मराठवाडा पदवीधर मतदारसंघ या पाच जागांचा समावेश आहे. २३ ऑक्टेबर रोजी या निवडणुकीसाठी मतदान होणार आहे, तर २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे. मात्र त्यापूर्वीच म्हणजे मतदानाच्या एक दिवस आधीच दोन राजकीय कट्टर विरोधक एकत्र आले आहेत. त्यांच्यामध्ये गुप्त बैठक देखील झाली आहे. या बातमीमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे. या बैठकीमुळे आता अमरावती शिक्षक मतदारसंघात राजकीय समीकरण बदलणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. हा महाविकास आघाडीसाठी मोठा धक्का ठरण्याची शक्यता आहे.

महायुतीमध्ये अमरावती शिक्षक मतदारसंघ हा शिवसेना शिंदे गटाच्या वाट्याला गेला आहे. या मतदार संघामधून शिवसेना शिंदे गटाने विद्यमान आमदार किरण सरनाईक यांनाच उमेदवारी दिली आहे. तर दुसरीकडे या एकाच मतदारसंघात महाविकास आघाडीचे दोन उमेदवार निवडणूक लढवत आहेत. काँग्रेसच्या वतीने आदिती पोहेरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर शिवसेना ठाकरे गटाकडून दत्तात्रय लहाने हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

या निवडणुकीत महायुतीचाच विजय होईल, असा विश्वास बच्चू कडू यांनी व्यक्त केला. बंडखोरीचा फटका बसणार नाही, उलट अनेक वेळा पसंतीक्रमाच्या मतदानामुळे फायदा देखील होऊ शकतो, असे बच्चू कडू यांचे म्हणणे आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रवीण पोटे, आमदार रवी राणा आणि आपण महायुती म्हणून एकत्र आलो आहोत, असे कडू यांनी सांगितले. रवी राणा म्हणाले, ही निवडणूक अत्यंत महत्वाची आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे लक्ष ठेवून आहेत. सरकार मध्ये असलेला महायुतीचा उमेदवार निवडून आला, तर शिक्षकांचे सर्व प्रश्न सुटू शकतात, असा विश्वास शिक्षकांना आहे.

### टाटा मिनी बस चोरीचा छडा

चोरून नेल्याची तक्रार गाडगेनगर पोलीस ठाण्यात देण्यात आली. त्यावरून अप. क्र. १११७/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०५(ब) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला. गुन्हा दाखल होताच वरिष्ठांच्या निर्देशानुसार गाडगेनगर पोलिसांच्या डी.बी. पथकाने तपास सुरू केला.

दरम्यान, पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून चांदूर बाजार येथील टोम्पे नगर परिसरातील गोविंद प्रभू मंगल कार्यालयाच्या बाजूच्या पार्किंगमध्ये संबंधित मिनी बस उभी असल्याचे समजले. त्यानुसार पोलिसांनी मध्यरात्रीच्या सुमारास तेथे धाव घेत बस जप्त केली. या प्रकरणात तेजस साहेबराव बाहेकर (वय २७, रा. संभाजीनगर, चांदूर बाजार) याच्याकडून पोलिसांनी चोरीची मिनी बस जप्त केली. तपासादरम्यान साहेबराव लक्ष्मणराव बाहेकर (वय ५८, रा. चांदूर बाजार) आणि त्यांच्यासोबत असलेल्या एका महिलेचाही या गुन्ह्यात सहभाग असल्याची माहिती समोर आली आहे. जुन्या अपूर्ण व्यवहाराच्या कारणावरून आरोपींनी हा प्रकार केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणाचा पुढील तपास गाडगेनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार भारत वानखडे करीत आहेत.

### आधी पत्नीची मग मित्राची हत्या

माहितीनुसार, आरोपी रफीउल्ला खान याची पत्नी नसरीन बानो रफीउल्ला खान पठाण (वय ४८) यांचा राहत्या घरी कौटुंबिक वादातून दुपट्ट्याच्या साहाय्याने गळा आवळून खून करण्यात आल्याची तक्रार पोलिसांना प्राप्त झाली होती. तक्रारीवरून २२ ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटे ३.०६ वाजता गाडगेनगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१) अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. अत्यंत शिताफीने तपास करीत आरोपीला ताब्यात घेतले.

आरोपी रफीउल्ला पठाण याला आज दुपारी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी (पीसीआर) मंजूर केल्यानंतर, चौकशीदरम्यान आरोपीने एक मोठा खुलासा केला. त्याने सांगितले की, त्याने आपला मित्र मन्नान उर्फ चाऊस याला सोबत परसोडाच्या जंगलात नेले आणि तिथे त्याचा गळा आवळून खून केला, तसेच त्याचा मृतदेह जंगलात फेकून दिला.

आरोपीच्या या कबुलीजबाबानांतर गाडगे नगर पोलीस आणि क्राईम ब्रँचच्या पथकाने तात्काळ परसोडाच्या जंगलात जाऊन शोधमोहीम राबवली व मन्नानचा मृतदेह हस्तगत केला. याप्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहेत.

या दोन्ही हत्यांमागील नेमके कारण काय? पत्नी आणि मित्र यांच्यातील परस्पर संबंध काय होते? यामागे इतर काही आर्थिक वा वैयक्तिक वाद आहे का? या सर्व प्रश्नांचा उलगडा आता पोलिसांच्या पुढील तपासातूनच होणार आहे. सध्या गाडगे नगर पोलीस आणि गुन्हे शाखा या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

### फटाके फोडण्यास विरोध केल्याने

फटाके फोडू नका, त्रास होत आहे,' असे सांगत विरोध दर्शवला. या क्षुल्लक कारणावरून संतप्त झालेल्या सात आरोपींनी संगनमत करून सचिन रवाळे यांच्यावर लोखंडी पाईप आणि लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण करण्यास सुरुवात केली.

मुलाला वाचवण्यासाठी सचिन यांचे वडील सुधाकर रवाळे हे बाहेर आले व 'माझ्या मुलाला मारू नका' अशी विनवणी करू लागले. मात्र, आरोपींनी कोणतीही दयामया न दाखवता वृद्ध सुधाकर रवाळे यांनाही लोखंडी पाईप व लाथाबुक्क्यांनी अमानुष मारहाण केली.हल्ल्यात दोघेही रक्ताच्या थारोळ्यात पडल्याने त्यांना तातडीने प्रथम ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, दोघांचीही प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती येथे रेफर करण्यात आले आहे. फिर्यादी सचिन रवाळे यांच्या तक्रारीवरून चांदूरबाजारचे ठाणेदार आधारसिंह सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील यश रवाळे, वंश रवाळे, चेतन रवाळे, अविनाश रवाळे, नंदू उर्फ नरेश राजेश रवाळे व राजेश रवाळे यांच्यापैकी ५ आरोपींना पोलिसांनी तत्परतेने अटक केली असून न्यायालयाने त्यांना २३ तारखेपर्यंत पोलीस कस्टडी रिमांड सुनावली आहे.

या घटनेचा पुढील तपास एपीआय प्रेम कुमार केदार, दिनेश राठोड व सुरेश पोटे करत आहेत.

### प्रभाग क्र.४ मधील गुंठेवारी भूखंडांचे

उतारे, फेरफार नोंदी तसेच इतर महसुली अभिलेखांमध्ये संबंधित नागरिकांना त्यांच्या भूखंडांच्या महसुली नोंदी अद्ययावत करून मालकी हक्कासंबंधी आवश्यक अभिलेख तसेच घरकुलासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यात अडचणींचा सामना करावा

प्रो.क्र.८४३/२०२६

**वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस**

**मा.विजय जी. परवरे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्रमांक ३२३/२०२६ ने.ता.१६.११.२०२६

अर्जदार :
1) **Amar Shrikrushna Pathare,** Age 52 yrs., Occu.- Agriculture, R/o. Anchalwadi, Tq. Bhatkuli, Dist. Amravati
2) **Satish Shrikrushna Pathare,** Age 50 yrs., Occu.- Agriculture, R/o. Anchalwadi, Tq. Bhatkuli, Dist. Amravati
3) **Aruna Gajananrao Kadu,** Age 59 yrs., Occu.- Household W/o. Gajananrao Vinayakrao Kadu, All R/o. Advi. Post. Khalkoni, Tq. Bhatkuli, Dist. Amravati- 444602
4) **Rajendra Ashokrao Kadu,** Age 57 yrs., Occu.- Household R/o. At Post.Bopapur, Tq. Achalpur, Dist. Amravati- 444806

-- विरुध्द --

गैरअर्जदारः- **Nil**

ज्यापेक्षा **Shrikrushna Shankarrao Pathare** हे दि.१०.०५.२०१८ रोजी मयत झाले.आणि **Indubai Shrikrushna Pathare** हे दि.०३.०३.२०२३ रोजी मयत झाले.अर्जदार Amar Shrikrushna Pathare, Age 52 yrs. Occu- Agriculture,R/o. Anchalwadi, Tq. Bhatkuli, Dist. Amravati व इतर यांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि.२८.०९.२०२६ रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **Shrikrushna Shankarrao Pathare** व **Indubai Shrikrushna Pathare** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **Shrikrushna Shankarrao Pathare** व **Indubai Shrikrushna Pathare** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ३०.०९.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर)
भातकुली,दि.३०.०९.२०२६

**सायटेशन/जाहीरनामा**

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.६४१/२०२६ ने.ता.२८.१०.२०२६

अर्जदार -
१. **श्री सागर भाष्करराव राऊत,** वय ४४ वर्षे, धंदा - शेती
२. **श्री. जगदिश भाष्कर राऊत,** वय ४३ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा. नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदारांचे आजोबा नामे मोतीराम नागोजी राऊत हे **दिनांक १३/०१/१९९२** रोजी त्यांचे राहते घरी **Nerpinglai , Tq. Morshi, Dist. Amravati** येथे मय्यत झालेले आहे. तसेच अर्जदारांचे वडिल भाष्कर मोतीरामजी राऊत हे दिनांक ०४/११/२०२५ रोजी त्यांचे राहते घरी **Nerpinglai , Tq. Morshi, Dist. Amravati** येथे मरण पावलेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- ०७/१०/२०२६**

शिक्का

**आदेशानुसार,**
(सहाय्यक अधीक्षक)
**दिवाणी न्यायालय, मोर्शी**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ शुक्रवार, २३ ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# नवदुर्गा विर्सजन मिरवणूकीवर दगड फेक

## चार जणासह इतरांवर गुन्हे दाखल

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव शहरात नवरात्रोत्सवानिमित्त निघालेल्या नवदुर्गा विसर्जन मिरवणुकीदरम्यान टीपू सुलतान चौकात अचानक दगडफेक झाल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले २१ ऑक्टोबर रोजी रात्री नवदुर्गा विसर्जन मिरवणूक सुरू असताना कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग इंगळे यांच्यासह पोलीस बंदोबस्त तैनात होता रात्री साडेआठ ते नऊच्या सुमारास तीन नवदुर्गा मंडळांच्या मिरवणुका शांततेत पार पडल्यानंतर जनता नवदुर्गा मंडळाची मिरवणूक टीपू सुलतान चौकात आली

यावेळी मंडळाच्या कार्यकर्त्यांकडून गुलाल उधळला जात असताना अचानक दगडफेक सुरू झाल्याने मिरवणुकीत



काही काळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली दगडफेकीत काही वाहनांचे नुकसान झाल्याची माहिती आहे

घटना घडताच पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत अतिरिक्त बंदोबस्त मागविला वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली

पोलिसांच्या चौकशीत सैयद नदीम सैयद युसुफ , सैयद रफीक सैयद युसुफ ,सैयद सुलतान , जब्बार शहा सर्व रा टीपू सुलतान चौक मालेगाव यांच्यासह इतर साथीदारांनी गैरकायद्याची मंडळी जमवून दगडफेक केल्याचे समोर आले. या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग इंगळे यांच्या फिर्यादीवरून मालेगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १८९ (२) १२५ ३२४ (४ )३०० तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेश खेरडे करीत आहेत

# मायक्रो फायनान्स वसुलीला वर्षभर स्थगिती द्या!

## परमेश्वर अंभोरे यांचा आक्रमक पवित्रा ; आज पासून उपोषणास बसणार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील शेतकरी व शेतमजुरांना आर्थिक संकटातून दिलासा देण्यासाठी मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या कर्जवसुलीला एक वर्षाची स्थगिती द्यावी, या कालावधीतील व्याज माफ करावे, शेतमजुरांना प्रत्येकी २५ हजार रुपयांची आर्थिक मदत द्यावी, तसेच सिंचनासाठी पाणी उपसण्यावरील बंदी उठवून तोडलेली वीजजोडणी पूर्ववत करावी, अशा प्रमुख मागण्या सत्यमेवे जयते फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष परमेश्वर अंभोरे यांनी केल्या आहेत. या मागण्यांसाठी त्यांनी २३ ऑक्टोबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. यासंदर्भात २१ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

जिल्ह्यातील शेतकरी आणि शेतमजूर नैसर्गिक संकटे, शेतीतील नुकसान व आर्थिक



अडचणींमुळे त्रस्त आहेत. सोयाबीन आणि तूर पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली असून, कर्जाचे हप्ते भरणेही कठीण झाले आहे. त्यामुळे मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या कर्जवसुलीला वर्षभर स्थगिती देऊन व्याजमाफी द्यावी, अशी मागणी अंभोरे यांनी केली आहे.

शेतकऱ्यांची वीजजोडणी पूर्ववत करा

सिंचनासाठी पाणी उपसण्यावरील बंदी उठवून तोडलेली वीजजोडणी तातडीने सुरू करावी, तसेच जप्त केलेले शेतीपंप परत द्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली. सिंचनाअभावी हळदीचे पीक धोक्यात येण्याची शक्यता असून, शेतकऱ्यांना पिके वाचविण्यासाठी तातडीने सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

शेतमजुरांना प्रत्येकी २५ हजार रुपयांची आर्थिक मदत देऊन कर्जावरील व्याजाचा भार शासनाने उचलावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. यासोबतच जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागांची बैठक घेऊन शेतकरी व शेतमजुरांच्या समस्यांवर संयुक्त कृती आराखडा तयार करण्याचे आवाहन त्यांनी केले.

या मागण्यांची तातडीने दखल घेऊन दिलासा न दिल्यास आज शुक्रवार, २३ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजल्यापासून जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे आमरण उपोषण सुरू करणार असल्याचे परमेश्वर अंभोरे यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता जिल्हा प्रशासन या मागण्यांवर काय निर्णय घेते, याकडे लक्ष लागले आहे.

# चौकशी न झाल्यास २ नोव्हेंबरपासून उपोषणाचा इशारा!



**मानोरा :** मानोरा शहरातील तहसील कार्यालय परिसरात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने महसूल विभागाच्या बैठकीसाठी बांधलेल्या प्रशस्त सभागृहाच्या भिंती तडे जाऊन इमारतीला गळती लागली आहे. मात्र, वारंवार निकृष्ट दर्जाच्या कामाची तक्रार करूनही चौकशी होत नसल्याने आता दि. २ नोव्हेंबरपर्यंत सखोल चौकशी करून न्याय न दिल्यास उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग मानोरा यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याच्या इशाऱ्याचे निवेदन जिल्हाधिकारी यांना सामाजिक कार्यकर्ता युवराज रंगराव राठोड यांनी पाठविले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, मानोरा तहसील कार्यालय परिसरात बांधलेल्या सभागृहाच्या (ईमारत) सभोवती भेगा पडल्या असून आत बसलेल्या टाईल्सच्या फरशा उखडल्या आहेत. निकृष्ठ दर्जाचे करण्यात आलेल्या सदर इमारतीला पावसाळ्यात गळती लागते, त्यामुळे वर्षभरातच डागडुजी करण्याची आवश्यकता वाटत आहे. यावरून या वास्तू बांधकामाचा दर्जा किती निकृष्ट असेल हे लक्षात येत आहे. या वास्तूची गुणवत्ता नियंत्रण विभागामार्फत चौकशीसाठी दि. ६ ऑगस्ट व दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजी दिलेल्या निवेदनावर आज पावेतो कुठल्याही प्रकारची कार्यवाही झाल्याचे दिसत नाही. तेव्हा प्रशासनास या निवेदनाद्वारे अंतिम सूचना देण्यात येत आहे की, येत्या आठ दिवसात सदर कामांची गुण नियंत्रण विभागामार्फत चौकशी न केल्यास दिनांक २ नोव्हेंबर २०२६ रोजी, सोमवारला पासून उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मानोरा यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबून यातील गैरप्रकाराचा भांडाफोड करण्यात येईल. तसेच सदर प्रकरणाची गंभीर दखल घेऊन तात्काळ चौकशी करून झालेल्या भ्रष्टाचाराची रक्कम संबंधित विभाग व ठेकेदाराकडून वसूल करण्यात यावी.

# प्रगतशील शेतकरी सुभाष वडेकर यांचा 'विदर्भ भूषण' पुरस्काराने सहपत्नीक सन्मान

## शेतीतील नाविन्यपूर्ण प्रयोग, नैसर्गिक शेतीची गौरवपूर्ण दखल

■ प्रतिनिधी | कारंजा ■



कारंजा शहरालगतच्या धानोरा (ताथोड) येथील प्रगतशील शेतकरी सुभाष वडेकर यांनी कृषी क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य, नाविन्यपूर्ण प्रयोग तसेच सामाजिक व पर्यावरणीय क्षेत्रातील योगदानाची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय 'विदर्भ भूषण' पुरस्काराने सहपत्नीक सन्मानित करण्यात आले. कृषी क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या या सन्मानामुळे धानोरा (ताथोड) परिसरासह शेतकरी वर्गातून आनंद व्यक्त होत आहे.

सुभाष वडेकर हे शेतीकडे केवळ पारंपरिक व्यवसाय म्हणून न पाहता, आधुनिक तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण प्रयोग आणि बहुविध पीक पद्धतींच्या माध्यमातून उत्पन्नवाढीच्या संधी शोधणारे प्रगतशील शेतकरी म्हणून परिचित आहेत. शेतीत विविध प्रयोग करून त्यातून मिळालेले अनुभव आणि ज्ञान परिसरातील इतर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असतात. शेतकऱ्यांनी बदलत्या काळानुसार शेतीत नवनवीन पद्धतींचा अवलंब करावा आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, हा त्यांचा दृष्टिकोन आहे.

शेतीसोबतच सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी समाजसेवेलाही महत्त्व दिले आहे. सामाजिक कार्य आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रातील त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते. कृषी क्षेत्रातील अनुभवाचा उपयोग इतर शेतकऱ्यांना व्हावा, या भावनेतून ते सातत्याने मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या याच कृषिनिष्ठ कार्याची आणि सामाजिक योगदानाची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कृषिभूषण महाराष्ट्र एम्प्लॉई स्टार्टअप फेडरेशनच्या वतीने आयोजित 'महाराष्ट्र ॲग्रोस्टार बोर्ड २०२६' या कार्यक्रमात हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सोहळ्यात आरोग्य व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे, श्री भूषण निकम, कृषिभूषण महाराष्ट्र एम्प्लॉई स्टार्टअप फेडरेशनचे चेअरमन तसेच ॲग्रोकेअर कृषिमंच, नाशिकचे संचालक रोहित पाटील यांच्या हस्ते सुभाष वडेकर यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाला शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. ललितदादा बहाळे आणि कृषी संचालक श्री. कैलास मोरे यांच्यासह कृषी क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. नैसर्गिक शेती, कृषी क्षेत्रातील योगदान आणि समाजाभिमुख कार्याची दखल घेऊन वडेकर यांचा करण्यात आलेला हा सन्मान त्यांच्या कार्याला नवी प्रेरणा देणारा ठरणार आहे.

# तोंडगाव, विळेगाव येथे क्षयरोग, एड्स तपासणी शिबिर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यात क्षयरोग निर्मूलनाच्या दृष्टीने आरोग्य विभागाच्या वतीने २२ ऑक्टोबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र तोंडगाव तसेच आरोग्य उपकेंद्र केकतमरा अंतर्गत विळेगाव येथे क्षयरोग व एड्स तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात हॅन्ड हेल्ड एक्स-रे मशीनद्वारे एकूण १७२ संशयितांची क्ष-किरण तपासणी करण्यात आली, तर ४१ संशयितांच्या थुंकीचे नमुने संकलित करण्यात आले.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ठोंबरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कावरखे, जिल्हा क्षयरोग अधिकारी



डॉ. सतीश परभणकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. चापे, वैद्यकीय अधिकारी डॉ. मोनाली इंगोले व डॉ. राधेश्याम वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली तोंडगाव येथील शिबिराचे नियोजन जिल्हा क्षयरोग केंद्राचे आरोग्य निरीक्षक रामदास गवई यांनी केले. यावेळी क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी सतीश सैबेवार यांनी हॅन्ड हेल्ड एक्स-रे मशीनद्वारे १०६ संशयितांची तपासणी केली, तर १५ संशयितांचे थुंकीचे नमुने संकलित करण्यात आले. तसेच, आरोग्य उपकेंद्र केकतमरा अंतर्गत विळेगाव येथे समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. मयूर भगत, लक्ष्मण लोमटे, मनीष जाधव व आशा कार्यकर्त्यांच्या सहकार्याने टेक्निशियन कार्तिक शिरसाट यांनी ६६ संशयितांची एक्स-रे तपासणी केली. २६ संशयितांचे थुंकीचे नमुने संकलित करण्यात आले.

# महामानव संस्थेच्या वतीने धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा

## बुद्धवंदना, प्रबोधनपर मार्गदर्शनासह गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

■ प्रतिनिधी | वाशिम ■

येथील मधुबन पार्क परिसरात महामानव संस्थेच्या वतीने धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात आणि मंगलमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला संस्थेच्या अध्यक्षा श्रद्धाताई गवई, प्रमुख सदस्या शारदाताई ताजने आणि प्रमुख अतिथी श्रीराम गवई यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध आणि भारतीय



राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सामूहिक बुद्धवंदना घेण्यात आली. या सोहळ्यात संस्थेचे पदाधिकारी, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा श्रद्धाताई गवई यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक धम्मदीक्षेचे महत्त्व विशद करत समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले. प्रमुख अतिथी श्रीराम गवई यांनी जागतिक शांतता आणि मानवी कल्याणासाठी भगवान गौतम बुद्ध यांच्या विचारांची आजच्या काळात अधिक गरज असल्याचे प्रतिपादन केले. तर शारदाताई ताजने यांनी संस्थेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधून संस्थेच्या वतीने गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

# अनसींग येथे पारंपरिक एकतारी भजनाने नवरात्रोत्सवात रंगत

■ प्रतिनिधी | वाशिम ■

नवरात्र श्री दुर्गामाता उत्सवानिमित्त अनसींग येथे पारंपरिक एकतारी भजनाचा सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कारप्राप्त महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण कला क्रीडा व आरोग्य बहुउद्देशीय संस्था, उमरा शम, ता. जि. वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या विनामूल्य कार्यक्रमात नागनाथ एकतारी भजन मंडळ, अनसींगच्या कलावंतांनी सांप्रदायिक भजनगायन सादर करून उपस्थितांची मने जिंकली. पारंपरिक भजनांच्या सादरीकरणामुळे नवरात्रोत्सवात सांस्कृतिक रंगत निर्माण झाली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात शाहीर संतोष खडसे यांनी एकतारी भजन या पारंपरिक ग्रामीण लोककलेचे महत्त्व विशद केले. एकतारी भजन ही ग्रामीण भागातील समृद्ध सांस्कृतिक परंपरा असून, काळाच्या ओघात या कलेचे सादरीकरण करणाऱ्या कलावंतांची संख्या कमी होत आहे. त्यामुळे ही लोककला लोप पावण्याच्या मार्गावर आहे. अशा पारंपरिक कलांचे जतन व संवर्धन करण्यासाठी कलावंतांनी आपली कला नव्या पिढीपर्यंत पोहोचवावी, तसेच या कलांना सातत्याने व्यासपीठ मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

# रिसोड शहरात दुर्गा विसर्जन उत्साहात भक्तिमय वातावरणात मिरवणुकीची सांगता!

■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड शहरात दुर्गा विसर्जन मिरवणूक मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडली. दुर्गा मातेच्या जयघोषाने शहरातील प्रमुख मार्ग दुमदुमून गेले. विविध दुर्गा मंडळांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विसर्जन मिरवणुकीत भाविकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.मिरवणुकीदरम्यान टाळ-मृदंगाचा निनाद, भक्तिगीतांचा गजर आणि डीजेच्या तालावर दुर्गाभक्तांनी उत्साह व्यक्त केला. महिलांनीही मिरवणुकीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. ठिकठिकाणी भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.शहरातील प्रमुख मार्गावरून विविध दुर्गा मंडळांच्या देवीच्या मूर्ती विसर्जनासाठी नेण्यात आल्या. मंडळांकडून साकारण्यात आलेले विविध प्रकारचे आकर्षक देखावे नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरले. सजावट, रोषणाई आणि



भक्तिमय जयघोषामुळे संपूर्ण शहरात उत्सवाचे वातावरण पाहायला मिळाले.'जय माता दी' आणि 'दुर्गा मातेचा विजय असो' अशा जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला. नवरात्रोत्सवाच्या उत्साहपूर्ण वातावरणानंतर दुर्गा विसर्जन मिरवणुकीतून भक्ती, उत्साह आणि एकतेचे दर्शन घडले. शहरात सर्वत्र भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. दुर्गा विसर्जन मिरवणुकी दरम्यान कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनात नेतृत्वात रिसोड शहरांमध्ये विविध ठिकाणी पोलिसांचा तगडा बंदोबस्त करण्यात आला होता.

रिसोड शहरातील नवरंग दुर्गा उत्सव मंडळाकडून सिविल लाइन येथील कालुशा बाबा दर्गा येथे फुलाची चादर अर्पण करण्यात आली. नवरंग दुर्गा उत्सव मंडळाच्या मिरवणुकीची सुरुवात माहेश्वरी भवन येथून झाली. सदर मिरवणूक जेव्हा सिव्हिल लाईन येथून जात असताना कालुशा बाबा दर्गा येथे नवरंग दुर्गा उत्सव मंडळाचे अध्यक्ष नितीन निर्बाण व त्यांचे सहकाऱ्यांनी सदर चादर चढवली. यावेळी या ठिकाणी प्रार्थना सुद्धा करण्यात आली.

# मानोरा तहसीलच्या सभागृहाला गळती !

## दुरुस्ती करून चौकशी न झाल्यास २ नोव्हेंबरला आमरण उपोषण

■ प्रतिनिधी | मानोरा ■

मानोरा शहरातील तहसील कार्यालय परिसरात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने महसूल विभागाच्या बैठकीसाठी बांधलेल्या प्रशस्त सभागृहाच्या भिंती तडे जाऊन इमारतीला गळती लागल्याने डागडुजी करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, वारंवार तक्रार करूनही दर्जाची चौकशी होत नसल्याने आता दि. २ नोव्हेंबर पासून आमरण उपोषण करण्याच्या इशाऱ्याचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते युवराज रंगराव राठोड यांच्याकडे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, मानोरा तहसील कार्यालय परिसरात बांधलेल्या सभागृहाच्या (ईमारत) सभोवती भेगा



पडल्या असून आत बसलेल्या टाईल्सच्या फरशा उखडल्या जात असल्याने सदर इमारतीला पावसाळ्यात गळती लागते, त्यामुळे वर्षभरातच डागडुजी करण्याची आवश्यकता आहे. यावरून या वास्तू बांधकामाचा दर्जा किती निकृष्ट असेल हे लक्षात येत आहे. या वास्तूची गुणवत्ता नियंत्रण विभागामार्फत चौकशीसाठी दि. ६ ऑगस्ट व दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजी दिलेल्या निवेदनावर आज पावेतो कुठल्याही प्रकारची कार्यवाही झाल्याचे दिसत नाही. तेव्हा प्रशासनास या निवेदनाद्वारे अंतिम सूचना देण्यात येत आहे की, येत्या आठ दिवसात सदर कामांची गुण नियंत्रण विभागामार्फत चौकशी न केल्यास दिनांक २ नोव्हेंबर २०२६ रोजी, सोमवारला उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मानोरा यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबून यातील गैरप्रकाराचा भांडाफोड करण्यात येईल. तसेच सदर प्रकरणाची गंभीर दखल घेऊन तात्काळ चौकशी करून झालेल्या भ्रष्टाचाराची रक्कम संबंधित विभाग व ठेकेदाराकडून वसूल करण्यात यावी व दोषी अधिकारी, कर्मचारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करत कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्यात यावे, अन्यथा होणाऱ्या परिणामास प्रशासन जबाबदार राहील, असेही नमूद करण्यात आले आहे.

**MAHILA UTKARSHA PRATISHTHAN'S**
**COLLEGE OF PHARMACY (B. PHARM)**
**(DTE code - 1270)**
Pundlik Nagar, Degaon Tq. Risod, Dist. Washim Pin Code. 444506

ADMISSION NOTICE
**B. Pharm I st year**
Application are invited from eligible candidates for admission to B. Pharm I st year for Institute level & Seats likely to be remained vacant after completion of Centralized Admission Process (CAP)
**ELIGIBILITY**
HSC passed students with 50% Marks PCB/PCM group for OPEN category and 45% Marks PCB/PCM group for reserved category, Appeared in MHT-CET 2026
**ADMISSION SCHEDULE**
Sale & Receipt of admission form for Institute Level and seats likely to be remain vacant after completion of CAP round from **29/09/2026 to 24/10/2026 up to 04:00 pm**
**Admission Schedule for seats likely to be remained Vacant after CAP round**
6) Invite Application from Registered Candidates : 25/10/2026
7) Display of Provisional Merit list : 26/10/2026 at 11:30 Am.
8) Grievance Redressed if any : 26/10/2026 up to 04:00 pm.
9) Display of Final Merit List : 26/10/2026 at 05:30 pm.
10) Admission Reporting : 27/10/2026 to 28/10/2026 up to 05:30 pm.
Detail admission schedule will be displayed on college notice board. The student advised to see the college notice board time to time for further schedule or for change if any.
**For Application form, Prospectus and for more details contact college office between 10:30 am to 05:30 pm**
Contact number **:- 8329912938/7083931098**
**Principal**

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३२५ ■ शुक्रवार, २३ ऑक्टोबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## जिल्ह्यात २१ हजार ७४२ पदवीधर बजावणार मदानाचा हक्क

### आज नागपूर पदवीधर मतदारसंघाची निवडणूक

**वर्धा जनमाध्यम :** नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी दि.२३ ऑक्टोंबर रोजी जिल्ह्यातील ४१ मतदान केंद्रावर मतदान होणार असून सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजता पर्यंत मतदारांना मतदान करता येणार आहे. जिल्ह्यातील २१ हजार ७४२ पदवीधर मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहे. मतदारांनी मतदानाचा हक्क बजावून लोकशाही मजबूत करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन सहाय्यक निवडणूक नि णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी केले आहे.

पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी जिल्ह्यातील ४१ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. मतदान केंद्रांमध्ये आष्टी येथे २ मतदान केंद्र, कारंजा ३, आर्वी ६, आंजी मोठी १, सेलू २, सिंदी रेल्वे १, सेवाग्राम १, वर्धा ११, पुलगाव २, देवळी २, समुद्रपूर २ व हिंगणघाट येथे ८ मतदान केंद्रांचा समावेश आहे. मतदान प्रक्रिया

मतदानासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी रवाना



सुरळीत पार पाडण्यासाठी मतदान केंद्रनिहाय मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, झोनल अधिकारी, मायक्रो ऑब्झर्व्हर अशा २५० च्यावर अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून मतदान शांततेत व सुरक्षित पार पाडण्यासाठी आवश्यक त्या प्रमाणात पोलिस अधिकारी व पोलिस शिपाई यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या मतदान केंद्रावर जिल्ह्यातील २१ हजार ७४२ पदवीधर मतदानाचा हक्क बजावणार आहे. यामध्ये १३ हजार ९९ पुरुष मतदार, ८ हजार ६४३ महिला मतदार असे एकुण २१ हजार ७४२ मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावणार आहे.

निवडणूकच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनानेही आवश्यक तयारी केली आहे. मतदान केंद्रांवर शांतता व सुव्यवस्था राखणे, मतदारांना निर्भय वातावरण उपलब्ध करुन देणे आणि निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडणे, यासाठी पोलिस यंत्रणा सतर्क राहणार आहे. मतदानासाठी प्रशासनाने पुर्ण तयारी केली असून मतदानाची प्रक्रिया सुरळीत पार पाडण्याच्यादृष्टीने यंत्रणा सज्ज आहे.

---

अवघ्या १७ व्या वर्षी जीवन संपविले

## सार्थकच्या आत्महत्येने विरूळ आकाजीत हळहळ

### आत्महत्येमागील कारण गुलदस्त्यात; गावात चर्चांना उधाण

**विरूळ आकाजी जनमाध्यम :** वय अवघे १७ वर्षे. आयुष्याची सुरुवात होण्यापूर्वीच एका तरुणाने टोकाचे पाऊल उचलल्याने विरूळ आकाजी गावात हळहळ व्यक्त होत आहे. येथील भवानी वॉर्डातील सार्थक किसना मोहेकर याने गुरुवारी, २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली.

या घटनेची माहिती समोर येताच परिसरात शोककळा पसरली. अल्पवयातच सार्थकने जीवन संपविल्याने त्याच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मात्र, सार्थकने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल का उचलले, असा प्रश्न गावकऱ्यांना पडला आहे. त्याच्या या निर्णयामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

या घटनेमुळे तरुणांच्या मनातील प्रश्न, तणाव आणि त्यांच्या भावनिक स्थितीकडे लक्ष देण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास पुलगाव पोलीस करीत आहेत.

---

## आकोलीत चोरीचा डाव उधळला, दोन महिलांसह तिघांना ग्रामस्थांनी पकडले

### दिवसभर गावात रेकी, मध्यरात्री चोरीचा प्रयत्न; सेलू पोलिसांनी तिघांना घेतले ताब्यात

**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील आकोली येथे चोरीच्या संशयावरून दोन महिलांसह तिघांना ग्रामस्थांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केल्याची घटना मध्यरात्री घडली. संशयित तिघे दिवसभर इलेक्ट्रिक ऑटो रिक्षाने गावात फिरत असल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले होते. त्यानंतर रात्री साडेबारा वाजताच्या सुमारास चोरीचा प्रयत्न होत असल्याचे लक्षात येताच ग्रामस्थांनी एकत्र येऊन तिघांना पकडले. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, दोन महिला आणि एक पुरुष इलेक्ट्रिक ऑटो रिक्षाने आकोली गावात आले होते. दिवसभर गावातील विविध भागांत फिरून त्यांनी परिसराची रेकी केल्याचा संशय ग्रामस्थांना आला. त्यांच्या हालचालींवर ग्रामस्थ लक्ष ठेवून होते. दरम्यान, मध्यरात्री साडेबारा वाजताच्या सुमारास स्थानिक परिसरात चोरीचा प्रयत्न होत असल्याचे लक्षात येताच ग्रामस्थांनी तिघांना पकडले.

त्यानंतर संतप्त ग्रामस्थांनी तिघांना मारहाण केल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच सेलू पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांनी तिन्ही संशयितांना ताब्यात घेतले असून, पुढील तपास सुरू केला आहे.

पकडण्यात आलेले तिघे नेमके कोणत्या उद्देशाने गावात आले होते, त्यांचा यापूर्वीच्या चोरीच्या घटनांशी काही संबंध आहे का आणि या प्रकरणात आणखी कोणी सहभागी आहे का, याचा तपास पोलीस करीत आहेत. तपासानंतरच या प्रकरणातील अधिक माहिती स्पष्ट होणार आहे.

गावकऱ्यांच्या सतर्कतेमुळे चोरीचा प्रयत्न उघडकीस आला असला, तरी संशयितांना पकडल्यानंतर कायदा हातात न घेता त्यांना पोलिसांच्या स्वाधीन करणे आवश्यक आहे.

---

## दुसऱ्याही दिवशी एसटीत वादाचा भडका, विद्यार्थिनीला वाहकाची शिवीगाळ

### चिल्लरच्या वादातून बसस्थानकात गोंधळ; एसटी कर्मचाऱ्यांच्या वर्तनावर प्रवाशांचे प्रश्नचिन्ह

**वर्धा जनमाध्यम :** एसटी बसमधील वाहक आणि प्रवाशांमधील वादाचे सत्र थांबण्याचे नाव घेत नसल्याचे चित्र आहे. हिंगणघाट बसस्थानकात चालक-वाहकाला मारहाण झाल्याची घटना ताजी असतानाच गुरुवारी सकाळी वर्धा बसस्थानकावर वाहक आणि विद्यार्थिनीमध्ये वाद उफाळला. चिल्लरच्या कारणावरून सुरू झालेल्या वादात वाहकाने विद्यार्थिनीला शिवीगाळ केल्याचा आरोप असून, या प्रकारामुळे प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

बुधवारी सकाळी आर्वी-राजुरा बसमधील एका महिलेने चालक आणि वाहकाला शिवीगाळ केल्याची घटना घडली होती. त्यानंतर हिंगणघाट बसस्थानकावर संबंधित वाहकाने नातेवाइकाला बोलावून चालकाला मारहाण केल्याचे समोर आले. या घटनेची चर्चा सुरू असतानाच गुरुवारी वर्धा बसस्थानकावर पुन्हा वाद झाल्याने एसटी कर्मचाऱ्यांच्या वर्तनाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



गुरुवारी सकाळी अंजी आंदोरी-वर्धा बस क्रमांक एमएच १४ बीटी ५०१३ मधून सावंगी येथून एक विद्यार्थिनी प्रवास करीत होती. वर्धा बसस्थानकावर उतरताना चिल्लरच्या कारणावरून तिचा वाहकाशी वाद झाला. हा वाद वाढत गेल्यानंतर वाहकाने विद्यार्थिनीला अत्यंत खालच्या दर्जाची शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. काही युवकांनी या प्रकाराचे चित्रीकरण केले.

एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी प्रवाशांशी संयमाने वागणे अपेक्षित असताना अशा घटनांमुळे महामंडळाची प्रतिमा मलिन होत आहे. संबंधित वाहकाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

---

## शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यावर अस्वलाची झडप

## आमगाव परिसरात भीतीचे वातावरण

### वनविभागाने बंदोबस्त करण्याची ग्रामस्थांची मागणी

पहाटे साडेपाचची घटना ; ६७ वर्षीय शेतकरी गंभीर जखमी

**सेलू जनमाध्यम :** सेलू तालुक्यातील आमगाव परिसरात शेतात कामासाठी जात असलेल्या शेतकऱ्यावर अस्वलाने अचानक हल्ला केल्याची घटना गुरुवारी (२२ ऑक्टोबर) सकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास घडली. या हल्ल्यात चंद्रशेखर गौळकर (वय ६७, रा. आमगाव) हे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी सावंगी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे आमगाव परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चंद्रशेखर गौळकर हे नेहमीप्रमाणे सकाळी शेतात जाण्यासाठी घरून निघाले होते. दरम्यान, वाटेत असलेल्या अस्वलाने अचानक त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि कुटुंबीयांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर त्यांना तातडीने सावंगी येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

आमगाव परिसरातील शेतशिवारात वन्यप्राण्यांचा वावर वाढल्याने शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पहाटेच्या वेळी शेतीच्या कामासाठी घराबाहेर पडणाऱ्या शेतकऱ्यांना वन्यप्राण्यांचा सामना करावा लागण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



जंगलातील पाणवठे कोरडे पडल्यामुळे अस्वल गाव परिसरात भटकत असल्याची शक्यता ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे. वनविभागाने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन परिसरात गस्त वाढवावी, अस्वलाचा बंदोबस्त करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात आणि शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावी पावले उचलावीत, अशी मागणी होत आहे. अस्वलाच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या चंद्रशेखर गौळकर यांना शासनाकडून तातडीने आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी आमगाव परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांपासून शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी वनविभागाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.

---

## विजेच्या हुका टाकण्याच्या वादातून ६० वर्षीय शेतकऱ्यावर हल्ला

**आष्टी शहीद जनमाध्यम :** शेतातील विद्युत खांबावर विनापरवानगी हुका टाकून दुसऱ्या शेतात वीजपुरवठा नेण्यास विरोध केल्याने ६० वर्षीय शेतकऱ्याला लाकडी दांड्याने मारहाण केल्याची घटना माणिकवाडा शिवारात घडली. या हल्ल्यात धनराज खवशी यांचा हात मोडला असून, त्यांना शस्त्रक्रियेसाठी कारंजा (घाडगे) येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी आष्टी पोलिसांकडे तक्रार करण्यात आली आहे.



माणिकवाडा येथील रहिवासी धनराज खवशी यांची कोल्हा-काळी शिवारात शेती आहे. गुरुवारी ते कपाशी पिकाला पाणी देण्यासाठी शेतात गेले असता, उत्तम डोंगरे यांनी त्यांच्या शेतातील विद्युत खांबावर कथितरीत्या विनापरवानगी हुका टाकून दुसऱ्या शेतात वीजपुरवठा घेतल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. यावरून खवशी यांनी जाब विचारला असता, दोघांमध्ये वाद झाला.

तक्रारीनुसार, यावेळी दारूच्या नशेत असल्याचा आरोप असलेल्या डोंगरे यांनी लाकडी दांड्याने खवशी यांना मारहाण केली. यात त्यांच्या हाताला गंभीर दुखापत होऊन हात मोडला. शेतातील पिकांची काळजी घेण्यासाठी गेलेल्या वृद्ध शेतकऱ्याला रुग्णालयात दाखल होण्याची वेळ आली. घटनेमुळे परिसरात चर्चा सुरू असून, आष्टी पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

---

आचारसंहितेचा धाक कुणाला

## मतदानाच्या तोंडावर राजकीय फलक उघडाच

### तहसील कार्यालय परिसरातील प्रकार; निवडणूक यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

**आष्टी शहीद जनमाध्यम :** पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीचे मतदान तोंडावर आले असताना आष्टी तहसील कार्यालय परिसरात शिवसेनेचा राजकीय फलक उघडाच असल्याचे समोर आले आहे. मतदान केंद्रापासून काही अंतरावर हा फलक दिसत असल्याने आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. निवडणुकीच्या ऐन तोंडावरही संबंधित यंत्रणेचे या फलकाकडे लक्ष गेले नाही का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात मतदानाची तयारी सुरू आहे. मतदान केंद्रांच्या परिसरात राजकीय पक्षांचे बूथ उभारण्याची लगबग सुरू असताना दुसरीकडे राजकीय पक्षाचा फलक मात्र झाकण्यात आलेला नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे निवडणुकीच्या नियमांचे पालन नेमके कोणाकडून आणि कशा प्रकारे करून घेतले जात आहे, याबाबत चर्चा सुरू झाली आहे.



आदर्श आचार संहितेचा उद्देश निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शक वातावरणात पार पाडणे हा आहे. अशा परिस्थितीत तहसील कार्यालयासारख्या महत्त्वाच्या ठिकाणी राजकीय फलक उघडा असल्याचे दिसणे ही बाब दुर्लक्षित करता येणार नाही. फलक झाकण्याची जबाबदारी संबंधित पक्षाची की प्रशासनाची, याबाबत अधिकाऱ्यांनी स्पष्टता देणे आवश्यक आहे.

संबंधित फलकाबाबत लागू असलेल्या नियमांची निवडणूक यंत्रणेने तातडीने पडताळणी करावी. नियमभंग आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी आणि मतदानापूर्वी आचारसंहितेचे पालन सुनिश्चित करावे, अशी मागणी होत आहे. आता निवडणूक प्रशासन या प्रकाराची दखल घेते की फलक मतदानापर्यंत असाच उघडा राहतो, याकडे लक्ष लागले आहे.

---

## दृष्टिहीनांच्या साहित्यविश्वाला मिळणार नवी दृष्टी

### वर्धेत २४ व २५ ऑक्टोबरला पहिले राज्यस्तरीय जागृत-दृष्टी साहित्य संमेलन



पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते उद्घाटन कथाकथन, कविसंमेलन आणि सांगीतिक कार्यक्रमांचे आयोजन

**वर्धा जनमाध्यम :** दृष्टिहीन व्यक्तींच्या साहित्यिक प्रतिभेला व्यासपीठ मिळवून देण्यासाठी राष्ट्रीय दृष्टिहीन संघाच्या वतीने वर्धेत २४ व २५ ऑक्टोबर रोजी पहिले राज्यस्तरीय जागृत-दृष्टी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. स्थानिक अनेकान्त स्वाध्याय मंदिर सभागृहात होणाऱ्या या संमेलनात परिसंवाद, कथाकथन, बहुभाषिक कविसंमेलन आणि सांगीतिक कार्यक्रमांची मेजवानी साहित्यप्रेमींना अनुभवता येणार आहे. संघाचे महाराष्ट्र राज्याध्यक्ष तथा संमेलनाचे स्वागताध्यक्ष भोजराज पाटील यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

राष्ट्रीय दृष्टिहीन संघ गेल्या ५० वर्षांपासून दृष्टिहीन व्यक्तींच्या शिक्षण, प्रशिक्षण आणि पुनर्वसनासाठी कार्यरत आहे. त्यांना साहित्याच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्याची संधी मिळावी, हा संमेलनाचा प्रमुख उद्देश असल्याचे पाटील यांनी सांगितले.

शनिवारी २४ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते उद्घाटन होईल. यावेळी संमेलनाध्यक्ष कवी संजय इंगळे तिगावकर, प्रा. डॉ. विनोद आसुदानी, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ आणि प्रदीप दाते उपस्थित राहतील. याप्रसंगी ब्रेल पुस्तक आणि जागृती दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन होईल.

दुपारी 'तमाच्या तळाशी दिवे लागले' या ब्रेल पुस्तकावर परिसंवाद, त्यानंतर कथाकथन आणि सायंकाळी बहुभाषिक कविसंमेलन होणार आहे. रविवारी हरीश इथापे यांचा 'मन, मेंदूला अनलॉक करू या' या विषयावर संवाद आणि 'सूरसंगम गीतगुंजन' हा सांगीतिक कार्यक्रम आयोजित केला आहे. दुपारी १२ वाजता संमेलनाचा समारोप होईल. पत्रकार परिषदेला संजय इंगळे तिगावकर आणि समन्वयक नरेंद्र नरोटे उपस्थित होते.

---

## महिला डॉक्टरांवरील हल्ल्याचे तीव्र पडसाद; जिल्हाभर ओपीडी बंद

### पाच पोलीस कर्मचारी उपस्थित असतानाही महिला डॉक्टरांवर हल्ला झाल्याने सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**वर्धा जनमाध्यम :** तळेगाव श्यामजीपंत येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कर्तव्यावर असलेल्या महिला वैद्यकीय अधिकाऱ्यावर वैद्यकीय तपासणीसाठी आणलेल्या आरोपीने हल्ला केल्याच्या घटनेचे तीव्र पडसाद जिल्ह्यात उमटले आहेत. या घटनेच्या निषेधार्थ गुरुवारी, २२ ऑक्टोबर रोजी वर्धा जिल्ह्यातील वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी ओपीडी सेवा बंद ठेवून निषेध नोंदविला. आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची हमी द्यावी, हल्लेखोर आरोपीवर कठोर कारवाई करावी आणि कर्तव्यावरील पोलिसांच्या कथित हलगर्जीपणाची चौकशी करावी, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

तळेगाव श्यामजीपंत येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात २१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास ही घटना घडली. पोलिसांनी एका आरोपीला वैद्यकीय तपासणीसाठी केंद्रात आणले होते. यावेळी पाच पोलीस कर्मचारी उपस्थित असताना संबंधित आरोपीने महिला वैद्यकीय अधिकाऱ्यावर हल्ला केल्याचा आरोप आहे. घटनेच्या वेळी आरोग्य केंद्रात आशा स्वयंसेविकांची मासिक आढावा बैठक सुरू होती.

कर्तव्यावर असलेल्या महिला वैद्यकीय अधिकाऱ्यावर हल्ला झाल्याने आरोग्य कर्मचाऱ्यांमध्ये संताप व्यक्त करण्यात आला. घटनेनंतर आरोग्य कर्मचाऱ्यांनी तळेगाव पोलीस ठाणे गाठून निषेध नोंदविला. तसेच हल्लेखोर आरोपीवर कारवाई करण्यासह संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांच्या कर्तव्यावरील हलगर्जीपणाची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली.या घटनेच्या निषेधार्थ गुरुवारी जिल्ह्यातील विविध आरोग्य कर्मचारी आणि वैद्यकीय अधिकारी संघटनांच्या प्रतिनिधींनी जिल्हाधिकारी वान्मती सी., जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन, जिल्हा पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले यांना निवेदन दिले.

आरोग्य अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कर्तव्य बजावताना सुरक्षित वातावरण मिळावे, आरोग्य केंद्रांमध्ये संरक्षणाची प्रभावी व्यवस्था करावी आणि महिला वैद्यकीय अधिकाऱ्यावरील हल्ल्याची गंभीर दखल घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

रुग्णसेवा देताना आरोग्य अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अनेकदा प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागतो. मात्र, पोलीस कर्मचारी उपस्थित असतानाही महिला वैद्यकीय अधिकाऱ्यावर हल्ला झाल्याच्या घटनेमुळे आरोग्य केंद्रांतील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका आरोग्य संघटनांनी मांडली.

या निषेध आंदोलनात महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य राजपत्रित वैद्यकीय अधिकारी गट-अ संघटना, महाराष्ट्र राज्य वैद्यकीय अधिकारी गट-ब संघटना, महाराष्ट्र राज्य सामुदायिक आरोग्य अधिकारी संघटना आणि वैद्यकीय अधिकारी महासंघाच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला.

यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. मंगेश रेवतकर, डॉ. श्रीधर ताम्हणकर, डॉ. स्नेहल राठोड, डॉ. प्रभाकर नाईक, डॉ. माधुरी दिघेकर, डॉ. मोनाली मामीलवार, डॉ. भारती बहादुरे, डॉ. श्रुती मसराम, डॉ. अमोल येळणे, डॉ. प्रवीण धमाने, डॉ. रॉबिन कांबळे, डॉ. भागवत राऊत, प्रशांत वाडीभस्मे, डॉ. दीपक वाघमारे, डॉ. प्रफुल्ल गोरडे, डॉ. संगीता ढगे यांच्यासह दिलीप उटाणे, बाबाराव कनेर, अविनाश चव्हाण, शेख हुसेन, शरद डांगरे, अमित कोपूलवार, अक्षय इंगळे, डॉ. वीणा वासनिक, डॉ. भारती पारधी, पंकज खासदेव आणि डॉ. पारुल तपासे आदींसह शेकडो अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## रुबियो-ट्रम्प आणि मोदी

भारताची गेले काही महिने रशियन तेल खरेदीवरून भारतावर १०० टक्के टॅरीफ आकारणी करण्याची धमकी देणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांनी एक वेगवान यू टर्न घेत यासंदर्भातील कायदा मागे घेण्याचा निर्णय घेतला. यामुळे आगामी ६० दिवसांसाठी भारताला रशियाकडून कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू खरेदीची सवलत मिळाली आहे. अमेरिकेत मध्यावधी निवडणुकांआधी झालेल्या या निर्णयाला भारतासोबतच्या प्रस्तावित व्यापार कराराचीही पार्श्वभूमी आहे. दुसरीकडे, अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो हे भारत दौऱ्यावर आहेत. भारत-अमेरिका आर्थिक आणि सामरिक सहकार्य अधिक मजबूत करण्याच्या प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वाची आहे. राजधानी नवी दिल्लीला बगल देत त्यांनी मुंबई आणि गुजरातमधील जामनगरची केलेली निवड पडद्यामागे दोन्ही देशांच्या वाटाघाटींमध्ये काही तरी मोठे घडत असल्याचे संकेत देते. आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीत सर्व सूत्रे ही शुद्ध व्यावहारिक लाभाभोवती आणि भूराजकीय गरजेभोवतीच फिरत असतात. मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी असून, अमेरिकेशी व्यापार-व्यवहार करणाऱ्या व्यवसाय व कंपन्यांचे केंद्र आहे.जामनगर येथील रिलायन्स समूहाच्या तेल शुद्धीकरण संकुलाला दिलेल्या भेटीमागे जागतिक तेल बाजारातील अपरिहार्यता, अमेरिकेतील निवडणुका आणि पाश्चात्य देशांच्या तथाकथित आर्थिक निर्बंधांचे ढोंग उघडे पडणारे अर्थकारण आहे. ज्या देशावर आणि ज्या उद्योग समूहावर रशियाकडून स्वस्त खनिज तेल खरेदी करून युक्रेन युद्धाला अप्रत्यक्ष आर्थिक खतपाणी घातल्याचा आरोप अमेरिकेतील धोरणकर्त्यांनी सातत्याने केला, त्याच समूहाच्या दारात स्वतः अमेरिकेच्या परराष्ट्रमंत्र्यांनी हजेरी लावावी लागणे, याला काळाचा महिमा म्हणावा लागेल. मुकेश अंबानी यांच्या रिलायन्स इंडस्ट्रीजचे जामनगर येथील हे संकुल आज जागतिक ऊर्जा पुरवठ्याचे नियमन करणारे महाकाय केंद्र आहे. दररोज १४ लाख बॅरल इतके अवाढव्य कच्चे तेल शुद्ध करण्याची क्षमता या संकुलात आहे. अत्यंत निकृष्ट, अतिजड आणि सल्फरयुक्त अशा २०० हून अधिक प्रकारच्या कच्च्या तेलाचे शुद्धीकरण करून त्यातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे डिझेल, पेट्रोल आणि विमानाचे इंधन तयार करण्याची क्षमता या प्रकल्पात आहे. अशी लवचिकता जगातील मोजक्याच तेल शुद्धीकरण प्रकल्पांमध्ये आहे. त्यामुळेच जागतिक स्तरावर तेलपुरवठ्याची साखळी विस्कळीत होते, तेव्हा जामनगरचे महत्त्व जगासाठी निर्णायक ठरते. ट्रम्प प्रशासनासमोर सध्या देशांतर्गत महागाई आणि इंधनाचे गगनाला भिडलेले दर हे सर्वात मोठे राजकीय संकट बनून उभे ठाकले आहे.मध्यावधी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर झालेल्या जनमत चाचण्यांमध्ये अध्यक्षांची घसरलेली लोकप्रियता आणि त्यातच डिझेलची विक्रमी दरवाढ यामुळे अमेरिकेतील सत्ताधारी धास्तावले आहेत. युरोप आणि अमेरिकेच्या बाजारपेठांना स्थिर ठेवण्यासाठी ज्या डिझेलची गरज भासते, त्याचा एक मोठा वाटा याच जामनगरमधून निर्यात होतो. गेल्या काही महिन्यांत युरोपीय बंदरांवर दाखल होणाऱ्या सात तेलवाहू जहाजांपैकी सहा जहाजे ही थेट रिलायन्सच्या या संकुलातून निघालेली होती. रशियन ऊर्जा आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी भारताला प्रवृत्त करणे आणि दुसरीकडे व्हेनेझुएलामधील वाढत्या तेल उत्पादनासाठी हक्काची बाजारपेठ शोधणे, अशी दुहेरी व्यूहरचना सध्या अमेरिकेकडून आखली जात आहे. व्हेनेझुएलातील तेल उत्पादन जसे वाढेल, तसा भारताचा जागतिक पुरवठ्यातील सहभाग वाढवता येईल यावर रिलायन्स व्यवस्थापनासोबत रुबियोंची चर्चा होईल. व्हेनेझुएलाचे कच्चे तेल अत्यंत जड आणि शुद्धीकरणासाठी क्लिष्ट मानले जाते.अमेरिकेतील अनेक जुन्या प्रकल्पांना ते शुद्ध करणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. त्यामुळेच अमेरिकेला जामनगरची आठवण झाली. रिलायन्सने अमेरिकेत ऊर्जा प्रकल्पांमध्ये केलेली कोट्यवधीची गुंतवणूक ही वॉशिंग्टनच्या दृष्टीने आणखी एक जमेची बाजू. टेक्सास येथील नव्या शुद्धीकरण प्रकल्पात भागीदारी असो किंवा हेलियम वायूच्या उत्खननातील गुंतवणूक असो, भारतीय भांडवल आता अमेरिकेच्या भूमीवर रोजगार आणि पायाभूत सुविधा निर्माण करत आहे. ट्रम्प प्रशासनाला देशांतर्गत मतदारांना दाखवण्यासाठी अशा विदेशी गुंतवणुकीची नितांत गरज आहे. भारतासाठी या दौऱ्यातील महत्त्वाचा मुद्दा आहे, तो व्यापार कराराचा. रशियन तेल खरेदीला दिलेल्या सवलतींचे कार्ड प्रस्तावित व्यापार करारातील वाटाघाटींमध्ये दबाव आणण्यासाठी वापरले जाणार का, हा भारतासाठी कळीचा प्रश्न आहे. रुबियो यांच्या भारत भेटीमुळे गेल्या वर्षभरापासून व्यापार संबंधांत निर्माण झालेला तणाव कमी करण्यासाठी संवादाचे दरवाजे खुले असल्याचे दिसते, ही सकारात्मक बाब आहे. मात्र, अमेरिकेतील सत्ताबदलांनुसार बदलणारी व्यापार आणि निर्बंधविषयक धोरणे लक्षात घेता व्यक्तिकेंद्रित राजनैतिक मैत्रीवर अवलंबून राहणे धोकादायक ठरू शकते. त्यापेक्षा भारताने संस्थात्मक सहकार्य, दीर्घकालीन करार आणि परस्पर विश्वास यांना अधिक महत्त्व दिले पाहिजे.गेल्या काही महिन्यांतील अमेरिकेची धोरणे ही उघडपणाने भारतविरोधी असल्याचे दिसून आले आहे. मग ते पाकिस्तानवर स्तुतीसुमने उधळणे असो किंवा चिनी राष्ट्राध्यक्षांना पायघड्या घालणे असो किंवा थेट रशियासोबत समझोता करणे असो; या सर्वांमधून अमेरिका भारतावर फक्त आणि फक्त दबाव वाढवण्याचा प्रयत्न करत आहे, हे लक्षात घ्यायला हवे. रुबियोंनी भलेही या दौऱ्यात भारतावर स्तुतीसुमने उधळली असली, तरी प्रत्यक्ष व्यापार करारामध्ये अमेरिका कोणती भूमिका घेते, भारताला तेल खरेदीसारख्या राष्ट्रीय हिताच्या विषयांमध्ये स्वायत्तता जपण्यास मान्यता देते का, या बाबी अधिक महत्त्वाच्या आहेत. व्हेनेझुएलाचे तेल जागतिक बाजारात विकून गब्बर होण्यासाठी अमेरिकेला भारतीय शुद्धीकरण प्रकल्पाची गरज भासणार असेल, तर आपण त्याचा संधी म्हणून वापर करणे आवश्यक आहे. जामनगरच्या माध्यमातून भारताने जगाला दाखवून दिले आहे की, पायाभूत सुविधांचे अवाढव्य सामर्थ्य आणि तंत्रज्ञानाची लवचिकता ही आंतरराष्ट्रीय राजकारणात अणुबॉम्बइतकीच प्रभावी राजनैतिक ढाल ठरू शकते. अमेरिका टॅरीफचा, इराण होर्मुझचा, चीन दुर्मीळ खनिजांचा वापर आयुध म्हणून करत व्यापारी अटी आपल्या तत्त्वावर बदलत असेल, तर भारतासारख्या सर्वात मोठी बाजारपेठ असणाऱ्या आणि तेलशुद्धीकरणातील महासत्ता? असणाऱ्या देशाने तसे करण्यास हरकत काय? त्यामुळे रुबियो आणि ट्रम्प यांना निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतासोबतच्या व्यापार कराराबाबत कितीही भरते आल्याचे दिसत असले, तरी केंद्र सरकारने अमेरिकन कृषिमाल, सी फूड आणि दुग्धोत्पादनांबाबत आखून दिलेली लक्ष्मणरेषा कायम ठेवणे गरजेचे आहे.

# बँका होतील भांडवलदार नियंत्रित

### उत्तरार्ध

**आयडीबीआय वाचविणे म्हणजे केवळ एक बँक वाचविणे नव्हे; सार्वजनिक वित्तव्यवस्था, ग्रामीण भारताचा कर्जाधिकार आणि शेतीवरील जनतेचे नियंत्रण वाचविणे होय.**

कृषी वित्तपुरवठा म्हणजे केवळ शेतकऱ्याचे पीककर्ज नाही. त्यात बियाणे, खते, सिंचन, पशुपालन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, कुक्कुटपालन, गोदामे, शीतगृहे, अन्नप्रक्रिया, वाहतूक आणि कृषी विपणन यांचा समावेश होतो. खासगी व्यवस्थापनाला या संपूर्ण मूल्यसाखळीतील मोठ्या आणि अधिक नफा देणाऱ्या टप्प्यांकडे वळण्याचा स्वाभाविक कल असतो. त्यामुळे शेतकऱ्याच्या उत्पादनासाठी कमी व्याजाचे कर्ज देण्याऐवजी मोठ्या अन्नप्रक्रिया कंपन्या, निर्यातदार, ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म, गोदाम कंपन्या आणि करारशेती करणाऱ्या समूहांना वित्तपुरवठा वाढू शकतो. अशा प्रक्रियेत कागदोपत्री कृषी कर्ज वाढलेले दिसेल; परंतु कृषी उत्पादनातून निर्माण होणाऱ्या मूल्यावर शेतकऱ्याऐवजी कॉर्पोरेट मध्यस्थांचे नियंत्रण वाढेल. याला कृषी क्षेत्राचे वित्तीयीकरण आणि कॉर्पोरेटीकरण असे म्हणता येईल. खासगी बँकेला एका मोठ्या कृषी कंपनीला ५०० कोटींचे कर्ज देणे प्रशासकीयदृष्ट्या स्वस्त पडते; त्याच रकमेची हजारो लहान शेतकरी, बचतगट किंवा सूक्ष्म उद्योगांमध्ये विभागणी करण्यासाठी अधिक शाखा, कर्मचारी आणि देखरेख आवश्यक असते. नफ्याचा निकष प्रभावी ठरल्यास मोठ्या भांडवलाकडे कर्जाचे केंद्रीकरण ही अपवादात्मक नव्हे, तर व्यवस्थेची स्वाभाविक दिशा बनते.

**ग्रामीण शाखांवर दबाव**

ग्रामीण शाखा ही केवळ ठेवी व कर्जाचे केंद्र नसते. ती पीककर्ज नूतनीकरण, कर्जपुनर्गठन, विमा दावा, सरकारी अनुदान, सामाजिक सुरक्षा, बचतगट, पेन्शन आणि थेट लाभ हस्तांतरण यांची स्थानिक संस्था असते. खासगी व्यवस्थापन शाखेची उपयुक्तता सामाजिक परिणामांपेक्षा प्रत्येक शाखेचा नफा, प्रति कर्मचारी व्यवसाय आणि खर्च-उत्पन्न गुणोत्तराने मोजू शकते. त्यातून :

- कमी नफा देणाऱ्या ग्रामीण शाखांचे विलीनीकरण किंवा स्थलांतर;
- नियमित कर्मचाऱ्यांऐवजी कमी मोबदल्याच्या बँकिंग प्रतिनिधींवर अवलंबित्व;
- रोख व्यवहार, कागदपत्रे आणि तक्रार निवारणासाठी ग्राहकांना अधिक अंतर प्रवास;
- डिजिटल सुविधांपासून वंचित वृद्ध, अशिक्षित आणि आदिवासी ग्राहकांचे बहिष्करण;
- बँकिंग प्रतिनिधींच्या अस्थिर सेवेमुळे व्यवहारांची सातत्यता आणि सुरक्षितता कमी होणे, असे परिणाम संभवतात.

**सामाजिक लवचिकता**

दुष्काळ, पूर, गारपीट किंवा बाजारभाव पडल्यानंतर कर्जाचे पुनर्गठन करणे, वसुली स्थगित करणे किंवा व्याजसवलत देणे या निर्णयांमध्ये सार्वजनिक बँका सरकारी धोरणाचे माध्यम बनतात. खासगी मालकीमध्ये अशा निर्णयांचा ताळेबंद आणि नफ्यावर होणारा परिणाम अधिक निर्णायक ठरू शकतो. सरकार नियामक आदेश देऊ शकते; परंतु मालकी आणि व्यवस्थापनावर सार्वजनिक नियंत्रण नसल्यास प्रत्येक सामाजिक हस्तक्षेपासाठी खासगी भागधारकांच्या भरपाईचा प्रश्न उभा राहतो. परिणामी कृषी संकटाचा आर्थिक भार पुन्हा सरकारवर म्हणजे जनतेवर आणि नफ्याचा लाभ खासगी मालकाकडे जाण्याची व्यवस्था तयार होते. हीच तोट्याचे सामाजीकरण आणि नफ्याचे खासगीकरण करण्याची पारंपरिक प्रक्रिया आहे. सार्वजनिक भांडवल आणि एलआयसीच्या निधीने बँक संकटातून बाहेर काढायची; अनुत्पादक कर्जे साफ करून ताळेबंद मजबूत करायचा; आणि नंतर नफ्याच्या टप्प्यावर नियंत्रण खासगी समूहाला द्यायचे - याला मुक्त बाजारातील स्वाभाविक व्यवहार म्हणता येणार नाही.

भारतीय बँकिंगमध्ये लहान शेतकऱ्याच्या काही लाखांच्या थकबाकीवर नोटिसा, जप्ती आणि सामाजिक दबाव येतो; तर मोठ्या कॉर्पोरेट कर्जांमध्ये पुनर्गठन, राइट-ऑफ, दिवाळखोरी प्रक्रिया आणि मोठी आर्थिक तडजोड




केली जाते. मालकी खासगी झाल्यामुळे ही वर्गीय विषमता आपोआप कमी होणार नाही. उलट मोठ्या कॉर्पोरेट ग्राहकांशी व्यावसायिक संबंध वाढल्यास कर्जवाटप आणखी केंद्रित होऊ शकते. कर्जाचे मूल्यांकन केवळ परतफेडीच्या वैयक्तिक क्षमतेवर केले तर शेतकऱ्याचे संकट त्याची चूक ठरते. प्रत्यक्षात मात्र अपुरा हमीभाव, वाढता उत्पादनखर्च, आयात-निर्यात धोरणातील बदल, हवामान संकट आणि बाजारातील मक्तेदारी ही कर्जबाजारीपणाची संरचनात्मक कारणे आहेत. सार्वजनिक बँकिंगने ही सामाजिक वस्तुस्थिती मान्य करावी लागते; खासगी बँक मात्र त्याकडे केवळ 'क्रेडिट रिस्क' म्हणून पाहते. विदेशी वित्तीय समूहाचे अंतिम उत्तरदायित्व भारतीय शेतकरी, संसद किंवा ग्रामीण समाजापेक्षा स्वतःचे भागधारक आणि जागतिक गुंतवणूकदार यांच्याकडे असते. जागतिक वित्तीय संकट, भांडवलाची गरज किंवा समूहाच्या इतर कंपन्यांची प्राथमिकता बदलल्यास भारतातील कृषी कर्ज त्याच्या जागतिक पोर्टफोलिओतील एक व्यावसायिक विभाग ठरू शकते.

**आवश्यक पर्याय**

- केंद्र सरकारने आयडीबीआयमधील बहुमत आणि व्यवस्थापन नियंत्रण कायम ठेवावे;
- कृषी आणि लहान शेतकरी कर्जाचे राज्यानिहाय व जिल्हानिहाय लक्ष्य निश्चित करावे;
- पीककर्जाबरोबर पशुपालन, मत्स्यव्यवसाय, दुग्धव्यवसाय आणि लहान अन्नप्रक्रिया उद्योगांसाठी परवडणारे दीर्घकालीन कर्ज वाढवावे;
- कर्जाचे प्रमाणच नव्हे, तर लाभार्थ्यांचा आकार, जात, लिंग, प्रदेश आणि भूधारणा यांची माहिती सार्वजनिक करावी;
- ग्रामीण शाखा बंद करण्यापूर्वी ग्रामसभा, ग्राहक आणि स्थानिक प्रशासनाशी सल्लामसलत बंधनकारक करावी;
- बँकिंग प्रतिनिधींना योग्य मोबदला, सामाजिक सुरक्षा आणि कर्मचारीसदृश संरक्षण द्यावे;
- कृषी संकटग्रस्त जिल्ह्यांसाठी विशेष कर्जपुनर्गठन यंत्रणा निर्माण करावी;
- शेतकरी उत्पादक संस्था, सहकारी संस्था आणि महिला बचतगटांना थेट कर्ज देण्यावर भर द्यावा;
- बँकेच्या कृषी कर्जधोरणावर संसद, नाबार्ड आणि स्थानिक प्रतिनिधींचे परीक्षण असावे;
- विक्रीपूर्वी कृषी कर्ज, ग्रामीण शाखा आणि वित्तीय समावेशनाबाबत बंधनकारक, सार्वजनिक आणि मोजता येणाऱ्या अटी निश्चित कराव्यात.

प्रश्न बँकेचा नाही, ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील लोकशाही नियंत्रणाचा आहे. आयडीबीआयचे खाजगीकरण झाले तर लगेच कृषीकर्ज थांबेल, असे नाही. आरबीआयचे प्राधान्य क्षेत्र कर्जाचे नियम कायम राहतील. परंतु कायदेशीर किमान लक्ष्य म्हणजे सामाजिक बँकिंगची हमी नव्हे. मालकीबदलामुळे बँकेच्या अंतर्गत प्राधान्यक्रमात नफा, मोठी कर्जखाती, कॉर्पोरेट कृषी साखळ्या आणि वित्तीय समूहातील परस्पर व्यवहार यांना अधिक महत्त्व मिळण्याचा संरचनात्मक धोका निर्माण होतो. शेती आधीच अनेक संकटातून जात आहे. अशा वेळी सार्वजनिक वित्तीय संस्थांना मजबूत करण्याऐवजी त्यांचे नियंत्रण नफाकेंद्री विदेशी भांडवलाकडे देणे म्हणजे ग्रामीण भारताची आर्थिक सौदाशक्ती आणखी कमी करणे होय.

**देविदास तुळजापूरकर**
**९४२२२०९३८०**

# अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री की खनिज तेलाचे सेल्समन ?



मार्को रुबियो यांची रिलायन्स इंडस्ट्रीजच्या जामनगर येथील तेल शुद्धीकरण प्रकल्पला भेट, मुकेश अंबानी यांच्याशी झालेली मिटिंग यांच्या बातम्या, फोटो आणि अर्थात त्यावरील चर्चा दोन्ही मीडियामध्ये सुरु आहेत. पण प्रश्न असा विचारावयास हवा की एकाबाजूला अमेरिका इस्रायलने छेडलेले इराण युद्ध सुरूच असताना, अनेक आखाती देश या आगीत होरपळत असताना,रशिया युक्रेन युद्ध संपलेले नसताना,इस्रायलने केलेले पॅलेस्टाईन लोकांचे शिरकाण अजूनही धुमसत असताना, चीन बरोबर रस्सीखेच सुरूच असताना, नाटो संघटनेचे बारा वाजलेले असताना आणि अमेरिकेतील ट्रम्प यांचे अप्रुव्हल रेटिंग नीचांक गाठत असताना, दोन आठवड्यांनी अमेरिकेतील मध्यावधी निवडणुका तोंडावर असताना, ज्यात ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला बरीच आपटी खावी लागेल, काँग्रेस आणि सिनेट मध्ये ट्रम्प विरोधक बहुमतात येऊ शकतात असे अंदाज असताना अशा काळात ट्रम्प यांचे अत्यंत जवळचे,विश्वासू मानले जाणारे मार्को रुबियो भारतात येतात. राजकीय अजेंडा घेऊन नाही, भारताच्या राजधानी दिल्लीत नाही तर मुंबईत भारतातील अदानी, टाटा आणि अंबानी समूहाच्या मुख्याधिकाऱ्यांना भेटतात;जो म्हटले तर अनुषंगिक आहे.रुबिओ यांचा सर्वात मोठा अजेंडा असतो रिलायन्सला व्हीनेझुएलाचे खनिज तेल विकण्याचा, बाकी झालेल्या भेटी अनुषंगिक!

मार्को रुबियो फक्त ट्रम्प यांनी निवडलेले मंत्री नाहीत तर मागा आंदोलनाची जन्मदात्री असणाऱ्या टी पार्टी मोव्हमेंटचे पोस्टर बॉय राहिलेले आहेत. उघड आहे त्यांची ही (भारत भेट नाही!) तर रिलायन्स भेट अर्थातच ट्रम्प यांच्या संमतीने आहे. किंवा खरेतर रुबिओ यांना ट्रम्प यांनीच पाठवलेले असू शकते काय एवढी तातडी असू शकेल अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्र्यांना?

प्रिसाईज/बरोबर प्रश्न विचारणे, प्रिसाईज/बरोबर उत्तर मिळण्यासाठी पूर्वअट असते !

**संजीव चांदोरकर**

# बिश्नोईंचे 'अदृश्य' साम्राज्य

लॉरेन्स बिश्नोई सारखे गँगस्टर तुरुंगात असूनही त्यांचे गुन्हेगारी साम्राज्य अखंडपणे चालवत आहेत, हे देशातील आणि जागतिक सुरक्षा यंत्रणांसमोरील एक मोठे आव्हान बनले आहे. गुजरातच्या हाय-सिक्युरिटी साबरमती मध्यवर्ती तुरुंगात ठेवण्यात आले असले तरी, बिश्नोईचे नेटवर्क पूर्णपणे 'अदृश्य' पद्धतीने कार्य करते. अमेरिकेची गुप्तहेर संघटना इँघ आणि भारतीय तपास यंत्रणांच्या (ऱ्ईँ) अहवालानुसार, हे नेटवर्क चालवण्यासाठी डब्बा कॉलिंग चा वापर करतात. या तंत्रज्ञानामध्ये बेकायदेशीर टेलिफोन एक्स्चेंज तयार केले जातात. तुरुंगातून केलेला एक सामान्य कॉल हा परदेशातील सर्वर किंवा राऊटरद्वारे वळवला जातो. त्यामुळे पोलिसांना हा कॉल कुठून आला आणि कोणाला केला, याचा माग काढता येत नाही. संवाद साधण्यासाठी व्हॉट्सॲप, फेसटाइम, सिग्नल आणि स्नॅपचॅट यांसारख्या एन्क्रिप्टेड मेसेजिंग ॲप्सचा वापर केला जातो. त्यामुळे तुरुंगात मोबाईल जॅमर बसवलेले असले तरी, गुन्हेगार गुपचूप मिळवलेल्या स्मार्टफोन्सवर व्हर्च्युअल प्रायव्हेट नेटवर्क चा वापर करतात. यामुळे त्यांचे इंटरनेट लोकेशन ट्रेस करणे पोलिसांना अशक्य होते.

लॉरेंस बिश्नोई हा स्वतः गुजरातच्या साबरमती मध्यवर्ती कारागृहात उच्च सुरक्षेत कैद असूनही त्याची गँग बाहेर सक्रिय राहणे आणि पोलिसांना ही साखळी तोडण्यात पूर्णपणे यश न येणे, यामागे एक अत्यंत गुंतागुंतीचे आणि आधुनिक गुन्हेगारीचे जाळे कारणीभूत आहे. मुंबईमध्ये अगदी अलीकडे झालेल्या अभिनेते आणि राजकीय नेत्यांवरील हल्ल्यांनंतर हे आव्हान अधिक गंभीर बनले आहे.पारंपरिक अंडरवर्ल्ड गँग्सप्रमाणे बिश्नोई गँग एकाच ठिकाणाहून चालत नाही. तिची रचना प्रामुख्याने तीन स्तरांवर शीर्षस्थानी मास्टरमाइंड लॉरेन्स स्वतः तुरुंगात आहे. मध्यस्तरावर इंटरनॅशनल हँडलर्स): गोल्डी ब्रार, रोहित गोदारा किंवा परदेशात (अमेरिका, कॅनडा) बसलेले इतर हँडलर्स संपूर्ण नियोजन आणि पैशांचे व्यवस्थापन करतात.तळाच्या स्तरावर (स्थानिक शूटर्स) हे शूटर्स सोशल मीडिया किंवा स्थानिक एजंट्सद्वारे भाड्याने घेतले जातात. धक्कादायक बाब म्हणजे, प्रत्यक्षात गुन्हा करणाऱ्या शूटर्सना त्यांचे मुख्य कोण आहेत किंवा ते कोणासाठी काम करत आहेत, याची थेट माहितीच नसते. त्यामुळे एका शूटर्सला पकडले तरी पोलिसांना मुख्य सूत्रधारांपर्यंत पोहोचता येत नाही.

**प्रा डॉ सुधीर अग्रवाल,** वर्धा
९५६१५९४३०६

# 'मुंगेरीलाल के हसीन सपने'

महाराष्ट्राच्या राजकारणात आज राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे या दोन्ही 'ठाकरे बंधूंची' जी अवस्था झाली आहे, तिचे वर्णन करण्यासाठी अनेकदा 'मुंगेरीलाल के हसीन सपने' या लोकप्रिय वाक्प्रचाराचा उपरोधिकपणे वापर केला जातो. एकेकाळी मुंबई आणि महाराष्ट्राच्या राजकारणात मराठी माणसाच्या अस्मितेच्या जोरावर एकछत्री अंमल गाजवणाऱ्या शिवसेनेचा वारसा पुढे चालवण्याचा दावा करणाऱ्या या दोन्ही नेत्यांची आजची राजकीय वास्तवता दिवास्वप्नासारखीच फोल ठरताना दिसत आहे.सध्याच्या बदलत्या समीकरणांमध्ये (झेन-जी) किंवा तरुण पिढीच्या विविध आंदोलनांचा आसरा घेऊन पुन्हा सत्तेत येण्याची स्वप्ने हे नेते पाहत आहेत. ज्याप्रमाणे मुंगेरीलाल आपल्या दैनंदिन आयुष्यातून बाहेर पडून हवेतच इमले बांधत असे आणि प्रत्येक वेळी वास्तवाच्या धक्क्याने त्याचे स्वप्न भंग पावत असे, अगदी तसेच आज ठाकरे बंधूंचे राजकीय पुनरुत्थानाचे दावे आणि प्रत्यक्षात पक्षाची ढासळती ताकद यांचे चित्र ठरत आहे.

**अविनाश देशपांडे**

## संवाद

# गोकुळच्या विजयाने राज्याच्या राजकारणात सतेज पाटलांचे महत्व

नुकताच कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळची २५ जागेसाठी निवडणूक झाली हि निवडणूक कोल्हापूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात आणि कर्नाटकाच्या सीमाभागात गाजली अतिशय अतितटीच्या, संघर्षमय आणि प्रतिष्ठेच्या लढाईत काँग्रेस विधानपरिषद गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील यांच्या समविचारी आघाडीला बहुमताचा१३ उमेदवारांची विजयी पताका घेऊन जादुई आकडा पार करता आला. या निवडणुकीत १ सीएम,२ डिसिएम,१० आमदार,१ खासदार,१ राज्यसभा खासदार,आणि २ मंत्री यांच्या विरोधात बंटी पाटलांनी निकराची झुंज देवून विजयाचा झेंडा फडकावला. त्यामुळे पुन्हा एकदा सतेज पाटलांच्या कार्यपद्धतीवर शिक्कामोर्तब झाले असून राबणारा नेता अशी त्यांची जनमाणसात प्रतिमा निर्माण झाली आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात बंटींचे महत्व वाढले आहे. या गोकुळच्या विजयाने राजकीय संदर्भ बदलले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही महाराष्ट्राच्या बारामतीत या लाडक्या नेत्याचे भावी मुख्यमंत्री म्हणून फ्लेक्स झळकत आहेत सतेज पाटलांची एक खासियत आहे. एकदा का जबाबदारी घेतली की, यशस्वीपणे पार पडायची. त्यामुळे बंटींच्या राजकीय पॅटर्नची सातत्याने चर्चा होते गोकुळची वार्षिक उलाढाल ४ हजार कोटींच्यावर असून ५ लाख दूध उत्पादक जोडले गेले आहेत. सरासरी दैनंदिन १६ ते २० लाख लिटर दुध संकलन होते अशा या संघाचे नेतृत्व सतेज पाटलांच्याकडे आल्यांने दुध उत्पादकांच्या अशा पल्लवीत झाल्या आहेत.

**राजू जाधव**

# प्रदूषित शहरात मुंबई तिसरी

स्वित्झर्लंडमधील 'आयक्यूएअर' या स्विस प्रदूषण तंत्रज्ञान कंपनीने नुकताच जागतिक हवा गुणवत्ता निर्देशांक अहवाल प्रकाशित केला. या अहवालानुसार जगातील सर्वाधिक १२२ प्रदूषित शहरांच्या यादीत मलेशियाच्या क्वालालंपूर (हवा गुणवत्ता निर्देशांक १९२) आणि भारताच्या कोलकातानंतर (हवा गुणवत्ता निर्देशांक १७०) मुंबई (हवा गुणवत्ता निर्देशांक १६६) तिसऱ्या क्रमांकावर पोहोचली आहे. जागतिक पातळीवर प्रदूषित शहरांमध्ये मुंबईचा तिसरा क्रमांक लागणे ही सर्व मुंबईकरांसाठी एक चिंतेची बाब ठरली आहे. शहरात सुरू असलेली अमर्याद बांधकामे, उड्डाणपूल, रस्ते आणि मेट्रोचे रेंगाळलेले प्रकल्प, वाहनांची वाढती संख्या आणि कचऱ्याचा वाढता डोंगर यामुळे मुंबईची हवा कमालीची प्रदूषित झाली आहे. खरे तर मुंबईला लाभलेला विस्तीर्ण समुद्रकिनारा आणि तिथून येणारे वारे पूर्वी प्रदूषण वाहून न्यायचे, पण आता जागोजागी उभ्या राहिलेल्या गगनचुंबी इमारतींमुळे हवेच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा निर्माण झाला आहे.

**-प्रदीप मोरे**

# प्रशासनाचा आदेश की शेतकऱ्यांच्या पिकांवर संकट?

## हळद-ऊस पिकांना पाण्याची चिंता,काँग्रेसचे तहसीलदारांना निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. २२ : आधी सोयाबीनच्या अत्यल्प उत्पादनाचा फटका, डोक्यावर कर्जाचा डोंगर आणि आता हळद-ऊस पिकांसाठी पाण्याची चिंता! अशा दुहेरी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसमोर प्रशासनाच्या मोटरपंप काढण्याच्या आदेशाने नवे संकट उभे केले आहे. पिकांना आवश्यक वेळी पाणी मिळाले नाही, तर उभ्या पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे.**



पाणी उपशावर निर्बंध घालून शेतकऱ्यांनी उभी केलेली पिके धोक्यात आली, तर त्यांच्या नुकसानीची जबाबदारी कोण घेणार, असा संतप्त सवाल उपस्थित करत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटी, महागावने प्रशासनाच्या निर्णयाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. महागाव तहसील प्रशासनाने ४ ऑक्टोबर २०२६ रोजी धरण, नदी, नाले व तलावांतून पाणी उपसा करणारे मोटरपंप काढून घेण्याचे आदेश दिले. मात्र, सध्या हळद पीक कंदधारणेच्या महत्त्वपूर्ण अवस्थेत असून, पुढील आठ ते पंधरा दिवस पाण्याची नितांत गरज असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. ऊस उत्पादकांनाही पाण्याची चिंता सतावत आहे. अशा परिस्थितीत मोटरपंप काढण्याची वेळ आल्यास पिकांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हळद व ऊस पिकांसाठी शेतकऱ्यांनी एकरी सुमारे २० हजार रुपयांची गुंतवणूक केली आहे. बियाणे, खते, औषधे, मशागत आणि मजुरीवर खर्च करून उभी केलेली पिके पाण्याअभावी संकटात सापडल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडू शकते. आधीच सोयाबीनच्या उत्पादनात घट झाल्याने आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना आता नगदी पिके वाचविण्याची चिंता सतावत आहे. पिके जगवायची कशी आणि केलेल्या गुंतवणुकीचे संरक्षण करायचे तरी कोणाच्या भरवशावर? असा सवाल उपस्थित होत आहे. या प्रश्नावर काँग्रेसने बुधवार, २१ ऑक्टोबर २०२६ रोजी तहसील कार्यालयात निवेदन सादर केले. मोटरपंप काढण्याचा आदेश रद्द करून हळद व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पिकांच्या गरजेनुसार पाणी उपसा करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी करण्यात आली. शेतातील प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार करून प्रशासनाने निर्णयाचा फेरविचार करावा, अशी भूमिका निवेदनकर्त्यांनी मांडली. यावेळी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष शिवाजीराव देशमुख, तालुकाध्यक्ष सुनील राठोड, तालुका महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री नरवाडे, शहराध्यक्ष शैलेश कोपरकर, भगवान पंडागळे, बंटी पठाण, सुनील भवानकर, शरदचंद्र डोंगरे, रमेश सांगडे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. सोयाबीनच्या नुकसानीने आधीच आर्थिक कोंडीत सापडलेल्या शेतकऱ्यांना हळद व ऊस पिकांसाठी पाणी मिळणार की नाही, याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. प्रशासनाने वेळेत निर्णय न घेतल्यास उभ्या पिकांचे नुकसान होण्याची भीती असून, शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आदेशाबाबत तातडीने फेरविचार करण्याची मागणी जोर धरत आहे.

# गुंज-कलगाव रस्त्याची दुरवस्था,आमरण उपोषणाचा इशारा!

## सार्वजनिक बांधकाम विभागाला ग्रामस्थांचा निर्वाणीचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. २२ :** महागाव तालुक्यातील गुंज ते कलगाव या महत्त्वाच्या रस्त्याची अनेक वर्षांपासून दुरवस्था झाली असून, संपूर्ण रस्ता खड्ड्यांच्या विळख्यात सापडला आहे. अवजड वाहनांची सततची वर्दळ आणि प्रशासनाचे दुर्लक्ष यामुळे प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

या समस्येवर तातडीने उपाययोजना न झाल्यास सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा हरीभाऊ रामचंद्र खंदारे व इतर ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे दिला आहे. गुंज-कलगाव हा तालुक्यातील महत्त्वाचा मार्ग असून, या रस्त्यावरून साखर कारखान्याची अवजड वाहनेही मोठ्या प्रमाणात धावतात. मात्र, रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनधारक



आणि नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. यापूर्वीही अनेकदा निवेदने देऊनही प्रश्न सुटलेला नसल्याने ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. अपघात झाल्यावरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल उपस्थित करत, संभाव्य दुर्घटनेची जबाबदारी संबंधित विभागावर राहील, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. केवळ तात्पुरती डागडुजी न करता निधी उपलब्ध करून रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

### १५ दिवसांचा अल्टिमेटम!

**पुढील १५ दिवसांत ठोस निर्णय न झाल्यास खंदारे व सहकारी आमरण उपोषण सुरू करणार आहेत. निवेदनाच्या प्रती आमदार, खासदार नागेश पाटील आष्टीकर आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनाही पाठविण्यात आल्या आहेत. आता प्रशासन या इशाऱ्याची दखल घेऊन रस्त्याचा प्रश्न मार्गी लावते का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.**

## थोडक्यात



### वडकी येथे जलसंधारणासाठी ग्रामस्थांचा पुढाकार !

**महसूल विभागाच्या सहकार्याने बंधाऱ्याची निर्मिती**

राळेगाव : तालुक्यातील वडकी येथे ग्रामस्थांनी महसूल विभागाच्या सहकार्याने, मा. अमित भोईटे तहसीलदार राळेगाव केशव पवार गट विकास अधिकारी राळेगाव यांच्या निदर्शनानुसार विशेष जलसंधारण व जनजागृती सप्ताह चे ओचित्य साधून पुढाकार घेत बंधाऱ्याची निर्मिती केली आहे. ग्रामस्थांची एकजूट, प्रशासनाचे सहकार्य आणि तरुणांचा उत्स्फूर्त सहभाग यातून साकारलेल्या या उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे. वडकी येथे उभारण्यात आलेल्या बंधाऱ्यामुळे पावसाचे पाणी अडवून परिसरातील जमिनीतील ओलावा टिकविण्यास आणि भूजलपातळी वाढण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे.
वडकी येथील बंधारा निर्मितीसाठी मंडळाधिकारी दिलीप चिडे,विस्तार अधिकारी मस्के ग्रा. म. अधिकारी एन. जि. ढोके.ग्रा.पं.अधिकारी राजेश ढगे,महसूल सेवक उमेश चांदेकर यांच्यासह
सामाजिक कार्यकर्ते ,विनोद देठे,स्वप्नील खंडाळकर, धनंजय कडू, माणिक खंडाळकर श्रीराम मोरे गमे यांनी पुढाकार घेत बंधारा निर्मितीच्या कामात सहभाग नोंदविला.



### निराधार कुटुंबाला मदतीचा हात देत 'गुणरूप' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**वणी :** तालुक्यातील नवरगाव कायर येथे विजयादशमीच्या मुहूर्तावर गुणवंत पचारे लिखित 'गुणरूप' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.गावातील निराधार वसंत मिलमिले यांच्या हस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत साध्या पद्धतीने हा सोहळा पार पडला. यावेळी गुणवंत पचारे यांनी वसंत मिलमिले यांच्या कुटुंबाला महिनाभराचा किराणा,अन्नधान्य, साडीचोळी व कपडे देऊन मदतीचा हात दिला. काव्यसंग्रहातील ५६ कवितांचा विजयाताई दहेकर यांनी थोडक्यात परिचय करून दिला. विशेष म्हणजे,गुणवंत पचारे हे आपल्या दरमहा पगारातील ४ ते ५ हजार रुपये निराधारांना मदत करण्यासाठी खर्च करतात.हे कार्य ते अविरतपणे १६ वर्षे करणार आहे.गरजू आणि अडचणीत असलेल्या व्यक्तींना मदतीचा हात देण्याचा त्यांचा हा उपक्रम सामाजिक बांधिलकी जपणारा ठरत आहे. कार्यक्रमाला मारोतराव ठेंगणे, बैजनाथ खडसे,प्रकाश नागतुरे,ज्ञानेश्वर कडुकर,गीत घोष,मारोती खापणे,प्रमोद राजूरकर,आण्याजी लोडे यांच्यासह गावकरी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन किशोर बुरडकर यांनी केले.




### पाण्याचा प्रत्येक थेंब अनमोल वृक्षसंवर्धन ही काळाची गरज!

**जिल्हा जमियत अहले हदीसचा यवतमाळात जलसंवर्धन व वृक्षारोपणाचा संदेश**

**यवतमाळ :** पाण्याची घटती उपलब्धता आणि वाढत्या पर्यावरणीय समस्यांच्या पार्श्वभूमीवर जलसंवर्धन व वृक्षारोपण ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून काळाची गरज बनली आहे. याच उद्देशाने जिल्हा जमियत अहले हदीस, यवतमाळच्या वतीने २१ ऑक्टोबर रोजी पर्यास वन येथे जलसंवर्धन व वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. यावेळी संस्थेचे जिल्हाध्यक्ष मिर्झा नफीस बेग यांनी पाणी, जमीन आणि वृक्षांचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. संभाव्य जलसंकट टाळण्यासाठी जनजागृती आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. शेख मोहसिन यांनी पाण्याचा अपव्यय टाळणे, पावसाच्या पाण्याचे संकलन करणे आणि दैनंदिन जीवनात पाणी बचतीची सवय लावण्याचे आवाहन केले. तसेच वृक्षारोपणासोबतच लावलेल्या रोपांचे संगोपन करण्यावर भर देण्यात आला. या अभियानासाठी शाहिद हुसेन सिद्दीकी, मिर्झा दानिश बेग, समीर काझी, फैजुर रहमान, फारूक खिलजी, शेख नईम, कामरान सिद्दीकी, इमरान पटेल, झीशान खान, सरफराज खान यांच्यासह जमियतच्या सदस्यांनी सहकार्य केले.

# पारवा पोलिसांची तत्पर कारवाई सोन्याचे दागिने परत..!

## दहा हजारांची रोकड अद्याप बेपत्ता

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पारवा, दि. २२ :** घरफोडीच्या गुन्ह्याचा अवघ्या २४ तासांत छडा लावत आरोपीला अटक करणाऱ्या पारवा पोलिसांनी न्यायालयाच्या आदेशानुसार ४५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने मूळ मालकाला परत केले. मात्र, चोरीला गेलेल्या दहा हजार रुपयांच्या रोख रकमेचा शोध अद्याप लागलेला नसल्याने या प्रकरणातील तपासाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

घाटंजी तालुक्यातील केळापूर (तांडा) येथील शेतकरी दशरथ रामजी जाधव (६०) हे १७ सप्टेंबर रोजी शेतात फवारणीसाठी गेले असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराचे कुलूप व साखळी तोडून सोन्याची पोत, सोन्याच्या सहा पात्या आणि दहा हजार रुपये रोख असा ऐवज चोरून नेला होता. तक्रारीनंतर पारवा पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत आकाश विठ्ठल चव्हाण (२७, रा.



### दागिने मिळाले, पण रोकड कुठे?

**दागिने परत मिळाल्याने शेतकऱ्याला दिलासा मिळाला असला, तरी दहा हजारांच्या रोकडचे काय झाले, हा प्रश्न कायम आहे. पोलिसांच्या जलद कारवाईचे कौतुक होत असतानाच उर्वरित मुद्देमालाचा शोध घेऊन रोकड वसूल होणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.**

केळापूर तांडा) याला ताब्यात घेतले. पोलिसांच्या माहितीनुसार, त्याच्याकडून चोरीचे दागिने हस्तगत करण्यात आले. गुरुवार, २२ ऑक्टोबर रोजी ठाणेदार हेमंत चौधरी आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक रायकी यांच्या उपस्थितीत न्यायालयाच्या आदेशानुसार दागिने जाधव यांना परत करण्यात आले.

# नशेपासून मुक्ती, योगातून नवजीवनाची प्राप्ती! प्रा.महादेव खाडे

## लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे व्याख्यानाचे आयोजन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**वणी, दि. २२ :** शिक्षण प्रसारक मंडळ,वणी संचालित लोकमान्य टिळक महाविद्यालय,वणी येथे राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने 'नशेपासून मुक्ती, योगातून नवजीवनाची प्राप्ती!' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

या व्याख्यानात ज्येष्ठ योग प्रशिक्षक प्रा.महादेवराव खाडे यांनी विद्यार्थ्यांना योगाचे विविध प्रकार,त्यांचे महत्त्व तसेच व्यसनाधीनतेचे शरीर व मनावर होणारे दुष्परिणाम यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. प्रा.महादेवराव खाडे यांनी योगाच्या विविध प्रकारांची माहिती देताना योगामुळे शारीरिक आरोग्य,मानसिक शांतता,एकाग्रता आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत होते,असे सांगितले. नियमित योगाभ्यासामुळे निरोगी जीवनशैली विकसित करता येते. विद्यार्थ्यांनी आपल्या दैनंदिन जीवनात योग, प्राणायाम आणि ध्यान यांचा समावेश करावा,असे



आवाहनही त्यांनी केले. यावेळी त्यांनी तंबाखू,मद्य, अमली पदार्थ आणि इतर व्यसनांचे आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम स्पष्ट केले. व्यसनांमुळे शारीरिक व मानसिक आरोग्य बिघडण्याबरोबरच कौटुंबिक आणि सामाजिक जीवनावरही विपरीत परिणाम होतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहून आरोग्यदायी जीवनशैलीचा स्वीकार करावा, असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.अभिजीत अणे होते त्यांनी आपल्या मनोगतामध्ये विद्यार्थ्यांना देशाचा सुदृढ नागरिक बनण्यासाठी व्यसनापासून दूर राहून स्वतःची प्रगती व देशाचा विकास याकडे लक्ष द्यावे असे आवाहन केले,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.नीलिमा दवणे यांनी प्रास्ताविक मनोगतामध्ये विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीविषयी जागरूकता निर्माण करणे, योगाचे महत्त्व पटवून देणे आणि निरोगी समाजाच्या निर्मितीसाठी तरुणांना प्रेरित करणे हा या व्याख्यानाचा प्रमुख उद्देश समजावून सांगितला.या,कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ प्रसाद खानझोडे यांच्या मार्गदर्शनामध्ये करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.विकास जूनगरी यांनी केले तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक दीपक शाहू यांनी केले २१५ विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला.

# जिल्हा परिषद येथे जलजीवन मिशनच्या देयकांसाठी आंदोलन!

## जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागात कंत्राटदारांचा ठिय्या..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २२ :** जलजीवन मिशनअंतर्गत ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांची कामे करूनही देयके मिळत नसल्याने कंत्राटदारांचा संयम सुटू लागला आहे. दोन वर्षांपासून थकीत देयकांचा प्रश्न प्रलंबित असल्याने कंत्राटदार संघटनेच्या वतीने गुरुवारी जिल्हा परिषद कार्यालयातील ग्रामीण पाणीपुरवठा विभागासमोर आंदोलन करण्यात आले. यावेळी कंत्राटदारांनी ठिय्या देत प्रशासनाचे लक्ष वेधले आणि आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले.



### आश्वासनांपलीकडे ठोस निर्णय कधी?

**योजनांची कामे करूनही मोबदल्यासाठी आंदोलन करावे लागत असेल, तर ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या अंमलबजावणीवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने निधी वितरणाची निश्चित वेळ जाहीर करून प्रलंबित देयकांचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.**

नवीन पाणीपुरवठा योजनांसाठी ३० जुलै २०२६ रोजी प्राप्त झालेला २८ कोटी रुपयांचा निधी अद्याप कंत्राटदारांच्या खात्यात जमा झालेला नसल्याचा मुद्दा आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला. पुनर्सुधारित योजनांची देयके, मंजूर अंदाजपत्रके आणि अपूर्ण देयकांचा प्रश्नही यावेळी ऐरणीवर आला. 'काम केले, आता देयके द्या', अशा घोषणा देत कंत्राटदारांनी प्रशासनाकडे थकीत रक्कम तातडीने देण्याची मागणी केली. देयके रखडल्याने बाजारातील आर्थिक व्यवहार आणि कंत्राटदारांची पत धोक्यात आल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

# शेंबाळपिंप्री सर्कलमध्ये 'अवैध धंद्ये' फोफावले.!

## वरली/मटका, गुटखा,गावठी दारू खुलेआम सुरू, स्थानिक पोलीस यंत्रणेची संशयास्पद भुमिका?

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २२ :** खंडाळा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या शेंबाळपिंप्री मध्ये तसेच सर्कल परिसरात वरली/मटका,गुटखा आणि गावठी दारूच्या अवैध व्यवसायाची जोरदार चर्चा सुरू असून, या प्रकारामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे स्थानिक नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.

या परिसरातील अवैध धंद्यांवर कारवाई करण्याची जबाबदारी संबंधित पोलीस प्रशासनाची असतांना सर्वत्र धंदे खुलेआम सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. शेंबाळ पिंपरी ते मुळावा रोडवर पोलीस चौकीच्या २०० मीटरच्या परिसरात वरळी/मटका घेतल्या जातो परंतु याबाबत पोलिस यंत्रणा मात्र अनभिज्ञ कशी हा नागरिकांना पडलेला प्रश्न आहे, कारवाई होत नसेल तर त्यामागचे कारण काय? तसेच संबंधित पोलीस चौकी व




बीट जमादारांच्या कार्यपद्धतीची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तपासणी होणार का?असेही प्रश्न नागरिक विचारत आहेत. दरम्यान, या प्रकरणाबाबत खंडाळा पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांचे दुर्लक्ष कसे याबाबत नागरिकांना संशय निर्माण होत आहे. सध्या संपूर्ण जिल्ह्यात शेतकरी, शेतमजूर तसेच रोज मजुरी करणारा व्यक्ती दुष्काळामुळे होरपळून निघत आहे, मात्र शेंबाळ पिंपरी व सर्कल मध्ये मटका,गुटखा,व गावठी दारू हे अवैध धंदे फोफावले आहे. या व्यसनामुळे शेतकरी, मजूर, महिला व विद्यार्थी या अवैध व्यसनाकडे गुरफटत असल्यामुळे अनेकांचे घर उध्वस्त होण्याच्या मार्गावर लागले आहे.

त्यामुळे मुळे पुढील नागरिकांचे दुष्काळातील भविष्य धोक्यात आले आहे, अवैध धंदे आणि स्थानिक पोलीस यंत्रणा यांचे काही 'अर्थपूर्ण संबंध' आहेत का? असा गंभीर संशय काही नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे. त्यामुळे उपविभागीय पोलीस अधिकारी मोहीते यांनी शेंबाळपिंपरी व सर्कल मधील सुरू असलेल्या अवैध धंद्याबाबत वस्तुनिष्ठ चौकशी करून पुढील दिवाळीचा सण असल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन कोणताही औचित प्रकार घडू नये याची खबरदारी वेळेत घेऊन या अवैध धंद्याला आळा घालण्यात यावा अशी मागणी मोठ्या प्रमाणात स्थानिक नागरिकाकडून होत आहे.

# कागदोपत्री दारूबंदी, प्रत्यक्षात मात्र अवैध दारूविक्रीचा धुमाकूळ!

## वरूड जहांगीरमध्ये दारूविक्री पुन्हा सुरू महिलांच्या संघर्षाला खिंडार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**राळेगाव, दि. २२ :** राळेगाव तालुक्यातील आदिवासीबहुल वरूड जहांगीर येथे महिलांच्या पुढाकारातून बंद करण्यात आलेली अवैध दारूविक्री पुन्हा सुरू झाल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. कागदोपत्री दारूबंदी, पण प्रत्यक्षात दारू सहज उपलब्ध! अशी परिस्थिती निर्माण झाल्याने गावातील शांतता आणि महिलांच्या संसाराच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गावातील तरुणांसह अनेक जण दारूच्या आहारी गेल्याने काही कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत असल्याचे चित्र होते. याविरोधात



गावातील महिला बचत गट आणि महिलांनी एकजूट दाखवत दारूविक्री बंद करण्यासाठी पुढाकार घेतला. त्यानंतर गावातील अनेक कुटुंबांना दिलासा मिळाला होता. मात्र, आता पुन्हा अवैध दारूविक्री सुरू झाल्याची चर्चा आहे. काही विक्रेते दुचाकीवरून फिरत ग्राहकांना दारू पुरवत असल्याचा आरोप आहे. तर एका विक्रेत्याने झाडगाव मार्गावरील शेतात रस्त्यालगत आपला अड्डा तयार केल्याचेही सांगितले जात आहे. काही विक्रेते पोलिसांशी जवळचे संबंध असल्याचा दावा करीत असल्याने नागरिक उघडपणे बोलण्यास धजावत नसल्याची चर्चा आहे. अवैध दारूविक्रीला नेमका कोणाचा आशीर्वाद? हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. राळेगाव पोलिसांनी या तक्रारींची दखल घेऊन प्रत्यक्ष तपास करावा, दोषींवर कारवाई करावी आणि गावातील दारूविक्री कायमस्वरूपी बंद करण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# पुसद शहरात पुढील काळात एक दिवसआड प्रभाग बदल करून मिळणार पाणी

## सभेमध्ये नियोजनची चर्चा!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २२ :** सध्या संपूर्ण महाराष्ट्र सह यवतमाळ जिल्ह्यातही दुष्काळ जाणवत असल्यामुळे पुसद शहरातील नागरिकांना नियमित आणि स्वच्छ पाणीपुरवठा करण्यासाठी नगर परिषदेने हालचाली सुरू केल्या आहेत.

याबाबत नगराध्यक्षा मोहिनी नाईक यांच्या अध्यक्षतेखाली दि.२१ ऑक्टोंबर रोजी आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत शहरातील पाणीपुरवठ्याची सद्यस्थिती, उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन आणि एक दिवसाआड प्रत्येक दिवशी प्रभाग बदल करून पाणीपुरवठा करण्यासाठी सविस्तर सभेमध्ये चर्चा करण्यात



आली. पुढील आठवड्यात सविस्तर आढावा घेतल्यानंतर एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात येईल, असे प्रशासनाने सांगितले. या बैठकीला नगरसेवक डॉ. अकील मेमन, राजु दुधे,अॅड. भारत जाधव, यांच्यासह सर्व नगरसेवक व नगर परिषदेचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी नगरसेवकांनी प्रशासनाला योग्य नियोजनाबाबत सूचना दिल्या. पुसधरणातील जलसाठ्याचा काटकसरीने वापर करणे गरजेचे असल्याचे मुख्याधिकारी डॉ. किरण सुकलवाड यांनी सांगितले.

# ....पाहण्या भारत आपुला पुन्हा..!!

**रा**मायण, महाभारत किंवा ज्या काही पौराणिक कथा साहित्य आहे,त्याचा निश्चितच समाज जीवनावर परिणाम होतो.आचार्य राम शेवाळकर या साहित्याला महाकाव्य म्हणून परिचय द्यायचे.व्यासाचे महाभारत,वाल्मिकाचे रामायण,कालिदासाचे विविध संस्कृत साहित्य असो किंवा रामदासचे मनोबोध असो! सर्वकाही ते मानवी विचाराची दिशा निश्चित करणाऱ्या अनुभवाची साहित्य कृती आहे.

वारकरी संप्रदायाने नामभक्तीचे वैशिष्ट्य निर्माण करून, ईश्वर भक्तीत उद्धाराचे गमक सांगून ते कार्यविलीन राहिले. देह,देश आणि धर्म यात मानवी जमातीचा प्रवास आहे. देह म्हटले की त्याची पोषकता कायम ठेवण्याचे काय.'देश ही संकल्पना अवतीभवतीचा भू-प्रदेश; असा असला तरी त्यावर स्थावर जनसमाजाचा वावर व व्यवहार दिसून येतो.धर्माच्या कक्षेत ईश्वरनिर्मित रचनेचा परिपाठ, सूत्र, सोहळ,उपासना आणि पूजन अशा कर्माची जोड करून संस्कृतीची शृंखला जोडल्या गेली.

धर्म म्हणजे ईश्वर निर्मित जगाचा कारभार सुरळीत चालावा अशी धारणा ठेवून त्याची वर्तनप्रणाली सुरू ठेवणे.यात मग उपासक,साधक,धर्म रक्षक म्हणून जबाबदारी स्वीकारणारे धर्मवीर अशा अनेक बिरुदाने माखलेले व्यक्ती झालेत.त्यात स्त्री जातीचा समावेश अंशीक आहे.त्याची कारणे विविध आहे.त्याचा विस्तार करताना स्वतंत्र प्रकरण उभ राहत.त्यामुळे धर्म ही धारणा अजूनही स्पष्ट न झाल्याने त्याबद्दल चे रहस्य, कर्म-कांड याच्या कक्षेत सीमित आहे.

देशाची खरी ओळख स्वातंत्र्यानंतर अधोरेखित झाली.देश,राष्ट्र ही भूमिका संविधानाने निश्चित केली. प्रामुख्याने भारताचा विचार आपल्याला करताना भारताची ओळख विविध कालखंडात वेगवेगळी होती. मात्र भारताची ओळख कृष्ण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समाजशास्त्री, मानसशास्त्री, अर्थ शास्त्री, तर्कशास्त्री, तत्वज्ञ, वाङ्मयीन मूल्यवान, गणनायक म्हणून भूमिका पार पाडणाऱ्या महापुरुषांचा महाभारतातील भूमिकेचा परिचय खऱ्या अर्थाने स्वतंत्र भारताच्या राष्ट्रसंतांनी आवर्जून करून दिला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्य निर्मितीत अखिल भारताचा परिचय दिसून येतो.कारण त्यांच्या साहित्याची नाळ 'खेड्यांचा देश' म्हणून वसलेल्या भारतात राहणारी जनता आणि साध्याभोळ्या समाजाची मांडणी वास्तवा दर्शनाचे



प्रमाण आहे.

'या भारतात बंधू भाव नित्यवसु दे दे वरची असा दे !!'

ही संवैधानिक मागणी मुळातच लोकशाहीची व्याख्या त्यांच्या भजनातून स्पष्ट होते.भारतीय परिस्थितीचा आढावा मांडताना राष्ट्रसंत नेहमी गोपाळकृष्णाला आवळतात.

कधी येशील मनमोहना पाहण्याभारत आपुला पुनः !!

या भजनातून भारतीय स्थितीचा आढावा 'तुकड्याची आस कर पुरी,ये गरुडस्वार श्री हरी'म्हणून आपल्या अंतर्भावाची धारणा मोकळी करतात.त्यावेळी भारताची ओळख खऱ्या अर्थाने कृष्णकालीन आहे,याचे प्रमाण ते देताना भाविकांच्या मेळात दिसला हरि, धाऊनिया सगळ्यांचे कामे करी या भजन ओळीत भारतीय जनलोकांच्या भूमिकेला दिग्दर्शित करणारा कृष्णा सादर करताना राष्ट्रसंत विद्वानांच्या,पुराणिकांच्या आश्रयास नाही,सत्ताधारी महंतखोरी,यांना दुरुनी पाही.नम्र सदा सेवेला असतो असतो त्यांचे घरी, अशी प्रमाण देताना भारतीय समाज व्यवस्थेचा विचार करतात. ज्यामध्ये मध्यमवर्गीय जनतेच्या समाधानाची पातळी व उच्च आणि वंचित यांच्या मानसिकतेचा अभ्यास केला तर समाधानाची पातळी असंतुलित आहे,याची स्पष्टता तपासल्या गेली तर कृष्णाच्या भारतीय व्यवस्थेचे दर्शन आज ही होते.

म्हणून बहुजनांच्या कार्यासाठी सर्व महापुरुषांची भूमिका सिद्ध करताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या साहित्याची धाटणी निश्चितच बुद्धिवंताला आणि श्रमिकाला एकत्र करून विकास, उन्नती, समृद्धी,समाज बांधणी पासून तर बुद्ध बोध होई पर्यंतचा प्रवास निश्चितच सफल करू शकते.एवढा आत्मविश्वास स्वातंत्र्यानंतर भारतीय संत परंपरेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा अनुभव घेताना निश्चितच देता येतो.भारता ग्रहण लागले अती गुलाम जन जाहले!तोडण्या येई बंधना!!पाहण्या भारत आपुला पुन्हा! या सारखी भजने म्हणजे महाराजांच्या सनातन दृष्टीची शृंखला अनादी काळापासून स्थिती व गतीची संतुलित रचना अनुभव सिद्ध करते.

भारताची भूमिका ही राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेच्या निर्मितीतून सिद्ध तर केलीच ! परंतु भारताच्या बहुजनांचे नेतृत्व शेतकरी जमातीच्या हातात सुपूर्द केले.त्यामुळे ग्रामगीता शेतकऱ्याला समर्पित करून भारतीय अर्थ व्यवस्थेचा कणा शेती आहे तसेच विविध संस्कृतीचे दर्शन सुद्धा कृषी संस्कृतीतून भारताला लाभल्याचे दाखले अनुभवताना, राष्ट्रसंतांच्या भूमिकेला समजून घेण्याची संधी तिन्ही पिढ्याना आहे.या तिन्ही पिढ्यांची बैठक कुटुंबात समावेशीत आहे.त्यामुळे जगात जगण्याचा हेतू जाणून घ्यायचा असेल तर भारतीय संत परंपरेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जगने व जगवने या सिद्धांची ओळख निश्चितच करून घ्यावी.जे प्रमाण कधी येशील मन मोहना पाहण्या भारत आपुला पुन्हा या भजनातून अभ्यासक,उपासक, साधक, शोधक सर्वांना आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी निर्माण केलेली अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ ही संस्था त्यांच्या विचारायची कार्यप्रणाली आहे.वर्तमानात ती तपासण्याची जबाबदारी प्रत्येक भारतीयांची आहे.उणे दिसे ते पूरण करी,जगाचा तोल बोधे सावरी,केल्याचा स्पर्श नसे अंतरी ऐसे संत चमत्कारी..त्यामुळे बोध ही स्थिती मानवी वंशाच्या उद्धाराची पावती आहे.ती पावती प्राप्त करण्यासाठी देह,देश,धर्म समजून घेतला की न्याय,सत्य जीवनाचा अनुभव निश्चितच संत दिग्दर्शनात सफल आहे.

**कबीर फादर**
मो.७७९८६४५५६५

# वेदोक्त स्तोत्रमंत्रांचा अपभ्रंश

...गुजरातपासून जसजसे वरच्या दिशेने जायला लागलात की वेदोक्त स्तोत्रमंत्रांचा प्रभाव कमी होऊन त्याची जागा आरत्या,भजने आणि हिंदी/अवधी भाषेतील निरनिराळ्या दैवतांच्या चालिसा (हनुमान चालिसा सारख्या दुर्गा चालिसा, शनि चालिसा, भैरव चालिसा वगैरेही आहेत बरं) यांनी घेतली जाते.



वेदमंत्राचे घोष वगैरे कमी होऊन भजनांचे बोल जास्त ऐकू येतात. वेदमंत्र म्हणले तरी ते बहुतांशी अपभ्रंश झालेले, अशुद्ध असतात (व हे अक्षर शब्दाच्या सुरुवातीला आले की त्याचा हिंदीत बिनधास्त ब करतात....बसंत, बिरहा, बिनती) तिथल्या बहुतेक प्रार्थनांमधे तत्वज्ञान कमी आणि त्याऐवजी स्तुती आणि शरणागती चा उल्लेख जास्त असतो. उत्तरभारतीय मनुष्य (राजस्थान, युपी, बिहार, उत्तराखंड, हिमाचल, मध्यप्रदेश) हा अद्वैत तत्त्वज्ञान वगैरेपेक्षा चमत्कार या गोष्टीवर जास्त बोलतो... मूर्तीपूजेतील षोडश उपचारांमधील भोग (परशादी उर्फ प्रसाद) यावर त्याचा भर जास्त असतो. मोठमोठ्या धार्मिक स्थळांवरील पंडित, भटजी यांची उच्चारशुध्दतेची बोंब असते. ऋषिकेशला माझ्या आवाजात श्रीसूक्त ऐकून तिथल्या पंडीताने.... सर, आजतक ऐसा शिरीसूक्त नही सूना.... असे म्हणले (पण मी हे धाडस एखाद्या दाक्षिणात्य किंवा महाराष्ट्रातील भटजीसमोर करणार नाही तो भाग वेगळा)

महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नृसिंहवाडी, कोल्हापूर, कोकण आणि तिथून दक्षिणेकडे जायला लागलात की कठोर धर्माचरण, उच्चारशुध्दतेचा आग्रह, अनुष्ठान यावर भर जाणवायला लागतो. कर्मठता, शुचिर्भूतता जास्त प्रखर होत जाते. देवाच्या बाबतीत प्रार्थना निश्चित असल्या तरी त्यात फार शोऑफ, झगमगाट नसतो. वेदोक्त आणि पुराणोक्त स्तोत्र, सूक्ते यावर जास्त लक्ष केंद्रित केले जाते.प्रत्येक धार्मिक विधी आणि उपचारांचे महत्व गुरुजींना तोंडपाठ असते. शास्त्रशुद्ध आणि तार्किक शंकासमाधान ते करु शकतात. उत्तरेकडे फक्त 'वैसा ग्रंथोमें लिखा है भैय्या' यापलिकडे काही जास्त बोलले जात नाही आणि तुम्हीही जास्त खोलात जाऊ नये अशी अपेक्षा असते. अशी सगळी गंमतजंमत असते. डोळे, कान आणि मन उघडे ठेवून निरिक्षण केले की सगळे लक्षात येते. माझ्या निरिक्षणाशी तुम्ही सहमत असायलाच हवे असा माझा अजिबात आग्रह नाही.

**-सचिन परांजपे, पालघर**

# सणासुदीत वस्तूंच्या दरवाढीवर नियंत्रण आवश्यक

**दे**शात सणासुदीचा काळ सुरु झाला की काही ना काही कारणांवरून जाणीवपूर्वक या सणांच्या उत्साहावर विविध वस्तूंच्या किंवा खाद्यपदार्थांच्या किमतीत वाढ झालेली दिसून येते. साधारणपणे गेल्या चार दशकांपासून असा एक प्रघात पडून गेला आहे की, श्रावणापासून सुरु होणारी सणांची पर्वणी ही हमखासपणे महागाईला मोठे आमंत्रण देणारी ठरली आहे. कारण श्रावण महिन्यापासूनपुढे जवळपास सहा महिने सण, व्रतवैकल्य, उत्सव हे सुरु असतात. आपल्या भारतीय समाजव्यवस्थेत सण, उत्सव, व्रतकैवल्य, यात्रा यांना एक विशेष महत्व प्राप्त झाले आहे. भारतीय संस्कृती आणि समाजव्यवस्थेचा अविभाज्य भाग ठरतो. मनुष्याला जगण्यासाठी केवळ अन्नधान्य लागते असे नाही तर त्याच्या बरोबरीने त्याच्यातला आत्मविश्वास, इच्छाशक्ती किंवा उत्साह टिकवून ठेवण्याकरिता त्याला आणि समाजाला वेगवेगळ्या



उपक्रमांची, सणवारांची गरज पडते. आणि त्यातून मिळणारे मानसिक आणि भावनिक समाधान व्यक्ती आणि समाजासाठी एक मोठी ऊर्जा मानली जाते. म्हणून भारतीय सणवारांना मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो.

श्रद्धा, निष्ठा, भक्ती, अध्यात्म अशी जरी त्यामागची कारणे असली तरी मानसिक समाधान आणि आनंद हा त्यातला अत्यंत महत्वाचा भाग ठरतो. या सणासुदीच्या काळात वस्तू कितीही महागल्या तरीसुद्धा त्या खरेदी केल्या जातात. भलेही त्याचे खरेदी करण्याचे प्रमाण कमी होत असेल. परंतु प्राचीन काळापासून सण करण्याची भारतातल्या लोकांची मोठी परंपरा आहे. अर्थात या सणावारांच्या काळात बाजारपेठांमधली उलाढाल प्रचंड प्रमाणात वाढ होते. स्वाभाविकपणे हाच कालावधी लक्षात घेऊन अनेक अनेक वस्तूंच्या किमती जाणीवपूर्वक वाढत असतात. आणि आता तर तो गेल्या काही दशकांचा एक प्रकारे पायंडा झालेला आहे. यावेळची साखर आणि गूळदरवाढ हा आतापर्यंतची सर्वात मोठी दरवाढ मानली जात आहे. म्हणूनच ती देशाच्या अमृततुल्य दरवाढ म्हणता येऊ शकेल. अर्थातच सणासुदीच्या काळात साखरेचे दर नियंत्रणात आणण्याकरिता सरकारला विशेष प्रयत्न करावे लागले. आता ही सगळी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी बराच काळ लागू शकतो.

केंद्र सरकारकडून नेहमीच देशातील महागाई नियंत्रणात असल्याचे दावे केले जातात. परंतु आखाती युद्धानंतर त्याचे जागतिक स्तरावर वेगवेगळे परिणाम दिसून आले आहेत. आणि त्याचा मोठा फटका देशाच्या अर्थव्यवस्थेलाही झालेला आहे. अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होऊ शकते, याची कल्पना आल्यानेच अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेला वस्तू जपून वारण्यापासून ते अनावश्यक खरेदी आणि प्रवास टाळण्यापर्यंत त्यांनी काही सूचना केल्या होत्या. याचा अर्थ बाजारपेठांवर आणि अर्थव्यवस्थेवर सध्या वेगवेगळ्या पद्धतीचा ताण दिसून येतो. साखर दरवाढीची समस्या जर वेळीच हाताळली गेली. अन्यथा महत्वाच्या दसरा, दिवाळीत याच साखरेचे दर शंभर रुपये किलोपर्यंत होण्याची शक्यता निर्माण झाली असती. एकीकडे ही दरवाढ होत असतानाच रिक्षा, टॅक्सीची देखील भाववाढ झाली आहे. म्हणजे ज्या सणासुदीच्या काळात लोकांचा प्रवास वाढत असतो. विशेषतः गणपती, दिवाळी, होळी या काळात प्रवास करणाऱ्यांची संख्या ही सर्वाधिक असते. या दरवाढीचा परिणाम खासगी बसवाहतूक आणि उबेर, ओलसारख्या टॅक्सी भाड्यावर देखील झालेला दिसून येतो. या दुहेरी भडीमार सामान्य माणसाला सहन करावा लागणार आहे. अर्थातच महागाई वाढत असताना रिक्षा-टॅक्सी चालकांनाही इंधनाचा खर्च परवडावा म्हणून भाड्यात वाढ झाली. सणासुदीला दरवाढीची ही दरवर्षीचीच शृंखला असल्याचे स्पष्ट होते.

**प्रा. मधुकर चुटे**
नागपूर
मो.९४२०५६६४०४

# महान स्वातंत्र्य सेनानी राणी चेन्नमा

**इं**ग्रजांनी आपल्या देशावर सुमारे पावणे दोनशे वर्ष राज्य केले. या पावणे दोनशे वर्षांत त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय अत्याचार केले. इंग्रजांच्या याच अन्याय अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात अज्ञात देशभक्त बांधवांनी लढा दिला त्यात काही महिलाही होत्या.अशाच एका देशभक्त महिला कित्तुरची राणी चेनम्मा.



२३ ऑक्टोबर १७७८ रोजी बेळगाव येथील काकटी या छोट्या गावात राणी चेन्नमा यांचा जन्म झाला. लहानणापासूनच धाडसी असलेल्या राणी चेन्नमा यांना त्यांचे वडील धुळाप्पा देसाई गौड्रारू यांनी घोडेस्वारी करणे, तलवार चालवणे, भाला फेकणे याचे शिक्षण दिले. वयाच्या पंधराव्या वर्षी राणी चेन्नमा यांचा विवाह देसाई कुटुंबातील राजा मल्लसराज यांच्याशी झाला. मात्र १८२४ हे वर्ष त्यांच्यासाठी दुर्भग्याचे वर्ष ठरले कारण याच वर्षी त्यांच्या पतीचे आणि मुलाचेही निधन झाले. एकाच वर्षी पती आणि मुलगा सोडून गेल्याने त्यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. राजा मल्लसराज यांच्या निधनाने त्यांच्या राज्यात अस्थैर्य माजले याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी त्यांच्या राज्यावर आक्रमण करण्याचे ठरवले. इंग्रजांकडून राज्य वाचवण्याची फार मोठी जबादारी राणी चेन्नमा यांच्यावर येऊन पडली मात्र त्या डगमगल्या नाहीत. त्यांनी तात्काळ आपली राजधानी डोंगर भागात हलवली. राजगादीला वारस असावा म्हणून त्यांनी शिवलिंगप्पा नावाचा पुत्र दत्तक घेतला व त्याला राज्याचा उत्तराधिकारी बनवले.कोणत्याही परस्थितीत आपले राज्य इंग्रजांच्या ताब्यात जाऊ द्यायचे नाही असा निर्धारच राणी चेन्नमा यांनी केला होता.

कित्तुरचे राज्य हे धारवाड जिल्ह्यात येत होते. सेंट जॉन थाक्रेय हा त्यावेळी धारवाडचा गव्हर्नर होता तर चॅप्लिन हा कमिशनर होता. या दोघांनीही राणी चेन्नमा यांना राज्य खालसा करण्याची सूचना केली आणि तसे न केल्यास युद्धास तयार राहण्यास सांगितले. राणी चेन्नमा यांनी शेवटचा पर्याय म्हणून बॉम्बे प्रेसिडेंटचे लेफ्टनंट गव्हर्नर एल्फिन्स्टन यांना राज्य खालसा करण्याबाबत विनंती अर्ज केला मात्र त्यांनी तो धुडकावून लावत कितुरवर हल्ला चढवला. राणी चेन्नमा यांचे सैन्य आपल्याशी अशाप्रकारे धैर्याने मुकाबला करतील अशी अपेक्षा इंग्रजांना नव्हती त्यांनी राणी चेन्नमाच्या सैन्याला हलक्यात घेतले. राणी चेन्नमाचे सैन्याचे बळ इंग्रजांच्या तुलनेत अल्प होते मात्र राणी चेन्नमा यांनी आपल्या सैनिकांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. आपली राणी महिला असूनही इंग्रजांशी निकराने लढते हे पाहून त्यांनाही स्फुरण चढले आणि त्यांनी इंग्रज सैन्याचा पराभव केला. २१ फेब्रुवारी १८२९ रोजी इंग्रजांच्या कैदेतच राणी चेन्नमा यांचे निधन झाले. राणी चेन्नमा यांच्या निधनानंतरही राणीचे सैन्य इंग्रजांशी लढत राहिले मात्र तो लढा अपयशी ठरला. मात्र राणी चेन्नमा यांचे शौर्य पाहून इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांना सलाम केला. राणी चेन्नमा यांचे शौर्य इतिहासाच्या पानावरील एक स्फूर्तिदायक अध्याय आहे मात्र आजही हा इतिहास तरुण पिढीपासून दूर आहे म्हणूनच हा लेख प्रपंच. भारतीय इतिहासातील एक सुवर्ण अध्याय म्हणून राणी चेन्नमा यांच्या लढ्याकडे पाहायला हवे. जयंतीदिनी राणी चेन्नमा यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
मो.९९२२५४६२९५

# टीकेत रमणारा अहंकार

**वाईट बोलण्याने मनाला त्रास होतो तरीही तसेच का वागले जाते? याचे कारण अहंकार आहे. आपल्यात असणारा अहंकार स्वतःला बरोबर समजत असतो. त्यामुळे तो इतरांना चांगले म्हणण्याचे धाडस करत नाही.**

**क**धी विचार करून पाहिला आहे का, आपण इतरांना चांगले म्हणतो.एखादयाचे कौतुक करतो तेव्हा मन प्रसन्न असते. आतून एक भरून पावल्याची व्यापक भावना असते. ती स्वतःला आनंद देते, इतरांना देखील आनंद देते. असे असले तरीही दिवसभरात आपण अधिक वेळा चांगल्या ऐवजी वाईट विचार करतो किंवा इतरांना वाईट बोलत असतो. असे का होत असेल? वाईट बोलण्याने मनाला त्रास होतो तरीही तसेच का वागले जाते? याचे कारण अहंकार आहे. आपल्यात असणारा अहंकार स्वतःला बरोबर समजत असतो. त्यामुळे तो इतरांना चांगले म्हणण्याचे धाडस करत नाही. दुसऱ्यांना चांगले म्हटले तर स्वतःचे महत्त्व कमी होईल असेही वाटत असते. काही वेळा समोरच्याने खरंच चांगले काम केले आहे असे मनाला वाटत असते, परंतु तरीही विचार मुखावाटे बाहेर पडू न देणे हे अहंकार करतो. या अहंभावनेची इतकी सवय होत असते, की इच्छा झाली तरीही दुसऱ्यांना चांगले म्हणण्याची वाणीत ताकद नसते. असे पण काही अहंभावी असतात, की कोणी खूप चांगले वागले तरीही काहीतरी नकारात्मक बोलणे, टीका करणे एवढेच त्यांना जमते.

चांगल्याला चांगले म्हणण्याची, दुसऱ्याचे मनापासून कौतुक करण्याची व्यापकता अहंकारी माणसांत नसते. दुसऱ्याचे कौतुक करताना जीभवळत नाही, वळली तरी मोजून मापून शब्द बाहेर पडतात. तोंडदेखले, मनात नसताना किंवा चारचौघांत बरे वाटावे म्हणून बोलणे अहंकारातूनच येते. कधी कधी स्वतःचा फायदा व्हावा म्हणून खोटे कौतुक करणे स्वार्थी भावनेतून येते. आपला फायदा झाल्यानंतर त्याच व्यक्तीविषयी वाईट बोलणे हा अहंकार नीतिमत्ता ढासळणारा आहे.

**खळा सदा क्षुद्र दृष्टी ।**
**करी कष्टी सज्जना ।।**

क्षुद्र दृष्टीच्या दुर्जन लोकांचे लक्ष नेहमी वाईट हलक्या गोष्टींकडे असते. म्हणून ते सज्जनांना त्रास देतात असे तुकाराम महाराज म्हणतात. काही विशिष्ट विचारसरणीचे लोक दुसऱ्या विचारसरणीच्या लोकांवर सतत टीका करत असतात. ही टीका ज्ञानाधारित, विवेकाच्या आधारे असेल आणि योग्य समर्पक शब्दांत असेल तर ती विधायक अन्यथा स्वकेंद्रित, आधाररहित, गवनि, गलिच्छ शब्दांत होत असेल तर ती निषेधित आहे.

**चळले ते काय करी**
**बडबड ।**
**न म्हणे फिके गोड**
**भुकेले ते ।।**
**उमजल्याविण न धरी**
**संभाळ ।**
**असो खळखळ जनाची**
**हे ।।**

एखाद्याला खूप भूक लागली म्हणजे त्याला मिळेल ते अन्न तो खातो. तसेच ज्याला वेड लागले आहे, तो वाटेल तशी बडबड करणार नाही काय? तो शुद्धीवर आल्याखेरीज आपल्या शरीराचेही रक्षण करणार नाही, हे जाणून या लोकांच्या संगतीस न लागणेच बरे, असे संत तुकोबाराय म्हणतात.

इतरांची निंदा केल्याने काहीही साध्य होत नाही. समोरच्याला दुखावले जाते, तो पुन्हा निंदा करतो, यातून शब्दाला शब्द वाढत जातात, ज्यातून काहीही साध्य होत नाही. वैमनस्य तयार होते. मनात राग, बदल्याची भावना येते. अजून जास्त आक्रमक शब्द वापरले जातात. टीका ही सुधारणेच्या हेतूने केली जाते की स्वतःचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी यावर तिचे महत्त्व आहे. टीका करणे ही माणसाची सहज प्रवृत्ती आहे. एखाद्या व्यक्तीच्या वागण्यात, विचारांत किंवा कृतीत काही त्रुटी दिसल्यास त्याकडे लक्ष वेधणे चुकीचे नाही. उलट, योग्य वेळी केलेली प्रामाणिक टीका समोरच्या व्यक्तीच्या प्रगतीसाठी उपयुक्त ठरू शकते. परंतु, जेव्हा टीकेचा उद्देश चूक दाखवण्यापेक्षा व्यक्तीला कमी लेखणे, तिचा अपमान करणे किंवा तिच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवणे हा असतो, तेव्हा ती टीका न राहता अहंकाराचे प्रदर्शन बनते. अशी टीका ही विवेकयुक्त नसून मनातील असुरक्षितता, स्पर्धा आणि श्रेष्ठत्वाच्या भावनेचे प्रतिबिंब असते.

दुसऱ्याच्या व्यक्तिमत्त्वातील दोष दिसणे सोपे असते; परंतु स्वतःच्या व्यक्तिमत्त्वातील दोष स्वीकारणे कठीण असते. स्वतः राग व्यक्त केला तर तो स्वाभिमान वाटतो आणि दुसऱ्याचा स्वाभिमान अहंकार वाटायला लागतो. आजच्या जगात टीका करण्याची प्रवृत्ती अधिक सहज झाली आहे. समाजमाध्यमांवर एखाद्याच्या विचारांशी असहमती असल्यास त्याच्या व्यक्तिमत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. एखाद्या लेखातील विचारांवर चर्चा करण्याऐवजी लेखकाच्या पात्रतेवर टीका होते. एखाद्या व्यक्तीच्या कार्याचे मूल्यमापन करण्याऐवजी तिच्या हेतूंविषयी शंका घेतली जाते याचा अर्थ टीका करूच नये असा नाही अन्याय चुकीच्या प्रथा, अंधश्रद्धा, अनैतिकता किंवा सामाजिक दोष यांच्यावर विवेकाने चिकित्सक टीका होणे आवश्यक आहे.

दुसऱ्याच्या चुका दाखविण्यापूर्वी स्वतः चुका स्वीकारण्याचे धैर्य, दुसऱ्याचे यश पाहून आनंदी होण्याची उदारता आणि मतभेद असतांनाही आदर राखण्याची परिपक्वता आपल्यात विकसीत व्हायला हवी. टीकेच्या शब्दांत अहंकार नव्हे तर सुधारणेची भावना असायला हवी. मतभेदांत व्देष नव्हे, तर विवेक असायला हवा; आणि आपल्या विचारांत श्रेष्ठत्वाचा दर्प न ठेवता सत्याचा शोध घेण्याची भूमिका असायला हवी. माणसांची उंची त्याने किती लोकांच्या चुका शोधल्या यावर ठरत नाही, तर स्वतःच्या चुका ओळखून त्यांत किती सुधारणा केली यावर ठरते. कारण दुसऱ्याला कमी लेखण्याने आपली उंची वाढत नाही; स्वताला अधिक उन्नत करण्याने ती वाढते.

**डॉ. वर्षा खोत**
मो.९४२३५६५८८६



# कालव्यात अडथळा आणाल तर थेट फौजदारी कारवाई!

## वान प्रकल्प व्यवस्थापनाचा इशारा; रब्बी व कपाशी पिकांसाठी अतिरिक्त आवर्तन



■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

**तेल्हारा तालुक्यातील वान प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात रब्बी व कपाशी पिकांसाठी २२ ऑक्टोबरपासून अतिरिक्त आवर्तनाद्वारे पाणी सोडण्यात येणार आहे. मात्र, कालव्यात हेडिंग लावून पाणी अडविणे, कालव्याचे नुकसान करणे किंवा पाण्याचा प्रवाह रोखून इतर शेतकऱ्यांच्या सिंचनात अडथळा निर्माण करणे आता महागात पडणार आहे. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी वान प्रकल्प व्यवस्थापन उपविभागाने कडक इशारा दिला असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र सिंचन कायदा, १९७६ मधील कलम ४३ व ४४ तसेच लागू कायदेशीर तरतुदींनुसार फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचे जाहीर सूचनेत स्पष्ट केले आहे.**

लाभक्षेत्रातील प्रत्येक शेतकऱ्याला नियोजनानुसार पाणी मिळणे आवश्यक आहे. विशेषतः कालव्याच्या शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचविण्यासाठी प्रशासनाने प्राधान्याने नियोजन करण्याची गरज आहे. मात्र, काही ठिकाणी कालव्यामध्ये हेडिंग लावून पाणी अडविणे किंवा कालव्याचे नुकसान करून पाण्याचा प्रवाह रोखण्याचे प्रकार घडण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे. अशा प्रकारांमुळे पाणीवाटपाचे नियोजन कोलमडून शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांच्या पिकांना पाणी मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात.

आधीच शेतीचा वाढता खर्च, अनिश्चित हवामान आणि पिकांच्या उत्पादनाची चिंता यामुळे शेतकरी अडचणीत आहेत. अशा परिस्थितीत काहींच्या मनमानीमुळे इतर शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होणे अन्यायकारक आहे. त्यामुळे कालव्याच्या पाण्यावर स्वतःची मक्तेदारी गाजविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना प्रशासनाने स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे. वान प्रकल्प व्यवस्थापन उपविभाग, तेल्हारा यांनी प्रसिद्ध केलेल्या सूचनेनुसार, या नियमांची माहिती लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी सरपंच व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. गावांमध्ये सूचना फलक लावणे तसेच दवंडी देऊन शेतकऱ्यांना नियमांची जाणीव करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

कालव्याचे नुकसान करणे किंवा पाणी अडवून ठेवणे यांसारखे प्रकार आढळल्यास संबंधितांविरुद्ध कायद्यानुसार कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी सिंचन व्यवस्थेला सहकार्य करून पाण्याचा वापर नियमानुसार करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रशासनाने कठोर कारवाईचा इशारा दिला असला, तरी प्रत्यक्षात कालव्यांवरील अनधिकृत अडथळ्यांवर किती प्रभावी नियंत्रण ठेवले जाते, हे महत्त्वाचे ठरणार आहे. पाणीवाटपात पारदर्शकता, नियमित देखरेख आणि नियम मोडणाऱ्यांवर तातडीची कारवाई झाल्यासच शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पाणी पोहोचण्याची अपेक्षा पूर्ण होऊ शकते.

एका शेतकऱ्याची मनमानी आणि दुसऱ्याच्या पिकांचे नुकसान, हे समीकरण थांबविण्याचे आव्हान आता वान प्रकल्प व्यवस्थापनासमोर आहे. अतिरिक्त आवर्तनाचा लाभ सर्व शेतकऱ्यांना समान व नियोजनबद्ध पद्धतीने मिळतो का, याकडे संपूर्ण लाभक्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# पाण्याचा अपव्यय; हॉटेल व्यावसायिकाला ५ हजारांचा दंड

## संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर मनपाची कारवाई; नागरिकांनाही काटकसरीने पाणी वापरण्याचे आवाहन



■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरात संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी महापालिका प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. रामदास पेठ येथील रॉय रिट्रीट हॉटेलमध्ये पाण्याचा अपव्यय होत असल्याचे आढळून आल्याने पूर्व झोनच्या पथकाने संबंधित हॉटेल व्यावसायिकावर पाच हजार रुपयांची दंडात्मक कारवाई केली.

महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार शहरात झोननिहाय पथके कार्यान्वित करण्यात आली आहेत. या पथकांकडून पाण्याचा वापर आणि अपव्यय यावर लक्ष ठेवले जात आहे. गुरुवारी, २२ ऑक्टोबर रोजी तपासणीदरम्यान रॉय रिट्रीट हॉटेलमध्ये पाण्याचा अपव्यय होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. संभाव्य पाणीटंचाईच्या काळात नागरिकांनी पिण्याचे पाणी तसेच भूगर्भातील पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करावा, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे. शहरात पाण्याची पाइपलाइन फुटलेली आढळल्यास, सार्वजनिक अथवा खासगी बांधकामांमध्ये महापालिकेच्या पिण्याच्या पाण्याचा किंवा बोअरवेल व विहिरीच्या पाण्याचा वापर होत असल्यास नागरिकांनी प्रशासनाला माहिती द्यावी.तसेच आरओ प्लांटवर महापालिकेच्या पाण्याचा वापर होत असल्याचे आढळल्यास त्याची तक्रार ०७२४-२४३४४१२ या क्रमांकावर नोंदवावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## इनरव्हील क्लब अकोलाच्या 'इनरव्हील फिस्टा' ला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अकोला :** इनरव्हील क्लब अकोला तर्फे वर्धमान भवन येथे भव्य दिवाळी व दसरा विशेष 'इनरव्हील फिस्टा' प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन अमरावतीच्या जिल्हाधिकारी सौ. सौम्या चांडक यांच्या हस्ते करण्यात आले.या प्रदर्शनात दिवाळी व दसरा सणानिमित्त लागणारे शोभिवंत साहित्य व विविध वस्तूंचे एकूण ६० स्टॉल लावण्यात आले. यामध्ये गृहउपयोगी वस्तू, ज्वेलरी, रेडिमेड ड्रेसेस, ड्रेस मटेरियल, बेडशीट, साड्या, रेझिन आर्ट, नर्सरी, आकर्षक तोरण, दीये आदी वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात आल्या. अकोल्यासह खामगाव, शेगाव येथून देखील महिला उद्योजिकांनी सहभाग घेतला.

### Change In Name

I Have change my name after marriage
**DIPALEE VISHWAMBHAR JAMBHE**
-TO-
**DIPALI PRAVIN ROTHE**
My Residential address is RENUKA NAGAR BORGAON MANJU TQ DIST AKOLA-444101

### नावात बदल

माझे लग्ना आधीचे नाव (जूने नाव )
**स्मृति श्रीराम जोशी**
असे होते. आता लग्नानंतर
माझे नाव (नवीन नाव)
**स्मृती परशुराम पारसकर**
असे झाले आहे. कृपया नोंद घ्यावी.
**पत्ता :** शिवचरण पेठ, जुने शहर, अकोला

### जाहीरनामा

**दिवाणी व फौजदारी न्यायालय क. स्तर, अकोला यांचे न्यायालय क ०२ अकोला**

किरकोळ फौजदारी अर्ज क्रमांक १४१८/२०२६ — चौकशी तारीख २७.११.२०२६

**अर्जदार :** पंकज श्रीकांत इधोळ

... **विरूध्द**.....

**गैरअर्जदार :** जन्म मृत्यु निबंधक

वि.न्यायालयाच्या आदेशानुसार या जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येते आहे की अर्जदार नामे Pankaj Shrikant idhol जन्म दिनांक ३१.०३.१९७८ रोजी जैन नरसिंग होम, अकोला. येथे जन्म झाला, असून त्यांचा जन्माची नोंद म.न.पा. महानगर पालिका येथे नसल्या कारणाने त्यांच्या जन्माची नोंद होण्याकरीता त्यांनी Application Under Section 13 (3) of The Birth And Death Registration Act 1969 For Taking the Entry of Death /Birth अश्या स्वरूपाचा अर्ज न्यायालयात दाखल केलेला आहे. त्यावर पारीत झालेल्या आदेशानुसार या जाहिर नोटिसद्वारे त्यांचे जन्माची नोंद होणेसंदर्भात कुणालाही काही आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी पुढील चौकशी तारीख २७.११.२०२६ रोजी किंवा त्यापुर्वी स्वतः किंवा वकीलामार्फत आक्षेप नोंदवावा जर चौकशी तारीख २७.११.२०२६ पर्यन्त कोणाचेही काही आक्षेप आले नाही तर कुणाचेही काही आक्षेप नाही असे समजुन पुढील आदेश पारीत केल्या जातील असे सर्वांना या जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येत आहे. आज दिनांक २१ माहे ऑक्टोंबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय तथा न्यायदंडाधिकारी**
**प्र. श्रेणी कोर्ट क्र. ०२ अकोला**

### जाहीर नोटीस

**वि.०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७५७/२०२६ — प्रोसेस नं.१३४४३/२०२६
चौ.ता. २७/११/२०२६ — दिनांक : २१/१०/२०२६

**अर्जदार :** १. सौ. जयश्री विनोद गिते कु. जयश्री मनोहर नवरखेडे (लग्नाआधीचे नाव) रा. इसोली, ता. चिखली, जि. बुलढाणा. २. सौ. रिता दिनेश मेंढे (लग्नानंतरचे नाव) कु. रिता मनोहर नवरखेडे (लग्नाआधीचे नाव) रा. प्लॉट नं. ४३, राजेन्द्र नगर, के. डी. के. कॉलेज रोड, नागपुर, ता. जि. नागपुर. ३. सौ. सपना नितीन वेलेकर (लग्नानंतरचे नाव) सपना मनोहर नवरखेडे (लग्नाआधीचे नाव) रा. व्दारा नितीन वेलेकर, भगवानपूर, खरगोन, मध्यप्रदेश. ४. सौ. पल्लवी सचिन वेलेकर (लग्नानंतरचे नाव) पल्लवी मनोहर नवरखेडे (लग्नाआधीचे नाव) रा. मोठी उमरी, फत्तेपूरवाडी, अकोला. ता. जि. अकोला. ह. मु. क्र. ४ व ५ रा. व्दारा नंदकिशोर विजय लाड, खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** १. सौ. अनुराधा देवेन्द्र गिते (लग्नानंतरचे नाव) कु. अनुराधा मनोहर नवरखेडे (लग्नाआधीचे नाव) रा. प्राजक्ता कन्या शाळेजवळ, न्यु खेतान नगर, कौलखेड, अकोला. २. सौ. यशोदा नंदकिशोर लाड (लग्नानंतरचे नाव) कु. यशोदा मनोहर नवरखेडे (लग्नाआधीचे नाव) रा. खेतान नगर, मंगरूळपीर रोड, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला. ३. प्रविण मनोहर नवरखेडे रा. लक्ष्मी नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

**मयताचा पत्ता :-** मयत : सुमन मनोहर नवरखेडे

**पत्ता :-** रा. मोठी उमरी, फत्तेपूरवाडी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुमन मनोहर नवरखेडे यांचे दि. ०४/०६/२००८ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३०९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

### जाहीर नोटीस

**वि.०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७३०/२०२६ — प्रोसेस नं.१३१२५/२०२६
चौ.ता. २१/११/२०२६ — दिनांक : १४/१०/२०२६

**अर्जदार :** १. राजेश महाविर नायगावकर रा. मोचीपुरा, अकोट फैल, अकोला. ता. जि. अकोला. मो. क्र. ९५५२११६०९३ २. श्रीमती. कमला नाथलाल शिंदे रा. मोचीपुरा, अकोट फैल, अकोला. ता. जि. अकोला. ३. राधाबाई बैजुलाल चत्रे रा. देवपूरा, धुळे. ता. जि. धुळे. ४. कविता सुरेश चत्रे रा. देवपूरा, धुळे. ता. जि. धुळे. ५. राधेशाम नारायण नायगावकर ६. दुर्गलाल नारायणन नायगावकर क्र. ५ व ६ रा. रा. मोचीपुरा, अकोट फैल, अकोला. ता. जि. अकोला. ७. मीनाबाई मातादिन जपसरेरा. कदमकुंड वार्ड २९, गोविंद किराणा मागे, खांडवा. ता. जि. खांडवा. एम. पी. ८. सविता प्रकाश कुरिल रा. वार्ड नं. ४, तिसरा माळा, बुऱ्हाणपुर, ता. जि. बुऱ्हाणपुर, एम.पी.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : खेमचंद मयकु नायगावकर

**पत्ता :-** रा. अशोक नगर, मोचीपुरा, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत खेमचंद मयकु नायगावकर यांचे दि. २३/०१/१९९९ रोजी राहते घरी अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/११/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६०३/२०२६ — प्रोसेस नं.१२०५४/२०२६
चौ.ता. ०७/११/२०२६ — दिनांक : २२/०९/२०२६

**अर्जदार :** १. विजय श्रीराम अढाऊ २. सुभाष श्रीराम अढाऊ ३. कोकीळाबाई अजाबराव हिंगणकर क. १ ते ३ रा. गांधीग्राम, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** विठ्ठल श्रीराम अढाऊ रा. गांधीग्राम, ता. जि. अकोला.

**मयताचा पत्ता :-** मयत :१. श्रीराम सदाशिव अढाऊ २. सरूबाई श्रीराम अढाऊ

**पत्ता :-** रा. गांधीग्राम, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्रीराम सदाशिव अढाऊ यांचे दि. २५/१०/२०१४ रोजी व मयत सरूबाई श्रीराम अढाऊ यांचे दि. ०५/०२/२०२६ रोजी गांधीग्राम ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**येथील वि. ०८वे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) यांच्या न्यायालयात**

'वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स'
(दिवाणी व्यवहार संहिता, नियमक्रम ५, नियम १,५)
अनुसूची एक, परिशिष्ट ब,क्र. २

वि.दि.दा.नं.१३७/२०२६ — प्रोसेस न. : १३३७
चौ. ता. : १७/११/२०२६ — दिनांक : - १९/१०/२०२६
दावा रु. /-

**श्याम ... विरुध्द ... मधुकर**

**बनाम :-** २. राहुल मधुकरराव मगर,
रा. भगीरथ वाडी, वाशिम बायपास, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला व रा. पोस्ट शिवणी, अकोला, ता. जि. अकोला.

ज्याअर्थी, वादी यांनी 'SUIT FOR DECLARATION, DAMAGES, CORRECTION OF REVENUE, PERMANENT INJUNCTION AND PERPETUAL INJUNCTION.' यासाठी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे, त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक १७/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रशंचे उत्तर देउ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, समन्स बजावल्यापासून ३० दिवसाचे आत तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) पुष्टयर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करुन ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाउन त्याचा निर्णय केला जाईल.' आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमून केलेल्या तारखेस किंवा कालावधीत बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्हा कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल. आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी अकोला येथे माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. समन्स मिळाल्यापासुन ३० दिवसाच्या आत लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोला

# एकता नवदुर्गा मंडळाच्या उत्सवात एकजुटीचे दर्शन

## आठ हजार नागरिकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ



■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील मलकापूर परिसरातील व्ही.एच.बी. कॉलनी येथील एकता नवदुर्गा उत्सव मंडळाच्या वतीने आयोजित नवरात्रोत्सवाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यकर्त्यांची एकजूट, सामूहिक नियोजन आणि नागरिकांच्या सहभागातून उत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले. १३ फूट उंचीची देवीची मूर्ती, आकर्षक मंडप सजावट, गरबा रास आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम उत्सवाची प्रमुख आकर्षणे ठरली.

११ ते २३ ऑक्टोबरदरम्यान आयोजित या उत्सवाची सुरुवात घटस्थापना व देवीच्या आगमन सोहळ्याने झाली. नवरात्रोत्सवाच्या कालावधीत विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांसह स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. ललिता पंचमीला महिला भजन मंडळाचे सादरीकरण, तर अष्टमीला होमहवन करण्यात आले.

**आज सायंकाळी विसर्जन मिरवणूक**

दररोज आयोजित गरबा रासमध्ये तरुणाईचा सहभाग लक्षणीय होता. महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. गरबा नृत्य आणि पारंपरिक वेशभूषा स्पर्धेतील विजेत्यांना दररोज पारितोषिके देण्यात आली. लहान मुलांच्या गरबा नृत्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. बुधवारी (दि. २१) आयोजित महाप्रसादाचा सुमारे आठ हजार नागरिकांनी लाभ घेतला.

उत्सवादरम्यान विविध क्षेत्रांतील मान्यवरांसह सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांनी मंडळाला भेट दिली. पोलीस अधिकाऱ्यांनीही आरतीला उपस्थिती लावून देवीचे दर्शन घेतले. अध्यक्षपदाऐवजी सामूहिक नेतृत्वाची संकल्पना, मंडळात स्वतंत्र अध्यक्ष नसून प्रत्येक कार्यकर्ता हा अध्यक्ष असल्याची संकल्पना राबविण्यात येते. या सामूहिक नेतृत्वातून कार्यकर्त्यांनी विविध जबाबदाऱ्या पार पाडत उत्सवाचे नियोजन केले. व्ही.एच.बी. कॉलनीतील नागरिकांच्या सहभागामुळे सामाजिक एकोपा आणि एकजुटीचे चित्र पाहायला मिळाले. आज शुक्रवारी (दि. २३) सायंकाळी ६ वाजता देवीच्या विसर्जन मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. या मिरवणुकीत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

### जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७३८/२०२६ — प्रोसेस नं.१३११२/२०२६
चौ.ता. ०४/१२/२०२६ — दिनांक : १३/१०/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती वंदना आत्माराम अडकणे २. मनिष आत्माराम अडकणे ३. मंगेश आत्माराम अडकणे तिघेही रा. पंचशिल नगर, खरप रोड, खरप बु, ता. जि. अकोला. ४. विद्या अनिल घरडे रा फ्लॅट नं. ११, गणराज अपार्टमेंट, अंबड लिंक रोड, बुरकुटे हॉल, अंबड शिवार, नाशिक. ता. जि. नाशिक.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : आत्माराम पुनाजी अडकणे

**पत्ता :-** रा. पंचशिल नगर, खरप रोड, खरप बु, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत आत्माराम पुनाजी अडकणे यांचे दि. १८/१०/२०२१ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/१२/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्त्रतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १३/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७२६/२०२६ — प्रोसेस नं.१३०५३/२०२६
चौ.ता. २३/११/२०२६ — दिनांक : १२/१०/२०२६

**अर्जदार :** १. राधेश्याम नारायण नायगावकर २. दुर्गलाल नारायण नायगावकर रा. मोची पुरा, अकोट फैल, अकोला. ता. जि. अकोला. ३. मीनाबाई मातादिन जपसरे रा. मकान नं. १३, गल्ली नं. ४, छोटा आवार पद्मकुंड वार्ड २९, गोविंद किराणाच्या मागे, खांडवा, एम. पी. ४. सविता प्रकाश कुरील रा. वार्ड नं. ४, तिसरी लेन, बुऱ्हानपुर, ता. जि. बुऱ्हानपुर, एम. पी.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : बजरंग नारायण नायगावकर

**पत्ता :-** रा. परदेशीपुरा, अकोट फैल, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत बजरंग नारायण नायगावकर यांचे दि. २९/०९/२०२४ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/११/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# डाबकी रोडवरील अतिक्रमणावर मनपाचा हातोडा



## रस्ता रुंदीकरणातील अडथळे हटविण्यासाठी निष्कासनाची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोला ■

डाबकी रोड मुख्य रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामात अडथळा ठरणाऱ्या अनधिकृत बांधकामांविरुद्ध अकोला महानगरपालिका प्रशासनाने गुरुवारी, २२ ऑक्टोबर रोजी निष्कासनाची कारवाई केली.

पश्चिम झोनअंतर्गत सापधारे यांच्या वाणिज्य वापरातील अनधिकृत बांधकामावर ही कारवाई करण्यात आली.

मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त गणेश शहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण निर्मूलन पथकाने ही मोहीम राबविली. डाबकी रोडच्या रुंदीकरणाचे काम सुरळीतपणे पूर्ण करण्यासाठी रस्त्याच्या कामात अडथळा निर्माण करणारी अतिक्रमणे हटविण्यावर प्रशासनाने भर दिला आहे.

दरम्यान, रुंदीकरणाच्या कामात अडथळा ठरणारी अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे संबंधितांनी स्वतःहून हटवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाने केले आहे.

या कारवाईत सहायक आयुक्त गजानन घोंगे, सहायक अतिक्रमण अधिकारी चंद्रशेखर इंगळे, प्रवीण मिश्रा, कनिष्ठ अभियंता समीर मालवे, रवींद्र जाधव यांच्यासह अतिक्रमण निर्मूलन पथकातील प्रतीक मांडवे, सागर जुनगडे, सोनू गायकवाड, स्वप्नील पवार, धम्मानंद वानखेडे आणि जावेद खान आदी सहभागी झाले होते.

# जखमी विद्यार्थ्याला आधी उपचार की वडिलांची हजेरी

## आष्टी ग्रामीण रुग्णालयाचा कारभार चर्चेत, रक्तस्राव होत असताना उपचारासाठी कथित टाळाटाळ; मदतीला धावलेल्या शिक्षकाचा संतापजनक अनुभव

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

अपघातात जखमी झालेल्या विद्यार्थ्याला तातडीने उपचार मिळणे अपेक्षित असताना आष्टी ग्रामीण रुग्णालयात त्याच्या वडिलांना हजर करण्याचा आग्रह धरण्यात आल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. पायाला दुखापत होऊन रक्तस्राव होत असलेल्या विद्यार्थ्याला मदतीसाठी रुग्णालयात घेऊन गेलेल्या शिक्षकाने हा अनुभव कथन केला. या प्रकारामुळे ग्रामीण रुग्णालयातील आपत्कालीन उपचार व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, आरोग्य विभागाने या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी होत आहे.



**वेदनेने विव्हळणाऱ्या विद्यार्थ्याला शिक्षकाचा आधार**

मिळालेल्या माहितीनुसार, आष्टी तालुक्यातील बंबरडा येथील एका शालेय विद्यार्थ्याचा दुचाकीवरून पडल्याने पायाला गंभीर दुखापत झाली. जखमेतून रक्तस्राव होत असताना हा विद्यार्थी थार बसस्थानक परिसरात पोहोचला. त्याचवेळी बोरखेडी येथील शिवशंकर नामक शिक्षक विद्यालयात जाण्यासाठी बसस्थानकावर आले होते. जखमी अवस्थेतील विद्यार्थ्याची परिस्थिती पाहून त्यांनी त्याला मदत करण्याचा निर्णय घेतला.

विद्यार्थ्याला तातडीने वैद्यकीय उपचारांची गरज असल्याचे लक्षात घेऊन शिक्षकाने त्याला आपल्या वाहनातून आष्टी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, रुग्णालयात पोहोचल्यानंतर उपचार सुरू करण्याऐवजी विद्यार्थ्याच्या वडिलांना हजर करण्याचा आग्रह धरण्यात आल्याचे शिक्षकाने सांगितले. वडील येईपर्यंत डॉक्टर उपचार करण्यास तयार नसल्याचा आरोपही त्यांनी केला.

**माणुसकीने मदत करणाऱ्यांनी पुढे यायचे तरी कसे**

अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन वारंवार केले जाते. अशा परिस्थितीत जखमी विद्यार्थ्याला रुग्णालयात पोहोचवणाऱ्या शिक्षकाला उपचार मिळवून देण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागल्याचा आरोप गंभीर आहे. जखमी व्यक्तीला वेळेत वैद्यकीय मदत मिळणे महत्त्वाचे असताना पालकांच्या उपस्थितीचा आग्रह नेमका कोणत्या कारणासाठी धरण्यात आला, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

**चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी**

शिक्षकाने विद्यार्थ्याचे नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर दैनिक पुण्यनगरीशी बोलताना हा अनुभव सांगितला. या घटनेतील आरोपांची सत्यता तपासून संबंधित डॉक्टरांची भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याला नेमके कोणते उपचार देण्यात आले, उपचार सुरू करण्यात विलंब झाला का आणि पालकांना बोलावण्यामागील कारण काय होते, याची चौकशी आरोग्य विभागाने करावी, अशी मागणी होत आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांसाठी शासकीय रुग्णालये ही महत्त्वाची आरोग्यसेवा केंद्रे आहेत. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेत उपचार मिळण्याची व्यवस्था प्रभावी असणे गरजेचे आहे. या प्रकरणाची आरोग्य विभाग दखल घेऊन चौकशी करणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# भक्तिरंगात रंगले बाल उद्यान

## मारोती वार्डात नवरात्रोत्सव उत्साहात; स्पर्धांतील विजेत्यांचा गौरव, मान्यवरांचा सन्मान



**हिंगणघाट/जनमाध्यम**

आदिशक्तीचा जागर, गरब्याचा ताल आणि चिमुकल्यांच्या कलागुणांचा अविष्कार अशा भक्तिमय वातावरणात मारोती वार्ड क्रमांक २ मधील स्व. मीनाताई बा. ठाकरे बाल उद्यान येथील सार्वजनिक हनुमान मंदिर परिसरात ११ ते १९ ऑक्टोबरदरम्यान नवरात्रोत्सव साजरा करण्यात आला. रास रसिका गरबा ग्रुपच्या पुढाकाराने आयोजित या उत्सवाला परिसरातील नागरिक, महिला आणि युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. उत्सवाच्या पहिल्या दिवशी आदिशक्तीच्या प्रतिमेची स्थापना व आरती करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर चिमुकल्यांसाठी मनोरंजक खेळ, चित्रकला, वेशभूषा आणि नृत्य स्पर्धा घेण्यात आल्या. रास रसिका गरबा ग्रुपच्या गरबा नृत्याने उत्सवात रंगत आणली. पुरुषवर्गानेही गीतगायनाचा आनंद घेतला. स्पर्धांतील विजेत्या व सहभागी मुला-मुलींना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. प्रमुख अतिथी श्रीमती प्रा. देशमुख, श्रीमती राजुरकर आणि श्रीमती कुंभारे यांच्यासह परीक्षक किशोर भांदककर, प्रियंका घवड आणि ज्योती पराते यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. अतुल नंदागवळी यांचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमासाठी मोना चौधरी, स्वाती कावळे, भावना कुपले, प्रीती दरणे, अंजली कावळे, मंगला बुरघाटे, मनीषा येनोरकर, आदिती कोमुजवार, किरण बल्लेवार, हेमलता वांढरे, सोनाली नव्हाते, अंजुषा चिटटवार आणि मंजुषा चिटटवार यांनी परिश्रम घेतले. राहुल नव्हाते यांनी ध्वनियंत्रणा आणि जबाबदारी सांभाळत सहकार्य केले.

# दुष्काळाचे संकट, डोक्यावर कर्जाचा डोंगर; ५९ वर्षीय शेतकऱ्याची आत्महत्या

**सेलू/जनमाध्यम**

दुष्काळ, सततची नापिकी आणि थकीत कर्जाच्या ओझ्यामुळे शेतीसमोरील संकट अधिक गडद होत असताना सेलू तालुक्यातील धानोली (गावंडे) येथे ५९ वर्षीय शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना बुधवारी उघडकीस आली. संतोष महादेव सयाम असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांच्या मृत्यूमुळे गावात शोककळा पसरली आहे.



संतोष सयाम यांच्याकडे चार एकर शेती होती. शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून होता. मात्र, यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाले. त्यातच बँक ऑफ इंडियाचे कर्ज थकीत असल्याने आर्थिक अडचणी वाढल्याची माहिती आहे. कर्जाची परतफेड कशी करायची आणि कुटुंबाचा खर्च कसा भागवायचा, या विवंचनेत ते असल्याचे सांगण्यात येते.बुधवारी सकाळी त्यांनी घरासमोरील झोपडीत गळफास घेऊन जीवन संपविले. घटनेची माहिती समोर आल्यानंतर परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली. शेतीतील अनिश्चित उत्पन्न, नापिकी आणि कर्जाचा वाढता भार यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसमोरील आर्थिक प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर मृत शेतकऱ्याच्या कुटुंबाला शासनाने तातडीने आर्थिक मदत करावी, तसेच कुटुंबाला आवश्यक आधार द्यावा, अशी मागणी होत आहे. संबंधित यंत्रणांनी घटनेची चौकशी करून नियमानुसार मदतीबाबत कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# कॅप्टन मोहन गुजरकर यांची मुख्य परीक्षक म्हणून निवड

**वर्धा/जनमाध्यम**

भारत स्काउट्स आणि गाईड्सच्या राष्ट्रीय कार्यालयाकडून गुजरात राज्यातील आनंद येथे २२ ते २६ ऑक्टोबरदरम्यान आयोजित राष्ट्रपती रोव्हर स्काऊट टेस्टिंग कॅम्पसाठी वर्ध्याचे कॅप्टन मोहन गुजरकर यांची मुख्य परीक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. या शिबिरासाठी ते रवाना झाले आहेत. आनंद येथे गुजरात भारत स्काउट्स आणि गाईड्स तसेच वेस्टर्न रेल्वे भारत स्काउट्स आणि गाईड्स या दोन विभागांतील रोव्हर्ससाठी राष्ट्रपती रोव्हर स्काऊट परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे.या परीक्षेचे मुख्य परीक्षक म्हणून कॅप्टन गुजरकर जबाबदारी सांभाळणार आहेत.



कॅप्टन मोहन गुजरकर हे देवळी येथील एस.एस.एन.जो. महाविद्यालयात इंग्रजी व इतिहास विषयाचे प्राध्यापक आहेत. तसेच ते एनसीसी अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी आणि राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय त्यांनी गृहरक्षक दलाचे जिल्हा समादेशक म्हणूनही काम पाहिले आहे. त्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# संघर्षाला सलाम समाजासाठी झटणाऱ्या नवदुर्गांचा गौरव

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा स्त्रीशक्तीला सन्मान

**वर्धा/जनमाध्यम**

कुणी महिलांच्या हक्कांसाठी लढते, कुणी वंचित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणते, तर कुणी गरजू रुग्णांची निःस्वार्थ सेवा करते. समाजातील अशा कर्तृत्ववान महिलांच्या कार्याचा गौरव करत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने वर्ध्यात ‘जागर स्त्रीशक्तीचा, सन्मान नारीशक्तीचा’ या राज्यव्यापी मोहिमेंतर्गत नऊ नवदुर्गांचा सत्कार करण्यात आला.



बुधवारी (२१ ऑक्टोबर) वर्धन हाट झुणका-भाकर केंद्राच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात राजेश धोटे म्हणाले, महिलांनी अबला न राहता आपला सन्मान जपला पाहिजे. संविधानाने महिलांना समानतेचा अधिकार दिला असून, त्यांनी स्वाभिमानाने आणि आत्मविश्वासाने जगावे, असे आवाहन त्यांनी केले.

या वेळी पोलीस निरीक्षक पौर्णिमा राखुंडे, नगराध्यक्ष डॉ. सुधीर पांगुळ, अरुण चवडे, द्वारकाताई इमडवार आणि गजेंद्र सुरकार उपस्थित होते.सत्कार झालेल्यांमध्ये मुलींचे प्रबोधन करणाऱ्या पौर्णिमा राखुंडे, आशा सेविकांच्या प्रश्नांसाठी लढणाऱ्या ज्योत्स्ना राऊत, कराटेपटू पोलीस कर्मचारी शरीन शेख, गरजू रुग्णांची सेवा करणाऱ्या दीपा तांबेकर, संकटग्रस्त महिलांना आधार देणाऱ्या रेशमा रघापाटे, वंचित मुलांना शिकविणाऱ्या प्राजक्ता मुते, महिला प्रश्नांसाठी लढणाऱ्या दुर्गा काकडे, सत्यशोधक विचारांचा प्रसार करणाऱ्या रोहिणी पाटील आणि स्वच्छतेसाठी कार्यरत पिंकी नकवे यांचा समावेश होता. मान्यवरांच्या हस्ते शाल, स्मृतिचिन्ह आणि समितीच्या मुखपत्राचा अंक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन सारिका डेहनकर यांनी केले.

## शरद पौर्णिमेच्या चांदण्यात रंगणार भक्तीचा जागर

# येळाकेळीत रविवारी कोजागिरी महोत्सव

**येळाकेळी (वर्धा)/जनमाध्यम**

शरद पौर्णिमेच्या मंगलमय पर्वावर भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माचा त्रिवेणी संगम अनुभवण्याची संधी येळाकेळी येथील भाविकांना मिळणार आहे. श्री संत सयाजी महाराज विश्वशांती धाम येथे रविवार, २५ ऑक्टोबर रोजी कोजागिरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. विविध धार्मिक कार्यक्रमांनी सजणाऱ्या या महोत्सवात परिसरातील भाविकांना भक्तिरसाची अनुभूती घेता येणार आहे. महोत्सवाची सुरुवात सकाळी ८.३० ते १० वाजेपर्यंत स्फटिक ज्योतिर्लिंग अभिषेक व हवनाने होईल. सकाळी १० ते ११.३० या वेळेत सेवाग्राम येथील गुरुकृपा भजन मंडळ भक्तिगीतांचे सादरीकरण करणार आहे. सकाळी ११.३० वाजता संत सयाजी महाराज यांचे आशीर्वचन होईल. दुपारी १२ वाजता आरती झाल्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री ९ ते १२ या वेळेत कोजागिरीचा विशेष कार्यक्रम होणार आहे. शरद पौर्णिमेच्या चांदण्यात नामस्मरण,भजन आणि आध्यात्मिक वातावरणात मनःशांतीचा अनुभव घेण्यासाठी भाविक उत्सुक आहेत. या भक्तिमय सोहळ्यात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# मैदान गाजविणाऱ्या गुणवंतांचा इंडियन मिलिटरी स्कूलमध्ये गौरव

## विविध क्रीडा प्रकारांतील विजेत्यांना मेडल व पारितोषिकांचे वितरण

**पुलगाव/जनमाध्यम**

क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीच्या बळावर शाळेचा नावलौकिक वाढविणाऱ्या विद्यार्थ्यांचा इंडियन मिलिटरी स्कूल, पुलगाव येथे गुणगौरव करण्यात आला. फुटबॉल, कबड्डी, अॅथलेटिक्स, व्हॉलीबॉल आणि रन फॉर फन यांसह विविध क्रीडा प्रकारांत यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना मेडल व पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे कमांडंट कर्नल के.एच.पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य नितीन कोठे, तर प्रमुख अतिथी म्हणून पर्यवेक्षक मनोज लोटे उपस्थित होते.विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता आणि क्रीडा कौशल्याचे कौतुक करताना कर्नल पाटील यांनी आगामी शैक्षणिक वर्षात शाळेत आणखी तीन नवीन खेळांचा समावेश करण्याचे आश्वासन दिले. विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात अधिक संधी उपलब्ध करून देण्याचा शाळेचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्राचार्य नितीन कोठे यांनी खेळाडूंच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक प्रशिक्षण, क्रीडा सुविधा आणि विशेष आहार उपलब्ध करून देण्यावर भर दिला.पर्यवेक्षक मनोज लोटे यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासासोबत खेळालाही प्राधान्य देण्याचे आवाहन केले.या सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळाले.शिस्त, संघभावना, नेतृत्वगुण आणि खिलाडूवृत्ती जोपासत क्रीडा क्षेत्रात अधिक यश संपादन करण्याची प्रेरणा या कार्यक्रमातून मिळाली.



# दिवाळी तोंडावर, पण सेलू अंधारात

## पथदिव्यांच्या दुरुस्तीकडे प्रशासनाची डोळेझाक

### ठाणेदारांच्या क्वार्टरसमोरील मुख्य बाजारपेठेत दोन-तीन वर्षांपासून अंधार

**सेलू/अभय बेदमोहता**

एकीकडे शहराच्या सौंदर्यीकरणाच्या गप्पा आणि दुसरीकडे मुख्य बाजारपेठेत वर्षानुवर्षे अंधार! दिवाळीचा सण तोंडावर आला असताना सेलू शहरातील बंद पथदिव्यांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ठाणेदारांच्या क्वार्टरसमोरील मुख्य रस्त्यावरील पथदिवा दोन ते तीन वर्षांपासून बंद असल्याची तक्रार आहे. पुरातन शंकर मंदिर परिसरातील पथदिवाही दीड ते दोन वर्षांपासून बंद असल्याने नागरिक आणि भाविकांना अंधारातून मार्ग काढावा लागत आहे. प्रशासनाच्या या दुर्लक्षाबद्दल नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. श्रीराम रेडीमेडचे संचालक महेश बोकडे यांच्या दुकानासमोरील तसेच ठाणेदारांच्या क्वार्टरसमोरील पथदिवे अनेक वर्षांपासून बंद असल्याचे सांगण्यात येते. याबाबत प्रशासनाकडे वारंवार लेखी आणि तोंडी तक्रारी करूनही दखल घेतली जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. पथदिवे बसविण्यासाठी खर्च केला जातो, मग त्यांच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी कोणाची? नागरिकांच्या सुरक्षेपेक्षा प्रशासनाला आणखी कशाची प्रतीक्षा आहे, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

**पुरातन शंकर मंदिर परिसरही अंधाराच्या विळख्यात, नागरिकांचा संताप**

शहरातील प्रसिद्ध पुरातन शंकर मंदिरावरील पथदिवा वादळवाऱ्यामुळे बंद पडल्याचे सांगण्यात येते. मात्र, दीड ते दोन वर्षे उलटूनही तो सुरू करण्यात आलेला नाही. पहाटे आणि सायंकाळी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे. या परिसरात चोरी किंवा अपघात घडल्यास जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. करवसुलीसाठी तत्पर असणाऱ्या प्रशासनाला बंद पथदिवे दुरुस्त करण्यासाठी वेळ मिळत नाही का, अशी टीका नागरिकांकडून होत आहे. शहरातील इतर भागांतील बंद दिव्यांचीही तपासणी करून तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी व्यापारी आणि भाविकांनी केली आहे. दिवाळीपूर्वी सर्व बंद पथदिवे सुरू न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे. आता प्रशासन अंधार दूर करणार की नागरिकांच्या संतापाची ठिणगी आंदोलनात पडणार, याकडे लक्ष लागले आहे.



# आरोग्य केंद्र की आजारांचे माहेरघर, माणिकवाड्यात आरोग्यसेवेचा बोजवारा

## महिनाभरापासून बीपी-शुगरच्या रुग्णांची परवड, शंभर रुग्ण उपचारांविना परतल्याची माहिती

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

रुग्णांच्या वेदनांवर फुंकर घालण्याची जबाबदारी असलेले आरोग्य केंद्रच आजारी पडले असेल, तर सामान्य नागरिकांनी दाद मागायची कुणाकडे आष्टी तालुक्यातील जंगल परिसरात वसलेल्या सुमारे तीन हजार लोकसंख्येच्या माणिकवाडा गावातील आरोग्य केंद्राची दयनीय अवस्था पाहता हाच प्रश्न उपस्थित होत आहे. डॉक्टरांची कथित अनियमित उपस्थिती, औषधांचा तुटवडा आणि वीजबिलाच्या वादातून खंडित झालेला वीजपुरवठा यामुळे ग्रामीण आरोग्यसेवेचा कारभार रामभरोसे असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी केल्या आहेत.

आरोग्य केंद्राचा वीजपुरवठा वीजबिल थकल्यामुळे खंडित झाल्याची माहिती आहे. इमारतीच्या बांधकामादरम्यान कंत्राटदाराने वापरलेल्या विजेचे बिल कोणी भरायचे, यावरून वाद निर्माण झाल्याचे सांगण्यात येते. मात्र, या वादात रुग्णसेवेचे काय? संबंधित विभागांच्या वादाचा फटका सामान्य रुग्णांनी का सहन करावा, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

ग्रामस्थांच्या आरोपानुसार, डॉक्टर महिनाभरापासून नियमित उपस्थित राहत नाहीत. आरोग्य सेवक आणि परिचारिकांच्या उपलब्धतेबाबतही तक्रारी आहेत. त्यामुळे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची गैरसोय होत आहे.



विशेष म्हणजे, रक्तदाब आणि मधुमेहाच्या रुग्णांसाठी आवश्यक गोळ्यांचाही साठा संपल्याची तक्रार आहे. नियमित औषधोपचारांवर अवलंबून असलेल्या रुग्णांना औषधांविना परतावे लागत असल्याने चिंता वाढली आहे.

२२ ऑक्टोबर रोजी सुमारे शंभर रुग्ण आरोग्य केंद्रात उपचारासाठी आल्याची माहिती आहे. डॉक्टर उपस्थित नसल्यामुळे अनेकांना उपचारांविना परतावे लागल्याचे सांगण्यात येते. बीपी आणि शुगरच्या गोळ्यांसाठी आलेले प्रशांत बननगारे, हिरामण खवशी आणि कुसुम खवशी यांनाही औषधे उपलब्ध नसल्याने निराश होऊन परतावे लागल्याची माहिती आहे.

सुरेश खवशी, सामाजिक कार्यकर्ते, माणिकवाडा : माणिकवाडा येथील आरोग्य केंद्र रामभरोसे झाले आहे. महिनाभरापासून डॉक्टर नियमित उपस्थित नसल्याची परिस्थिती आहे. गावातील रुग्णांची संख्या लक्षात घेता नियमित डॉक्टर आणि आवश्यक औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध असणे गरजेचे आहे. आरोग्य विभागाने तातडीने लक्ष देऊन समस्या सोडवावी, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल.

जंगल परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाचे असलेले आरोग्य केंद्रच सुविधांअभावी अडचणीत असेल, तर ग्रामीण आरोग्यसेवेच्या दाव्यांचे काय? वरिष्ठ आरोग्य अधिकाऱ्यांनी चौकशी करून डॉक्टरांची नियमित उपस्थिती, औषधांचा पुरवठा आणि वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर N8375797 वरील माझे MOHAMMAD ZUBAIR QURAISHI असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील MOHAMMAD ZUBAIR MOHAMMAD DAWOOD QURESHI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता : वॉर्ड नं २१ महादेवपुरा वर्धा 442001**

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर U3330293 वरील माझे ROSHANI SUKE असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील ROSHANI NIRANJAN SUKE नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता : त्रिमूर्ती नगर उमरी मेघे वर्धा 442001**

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३२५**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

MAHATRANSCO

## E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (SRM e-Tender) from registered agencies on MSETCL's e-Tendering website. For further details please visit our website: **https://srmetender.mahatransco.in**

| S.No. | Tender No. & Description of Work |
|---|---|
| 1 | **Annual Maintenance Contract for servicing, repairs and maintenance of 48V, 110V & 220V DC Battery Sets & Battery Chargers at various EHV Substations under EHV (O&M) Circle, Akola for FY 2026-27. (1st Call) RFX No. 7000041925** <br> **Tender No.: MSETCL/SE/EHV/O&M/CRL/AKL/Tech/2026-27/T-18-AMC Battery Set & Charger for FY 26-27** <br> Estimated Cost = Limited to Rs. 40,00,000.00/- |

| Publicity period of tender | Tender Available at |
|---|---|
| Start Date:- From:- 23/10/2026 @ 00:00 Hrs onwards | https://srmetender.mahatransco.in |
| Submission Deadline : - | Tender Opening Date : - |
| 01/11/2026 @ up to 23:59 Hrs. | Technical Bid: Date : 02/11/2026, 11:00 Hrs, if possible. <br> Price Bid: Date : 02/11/2026, 12:00 Hrs, if possible. |

**Contact Person:** The Dy. Executive Engineer, EHV O&M Circle, AKOLA.
**Contact No.: 8554989534 (Dy. Executive Engineer), e-mail id: se1200@mahatransco.in**

1. Relevant portions of the Tender which the bidders have to fill up, would be available online on above said website.
2. **EMD amount of Rs. 40,000.00/- and Tender Fees Rs. 500 + GST** as applicable (per tender & non-refundable) should be paid on-line only. **Payment in cash/DD will not be accepted.** Bidder can pay through credit card / Debit Card/ Net Banking. The payment confirmation will be done by the Corporate Office.
3. Tender documents can be downloaded only online from above-said website.
4. Eligible bidders shall submit their bids well in advance instead of waiting till last date. MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.
5. If the payment of tender fee and EMD by a bidder is not confirmed, then the bidder will be straight-way disqualified and his bids will not be considered for further tendering process.

**Note:** All eligible & interested bidders are mandated to get enrolled on SRM e-Tendering portal. (https://srmetender.mahatransco.in/)

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV O&M CIRCLE, AKOLA**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.५१२/२०२६ — ने.ता.२६.११.२०२६

**अर्जदार :** १. **नर्मदा महादेवराव अंबाडकर,** वय ७१ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. **जयप्रकाश महादेवराव अंबाडकर,** वय ५१ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक महादेव मोतीराम अंबाडकर** यांचा **मृत्यू दि.०२/०९/२००९** रोजी रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.

त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर,चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५१२/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.२१.१०.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी व फौजदारी न्यायालय,चांदूर बाजार

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.५०२/२०२६ — ने.ता.२७.११.२०२६

**अर्जदार :** १. **अब्दुल सईद शेख लतीफ,** वय ६० वर्षे, व्यवसाय - मजुरी
२. **अब्दुल रफिक अब्दुल लतीफ,** वय ५० वर्षे, व्यवसाय - मजुरी
३. **अब्दुल शफी शेख लतीफ,** वय ४८ वर्षे, व्यवसाय - मजुरी
सर्व रा.शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक शेख लतीफ शेख वाहेद** यांचा **मृत्यू दि.०६/०९/१९९६** रोजी तसेच **मृतक बिसमिल्ला बी शेख लतीफ** यांचा **मृत्यू दि.२४/०५/२०२१** रोजी **रा.शिरजगाव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** येथे झालेला आहे.

त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर,चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५०२/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.१९.१०.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी व फौजदारी न्यायालय,चांदूर बाजार

---

# नगर परिषद कार्यालय, अचलपूर

## जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **मो.हकीम मो.शब्बीर+१, पत्ता- हिरापुरा,अचलपूर** यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.**२४** संगणक मालमत्ता क्र.**ACHA000/14175** जुना मालमत्ता क्र.**24000583 नझुल शिट नझुल, प्लॉट नं.---** ही कर आकारणी नोंदवहीनुसार **युनुस खान युसुफ खान** या नावाने असून वरील अर्जदार यांनी **मो.हकीम मो.शब्बीर+१** या नावाने (फेरफार घेण्याकरिता /नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये/क्षेत्रामध्ये/दुरुस्ती करण्याकरिता, खरेदी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक **०३.०७.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे.याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. अन्यथा या मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -
**पुर्वेस** - सरकारी रस्ता
**पश्चिमेस** - मेहमुद हैद्राबादी यांचे घर
**दक्षिणेस** - तमीजा बी यांचे घर
**उत्तरेस** - शे.सलमान यांचे घर

शिक्का — **मुख्याधिकारी, नगर परिषद, अचलपूर**

---

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे **संजय सुखदेवराव चौरपगार** यांचे वतीने सदर जाहीर सुचना देतो ती येणेप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन-मौजे- दर्यापूर,शेत सर्वे क्र.46 आणि 47/1 मधील प्लॉट क्र.43 ज्याचे एकूण क्षेत्रफळ 1678.59 चौ.फुट, तसेच 156 चौ.मीटर, ता.दर्यापूर आणि जिल्हा अमरावती.**

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **संजय सुखदेवराव चौरपगार दि.१३/१२/२०१९ रोजीचे दस्त क्र.२६४२ च्या खरेदी खतानुसार** मालकीची आहे. त्यानंतर **संजय सुखदेवराव चौरपगार** यांनी ***M/S HINDUJA LEYLAND FINANCE LTD. (HLF)*** येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, **सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ खरेदीखत दि.11/08/2011 रोजीचे दस्त क्र.2158 आणि मुळ खरेदी खत दि.12/03/2014 रोजीचे दस्त क्र.511 हे दोन्ही मूळ दस्त गहाळ झालेले आहे.** तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किंवा कुठे गहाण, पतसंस्था/राष्ट्रीयकृत/सहकारी अथवा खाजगी बॅंक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किंवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्र.वर ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या **7 दिवसांच्या** आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही, आणि सदर दोन्ही मालमत्ता हया ***M/S HINDUJA LEYLAND FINANCE LTD. (HLF)*** येथे गहाण करण्यात येईल करीता ही जाहीर सूचना देत आहे.

शिक्का

**ठिकाण- ता.दर्यापूर, जि. अमरावती**
**दि.22/10/2026**

**आपला,**
***ADVOCATE***
**रवींद्र रु.वाटाणे,**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो.नं. 9823698745**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.५०४/२०२६ — ने.ता.२७.११.२०२६

**अर्जदार :** १. **फगन बाबुलाल भलावी,** वय ६५ वर्षे, व्यवसाय - सेवानिवृत्त
२. **नंदु बाबुलाल भलावी,** वय ५८ वर्षे, व्यवसाय - मजुरी
३. **संजय बाबुलाल भलावी,** वय ५५ वर्षे, व्यवसाय - शिक्षक
४. **जगन बाबुलाल भलावी,** वय ५२ वर्षे, व्यवसाय - मजुरी
सर्व रा.देऊरवाडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक बाबुलाल मंगल भलावी** यांचा **मृत्यू दि.२८/०४/२०२४** रोजी तसेच **मृतक कमल बाबुलाल भलावी** हिचा **मृत्यू दि.१०/०६/२०२५** रोजी **रा. देऊरवाडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** येथे झालेला आहे.

यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर,चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५०४/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.१९.१०.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी व फौजदारी न्यायालय,चांदूर बाजार

---

## तहसिलदार, मोर्शी यांचे न्यायालय

**रा.मा.क्र. / ३१३/एम.आर.सी.-८१/ चि.गवळी/२०२५-२६**

## जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाव्दारे कळविण्यात येते की, प्रकरणात अर्जदार **सुवर्णा उत्तम विसाळ, रा.चिंचोळी गवळी,** रा.**मोर्शी, तिवसा, जि.अमरावती** यांचा स्वतः **जन्म दिनांक २७/०३/१९९८** रोजी **चिंचोळी गवळी** येथे झाल्याने जन्माची नोंद **ग्रामपंचायत चिंचोळी गवळी** येंथे करण्याकरिता निबंधक, ग्रा.पं. **चिंचोळी गवळी** यांना आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी सदर्हू जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसाचे** आंत आपला आक्षेप वा हरकती दाखल कराव्या, दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही व प्रकरणात पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०५/१०/२०२६

शिक्का — **सही/- तहसिलदार, मोर्शी**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१६९/२०२६
**रामकिशोर अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.१७.११.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Ramkishor Gangasahay Choudhari, Age 80 Yrs. Occu.: Nil
2. Anand Ramkishor Choudhari, Age 33 Yrs. Occu.: Service
Both R/o Jaistambh Chowk, Mahavir Marg, Navi Vasti, Badnera Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **Tarabai Ramkishor Choudhari** हे दिनांक 12.06.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **Ramkishor Gangasahay Choudhari+1** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Ramkishor Gangasahay Choudhari+1** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१४.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

---

## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र४४७/२०२६ — ने.ता.०२.११.२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती भारती संजय म्हाला, वय ५१ धंदा - गृहिणी
रा.वार्ड नं.६, आझाद चौक, करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. सौ.सुहासिनी जीवन भेगडे, वय ३५ धंदा - गृहिणी
रा.२७८, शनिवार पेठ, कुंभारवाडा रोड, ता.मावाड, जि.पुणे
३. पूजा संजय म्हाला, वय २४ धंदा - शिक्षण
रा.वार्ड नं.६, आझाद चौक, करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
४. श्रध्दा संजय म्हाला, वय २२ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.वार्ड नं.६, आझाद चौक, करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत संजय गजानन म्हाला** यांचा मृत्यू दिनांक **०१.११.२०२२** रोजी झाला. तसेच **मयत वच्छला गजानन म्हाला** हीचा मृत्यू २० वर्षापुर्वी रा.वार्ड नं.६ आझाद चौक, करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.४४७/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**२१.०९.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी व फौजदारी न्यायालय , चांदूर बाजार

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१९९८/२०२६
**फयमिदाबी अमान खान अधिक ३ -वि- निरंक**
पुढील ता.०५.११.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Faimidabi Aman Khan, Age 73 Yrs. Occu.: Housewife
R/o Near Jama Masjid, Imran Bada, Sabanpura, Amravati.
2. Naushad Khan Aman Khan Age 45 Yrs. Occu.: Business
R/o Near Jama Masjid, Imran Bada, Sabanpura, Amravati.
3. Irafan Aman Khan, Age 50 Yrs. Occu.: Business
R/o 114, Higanghat Fail, Pulgaon Camp, Wardhan Pulgaon Camp
4. Israr Khan Aman Khan, Age 42 Yrs. Occu.: Business
R/o Imam Bada Sabanpura, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Aman Khan Gaffar Khan हे दिनांक 30.05.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Faimidabi Aman Khan + 3 V/s Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Faimidabi Aman Khan + 3 V/s Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२११६/२०२६
**विजया मनोहर गुप्ता अधिक २ -वि- निरंक**
पुढील ता.२३.११.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Vijaya Manohar Gupta, Age 61 Yrs. Occu.: HouseHOLD
2. Rohit Manohar Gupta Age 35 Yrs. Occu.: Business
3. Roshan Manohar Gupta, Age 40 Yrs. Occu.: Business
All R/o Morbag Patava Chowk, Masanganj, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Malatibai Baluddin Gupta हे दिनांक 23.06.2006 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. तसेच Bhagvatibai Ramprasad Gupta ह्या दिनांक २२.०३.२००९ रोजी अमरावती येथे मयत झाल्या. अर्जदार Vijaya Manohar Gupta + 2 V/s Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Vijaya Manohar Gupta + 2 V/s Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१५.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

---

## जाहीर नोटीस

## जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, अमरावती

क्र.न.भू.-१/अपील अर्ज क्र.३०८१/२०२६ — अमरावती दिनांक ३०.०९.२०२६

प्रति,
मोहम्मद तय्यब शेख छन्नु (मयत) तर्फे
मोहम्मद नासीर वल्द मोहम्मद तय्यब
रा.हिरापुरा गेट, अचलपूर शहर, ता.अचलपूर, जि.अमरावती — **अपिलार्थी**

-- विरुध्द --

१. अब्दुल गफार अब्दुल रहेमान
२. अब्दुल मजीद अब्दुल रहेमान
३. मोहम्मद रफिक अब्दुल रहेमान
अ.नं.१ ते ३ रा.हबीब न गर, गल्ली नं.२, अमरावती
४. फरजाना बानो अल्ताफ हुसेन
रा.करमि मेडिकल, असूर्या पेट्रोल पंपाजवळ, वलगांव रोड, अमरावती
५. उप अधिक्षक भूमी अभिलेख, अचलपूर,
ता.अचलपूर, जि.अमरावती — **उत्तरार्थी**

**विषय - मौजा अचलपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती येथील शिट नं.२४बी, प्लॉट नं.१५३ चे बाबत अपिल अर्ज**
**संदर्भ - अपिलार्थी यांचा अपिल अर्ज दिनांक १३.०३.२०२६**

ज्याअर्थी अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत मौजे अचलपूर, ता.अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती येथील शिट नं.२४-बी, प्लॉट नं.१५३ चे बाबत उत्तरार्थी यांचे विरुध्द अपिल सादर केलेले आहे. परंतु उत्तरार्थी हे सुनावणी वेळी उपस्थित राहत नसल्यामुळे उत्तरार्थी यांना याद्वारे कळविण्यात येते की, दिनांक २२.१०.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायासनासमोर आपण स्वतः किंवा आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी हजर रहावे. आपण वरील तारखेस सदर अपिलकामी न्यायासनासमोर गैरहजर राहिल्यास एकतर्फी निकाल देण्यात येईल.

आज दिनांक ३०.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व शिक्क्यानिशी दिले आहे.

शिक्का — **(महेशकुमार शिंदे)** जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१६४/२०२६
**सरिका प्रविण नानोटे अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२७.११.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Sarika Pravin Nanote, Aged about 42 Yrs. Occu.: Household
2. Shantanu Pravin Nanote, Aged about 22 Yrs. Occu.: Education
3. Sarvesh Pravin Nanote, Aged about ... Yrs. Occu.: Education
Appli.No.3, is minor through his natural guardian mother i.e.Appli.No.1
All R/o Raykarmala Road, MN-1/342, Jadhav Nagar, Dhayari Pune City Vadgaon Budruk, Pune.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Pravin Dnyaneshwar Nanote हे दिनांक 14.12.2019 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Sarika Pravin Nanote + 2 V/s Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Sarika Pravin Nanote + 2 V/s Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 152/19/2026

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक — **पंचशिल चॅरिटेबल ट्रस्ट, नांदगांव पेठ जि.अमरावती**

बाबत अर्जदार - **सौ.पुष्पा राजेंद्र बागडे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - काही नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२९.०९.२०२६** रोजी दिली.

शिक्का — **अधीक्षक,(न्याय शाखा)** सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१४४/२०२६
**सुनिल रुपराव मोहोड व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२५.११.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. सुनिल रुपराव मोहोड, वय ५४ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.मार्डी रोड, संत गाडगेबाबा कॉलनी, बौध्द विहार, अमरावती
२. अनिल रुपरावजी मोहोड, वय ५२ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.बोरगांव धर्माळे, ता.जि.अमरावती
३. मालुताई अशोकराव साबळे, वय ६२ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.शिवाजी नगर शिरजगांव बंड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
४. उषा अंबादासराव इंगळे, वय ५१ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.प्लॉट नं.२८१ए रामजी आंबेडकर नगर, ८ वा मैल, अमरावती रोड, नागपूर वाडी

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मयत रुपराव दलपत मोहोड** हे दिनांक 30.05.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुनिल रुपराव मोहोडव ईतर -वि- निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुनिल रुपराव मोहोडव ईतर -वि- निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

---

# नगर परिषद कार्यालय, अचलपूर

## जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्री.जमील अहेमद खान शेरखान**, पत्ता असरफपुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२४ संगणक मालमत्ता क्र.ACHA000/30214 जुना मालमत्ता क्र. २४०००८२७ नझुल शिट क्र.२६ प्लॉट नं.३ ही कर आकारणी नोंदवहीनुसार **शेख मुमताज शेख मेहबुब ईतर १** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या श्री.जमिल अहेमदखान शेरखान नावाने फेरफार घेण्याकरीता/नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये/क्षेत्रामध्ये/दुरुस्ती करण्याकरीता (खरेदी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक **०६.१०.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -
**पुर्वेस** - रोड
**पश्चिमेस** - तुकडा नंबर ३३
**दक्षिणेस** - रोड
**उत्तरेस** - तुकडा नंबर २८ व २९

शिक्का — **मुख्याधिकारी, नगर परिषद, अचलपूर**

---

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ४८**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३रे वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२०२६/२०२६
**मनोज अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.२३.१०.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Manoj Ramprasad Hirapure, Aged 53 Yrs. Occu.: Business
R/o Mahajanpura, Amravati.
2. Sandip Ramprasad Hirapure, Age 43 Yrs. Occu.: Business
R/o Mahajanpura, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Ramprasad Ganpat Hirapure, हे दिनांक 26.12.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. तसेच Savita Ramprasad Hirapure या दिनांक २३.०४.२०१४ रोजी अमरावती येथे मयत झाल्या. अर्जदार Manoj Ramprasad Hirepure+1 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Manoj Ramprasad Hirepure+1 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०५.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२०२५/२०२६
**शशिकला लक्ष्मण हिरापुरे अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.०६.११.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Shashikala Laxman Hirepure, Aged 75 Yrs. Occu.: Housewife
R/o Mahajanpura, Amravati. Tq. Dist. Amravati.
2. Rajesh Laxmanrao Hirapure, Aged 50 Yrs. Occu.: Business
R/o Kumbharwada Budhwara, Amravati.
3. Jitesh Laxman Hirapure, Aged 49 Yrs. Occu.: Business
R/o Near Shivaji Putala, Majanpuri Gate, Amravati.
4. Sunil Laxman Hirapure, Aged 47 Yrs. Occu.: Business
R/o Mahajanpura Gate, Amravati. Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Lakshman Ganpat Hirapure हे दिनांक 25.01.2019 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Shashikala Laxman Hirapure + 3 V/s Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Shashikala Laxman Hirapure + 3 V/s Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०५.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर,३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२५१/२०२६
**मंगला -वि- निरंक**
पुढील ता.२७.११.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. मंगला नारायण सिरसिया,
वय ५७ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.यशोदा नगर नं.१, बायपास रोड, रुक्मिणी नगर, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अजय नारायण सिरसिया** हे दिनांक 03.08.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **मंगला नारायण सिरसिया** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मंगला नारायण सिरसिया** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अरुण सांगोळे यांच्या 'मी रंगले रंगी तुझ्या !' गीताचे आज प्रसारण

**अमरावती/का.प्र.**

शब्द, संगीत आणि सुरांचा त्रिवेणी संगम साधणारी, रसिकांच्या मनाचा ठाव घेणारी एक अत्यंत भावपूर्ण आणि प्रेममय कलाकृती रसिकांच्या भेटीला येत आहे. येथील प्रसिद्ध कवी गझलकार आणि गीतकार प्रा अरुण सांगोळे यांच्या भावनाप्रधान शब्दांनी नटलेले आणि प्रतिभावान संगीतकार जितेंद्र करगुटकर यांच्या सुमधुर सुरावटीने सजलेले 'मी रंगले रंगी तुझ्या !' हे नवीन मराठी गीत लवकरच संगीतप्रेमींच्या हृदयाचा ताबा घेण्यासाठी सज्ज झाले आहे. येत्या २३ आक्टोंबरला हे सुरेल गीत जितेंद्र करगुटकर ऑफिशियल ह्या युट्यूब चॅनेलवर दिमाखात प्रसारित होत आहे.

मी रंगले...मी रंगले रंगी तुझ्या, मनमोहना! तेव्हापुनी ना चैन रे माझ्या मना...या ओळींमधूनच या गीताची व्याप्ती आणि खोली लक्षात येते. कवी अरुण सांगोळे यांनी आपल्या नेहमीच्या संवेद्य काव्यमय शैलीत प्रेमाच्या एका वेगळ्याच अंगाला स्पर्श केला आहे.

'जी बासरी ओठी तुझ्या त्या बासरीचा सूर मी' या ओळी राधा कृष्णाच्या अद्वैत प्रेमाची आणि



ओढीची साक्ष देतात. अरुण सांगोळे यांनी या संपूर्ण गीतात एक अतीव ओलावा आणि जिवंतपणा आणला आहे.स्टुडिओ नाद अनाहत प्रेझेंट्सची ही निर्मिती असून सदर गीताचे ध्वनिमुद्रण बॉस स्टुडिओ, मुलुंड येथे मयंक पटेल यांनी केले. तालवाद्य वादनाची जबाबदारी सुशांत बर्वे यांनी यशस्वीपणे सांभाळली तर छायांकन दिग्दर्शन म्हणून अलंकार मिसाळ यांनी नोंद घेण्याजोगा आकर्षक असा प्रवाही व्हिडिओ तयार केला. या गाण्याला आर्थिक आणि नैतिक पाठबळ सुमंगल कन्स्ट्रक्शन्स, डोंबिवली आणि डिलाईट होमस्टे, जैतापूर यांचे लाभले.

मी रंगले रंगी तुझ्या या गाण्याला संगीतकार जितेंद्र करगुटकर यांनी आपल्या कसदार संगीताने सजवले आहे. शब्दातील भाव आणि त्या मागची आर्तता संगीताच्या प्रत्येक सुरातून अचूकपणे टिपली आहे. यातही सोनेसुखात सुगंधी भर घालण्याचे काम केले आहे ती महाराष्ट्राच्या लाडक्या आणि प्रसिद्ध गायिका धनश्री देशपांडे यांच्या सुरेल आवाजाने. आपल्या पहाडी आणि तितक्याच भावमधुर आवाजात त्यांनी या गाण्याला जो न्याय दिला आहे, तो रसिकांच्या काळजाचा ठाव घेईल यात शंका नाही, अशी प्रतिक्रिया या गाण्याचे कवी प्रा अरुण सांगोळे यांनी सदर प्रतिनिधीजवळ व्यक्त केली.

## संक्षिप्त

### 'महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२६' राजेश सावरकर यांना प्रदान

**अमरावती** - सामाजिक, शैक्षणिक, साहित्य, कला, क्रीडा आणि आरोग्य अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या



मान्यवरांचा गौरव करणाऱ्या युवा महाराष्ट्र फाऊंडेशन, पुणे या सामाजिक संस्थेच्या वतीने दिला जाणारा मानाचा 'महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२६' शिक्षण क्षेत्रासाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश दादारावजी सावरकर यांना यांना प्रदान करण्यात आला आहे.या पुरस्कारा मध्ये सन्मानपत्रक,मेडल,सन्मान चिन्ह,शाल,मानाचा फेटा बहाल करण्यात आला.फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.अविनाश सकुंडे यांच्या हे सन्मानपत्र प्रदान करण्यात आले आहे. पुरस्काराचे हे यंदाचे ८ वे वर्ष असून, महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून मान्यवरांची निवड करण्यात आली आहे.हा पुरस्कार जाहीर होताच शिक्षण क्षेत्रातून, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांकडून, मित्र परिवाराकडून आणि अमरावती जिल्ह्यातील शिक्षकांकडून राजेश सावरकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.पुरस्कार वितरण सोहळा पुणे येथे मान्यवरांच्या उपस्थितीत झाला आहे.



### किकबॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत बॉक्सिंग क्लबचे यश

**अंजनगाव बारी** - अंजनगाव बारी येथील बॉक्सिंग क्लब च्या विद्यार्थ्यांनी अमरावती जिल्हास्तरीय शालेय किकबॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत दमदार कामगिरी करत ९ सुवर्ण व ८ रौप्य पदके पटकावली. या यशामुळे क्लबच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती आणि किकबॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ अमरावती डिस्ट्रिक्ट यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल, मार्डी रोड, तपोवन गेट, अमरावती येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. १४, १७ व १९ वर्षाखालील मुले-मुली या वयोगटांत स्पर्धा पार पडली.सुवर्णपदक विजेते खेळाडू :तन्वी ठाकरे, तनीश अंबाडकर, जान्हवी गुर्जर, रिया झोंबाळे, प्रगती म्हैसकर, हिमांशू खाडे, मयंक खडसे, पवन दारोकर आणि संकेत गुर्जर.रौप्यपदक विजेते खेळाडू :नैना शेलोकार, दैवयानी बनसोड, दैवयानी खडसे, परी पकडे, अर्जुन पुनिया, कृष्णा पुनिया, तन्वी भुरे आणि अर्णवी वसुले.या स्पर्धेत अंजनगाव बारी येथील जनता विद्यालयाच्या ६ विद्यार्थ्यांसह राजेश्वरी युनियन हायस्कूलच्या १० विद्यार्थिनींनी यश संपादन केले. खेळाडूंना कोच किशोर ठाकरे, ललिता ठाकरे आणि तेजस्विनी ठाकरे यांचे मार्गदर्शन लाभले.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल क्रीडाप्रेमी, पालक व नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



### 'डिजिटल विश्वात तुमची गोपनीयता जपा' विषयावर व्याख्यान

**अमरावती**-संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान विभागाच्यावतीने 'डिजिटल विश्वात तुमची गोपनीयता जपा' या विषयावर विशेष व्याख्यान झाले. विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा, वैयक्तिक डेटा संरक्षण याविषयी जागरुकता यावी या उद्देशाने सदर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी वक्ता तथा विद्यापीठाच्या उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील यांनी ऑनलाइन सुरक्षितता, डेटा संरक्षण, डिजिटल साधनांचा सुरक्षित वापर यावर मौल्यवान मार्गदर्शन केले. तर विद्यार्थ्यांनी दैनंदिन डिजिटल जीवनातील सुरक्षेसंबंधी विविध प्रश्न विचारुन आपल्या शंकांचे निरसन केले. विभागप्रमुख डॉ. अनिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. डॉ. प्रशांत ठाकरे, प्रा. सुदर्शन कोवे, अनघा उंदीरवाडे,मैथिली उगले आदींचे कार्यक्रमासाठी योगदान लाभले.

# तीन एकरांतील केळी पिकावर फिरविला ट्रॅक्टर!

## तीन लाखांहून अधिक खर्च करूनही शेतकऱ्याच्या पदरी निराशा; पाच हजार झाडे काढली



**अंजनगाव बारी/वार्ताहर**

केळीला अपेक्षित दर मिळत नसल्याने आणि वाहतुकीचा खर्च परवडत नसल्याने हतबल झालेल्या शेतकऱ्याने तीन एकरांतील सुमारे पाच हजार केळीच्या झाडांवर ट्रॅक्टर फिरवून पीक काढून टाकले. शेतकरी रवींद्र मेटकर अंजनगाव बारी परिसरात ही घटना घडली.

मेटकर यांनी जुलै २०२५ मध्ये तीन एकर क्षेत्रावर केळीची लागवड केली होती. पाच हजार रोपांची खरेदी, लागवड, ठिबक सिंचन आणि इतर खर्च मिळून त्यांनी तीन लाख रुपयांहून अधिक भांडवल गुंतविले. मात्र, पीक तयार झाल्यानंतर व्यापाऱ्यांकडून अवघ्या चार ते पाच रुपये प्रतिकिलो दराने केळी खरेदीची तयारी दर्शविण्यात आली. त्यातच सुमारे ८८ किलोमीटर अंतरावरील बाजारपेठेत केळीची वाहतूक करण्याचा खर्च परवडत नसल्याने उत्पादन विकूनही खर्च वसूल होण्याची शक्यता मावळली. अखेर आर्थिक नुकसान सहन करत मेटकर यांनी संपूर्ण पीक काढून टाकण्याचा निर्णय घेतला.

### कमी दरामुळे केळी उत्पादक संकटात!

अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी परिसर केळी उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे. मात्र, केळीला योग्य दर मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. व्यापाऱ्यांकडून कमी दराने खरेदी होत असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप असून, बाजार समितीने हस्तक्षेप करून न्याय्य दर मिळवून द्यावा, अशी मागणी होत आहे. लाखो रुपये खर्च करून पिकविलेल्या केळीला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांवर उभे पीक उद्ध्वस्त करण्याची वेळ येणे, ही कृषी क्षेत्रातील गंभीर समस्या बनली आहे. शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या तुलनेत योग्य भाव मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



### दादासाहेब देशमुख यांना विनम्र अभिवादन!

**शिराळा**-येथील कस्तुराबाई जैन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणात स्व विनायकराव उर्फ दादासाहेब देशमुख यांच्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन करण्यात आले. सर्व प्रथम स्व विनायकराव उर्फ दादासाहेब देशमुख यांच्या पुतळ्याचे पूजन व माल्यार्पण मनोजभाऊ देशमुख यांनी केले. अभिवादन कार्यक्रमाला महाराष्ट्र शिक्षण समिती अध्यक्ष मनोजभाऊ देशमुख, अभिजित देशमुख, सोळंके, डॉ सचिन देशमुख, मुसाख्विरखा पठाण,पी.टी भस्मे, अनुप देशमुख,कुशल देशमुख, मनोज अ देशमुख, प्रविण कडु, सुरज फरतोडे,नरेश मानकर, मुकुंदराव देशमुख, विलास गायकवाड, समिर देशमुख, विजयराव देशमुख, मंगेश काळमेघ, संजय कुकडे, अभिजित न देशमुख, मनिष दहापुते वैशाली म.देशमुख,प्रतिभा म देशमुख, वैशाली देशमुख, टी.वाय. देशमुख विद्यालय पुसदा व वसंत बाबा विद्यालय देवरा येथे सुध्दा स्व विनायकराव उर्फ दादासाहेब देशमुख यांच्या जयंतीदिनी त्रिवार अभिवादन करण्यात आले यावेळी सर्व शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने शिराळा येथील कार्यक्रमाला उपस्थित होते.

# कुऱ्हा येथे मोठ्या व लहान देवीचा मिरवणूक सोहळा

**कुऱ्हा**-नवरात्र उत्सवानिमित्त कुऱ्हा येथील मोठी देवी (पिपलाज माता) व लहान देवी (शारदा माता) संस्थानच्या वतीने आयोजित धार्मिक कार्यक्रमांची सांगता नवमीच्या दिवशी पारंपरिक मिरवणूक सोहळ्याने करण्यात आली. हजारो भाविकांच्या उपस्थितीत हा सोहळा मोठ्या उत्साहात आणि शांततामय वातावरणात पार पडला. गावातील अनेक वर्षांची धार्मिक परंपरा यंदाही कायम राखण्यात आली. नगाऱ्यांचा गजर, भजन मंडळांची साथ आणि देवीच्या जयघोषाने संपूर्ण गावातील वातावरण भक्तिमय झाले होते. गावातील प्रमुख मार्गांवरून वाजतगाजत निघालेल्या या मिरवणुकीत महिला, पुरुष, युवक आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मिरवणूक लहान देवी मंदिरासमोर



पोहोचल्यानंतर मोठी देवी पिपलाज माता आणि लहान देवी शारदा माता यांचा पारंपरिक मिलन सोहळा हजारो भाविकांच्या साक्षीने पार पडला. त्यानंतर दोन्ही देवींची मिरवणूक भोगावती नदीघाटाकडे रवाना झाली. तेथे परंपरेनुसार दोन्ही देवींचे आपापल्या निर्धारित ठिकाणी विसर्जन करण्यात आले. त्यानंतर देवींचे मंदिरात पुनरागमन झाले आणि भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. या उत्सवात दोन्ही संस्थानचे अध्यक्ष, विश्वस्त, लोकप्रतिनिधी तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण मिरवणूक शांततेत पार पडावी यासाठी कुऱ्हा पोलीस स्टेशनच्या वतीने पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कुऱ्हा गावातील पिढ्यानपिढ्या चालत आलेली नवरात्र उत्सवाची परंपरा आजही श्रद्धेने जपली जात असून, यंदाचा उत्सवही भक्तिमय वातावरणात आणि शांततेत पार पडला.

# आंतरमहाविद्यालयीन महिला खो-खो स्पर्धा उत्साहात

**परतवाडा** - येथील भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांतर्गत झोन 'बी'च्या आंतरमहाविद्यालयीन महिला खो-खो स्पर्धेचे तीन दिवसीय आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या झाले. या स्पर्धेत विविध महाविद्यालयांतील एकूण १८ संघांनी सहभाग नोंदविला. अकोला येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने विजेतेपद पटकावले, तर यवतमाळ येथील एल. बी. अणे महिला महाविद्यालयाच्या संघाने उपविजेतेपद मिळविले.

या स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी भारतीय विद्या मंदिर, अमरावती संस्थेचे सदस्य तथा माजी प्राचार्य रा. भा. महाजन



आणि महाविद्यालयाचे सी.डी.सी. सदस्य प्रदीप पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. अखेर अकोला येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने विजेतेपद, तर यवतमाळ येथील एल. बी. अणे महिला महाविद्यालयाच्या संघाने उपविजेतेपद पटकावले. विजेत्या व उपविजेत्या संघांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते चषक प्रदान करून गौरविण्यात आले.स्पर्धेचा समारोप प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर, रा.भा. महाजन, सी.डी.सी. सदस्य शरद पेंढारकर तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या महिला खो-खो संघ निवड चाचणीचे अध्यक्ष प्रा. डॉ. प्रशांत गावंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या स्पर्धेचे यशस्वी संचालन महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. सतीश भागवत यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. अविनाश खानंदे, प्रा. बबूल मासोदकर आणि प्रा. डॉ. अभ्युदय सोमवंशी यांनी विशेष परिश्रम घेतले. स्पर्धेच्या आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. या स्पर्धेमुळे महिला खेळाडूंना आपले क्रीडाकौशल्य प्रदर्शित करण्यासाठी उत्तम व्यासपीठ उपलब्ध झाले.

# जिल्ह्यात भूजल पातळीत घट; चांदूर रेल्वे गंभीर श्रेणीत

**अमरावती/का.प्र.**

अमरावती जिल्ह्यातील खरीप हंगाम २०२६ च्या आढाव्यानुसार, २२ ऑक्टोबर पर्यंत मोठ्या जलप्रकल्पात ४८.४१ टक्के, मध्यम प्रकल्पांत ५८.७४ टक्के आणि लघु प्रकल्पांत ६७.१२ टक्के पाणीसाठा नोंदवण्यात आला आहे. भूजल स्थितीही चिंताजनक असल्याचे अहवालातील आकडेवारीतून दिसते. जिल्ह्यातील १४ तालुक्यांतील १३६ निरीक्षण विहिरींपैकी सप्टेंबरमध्ये ११७ विहिरींची भूजल पातळी घटली. गेल्या पाच वर्षांच्या सरासरी ५.२६ मीटरच्या तुलनेत भूजल पातळीची खोली ६.१६ मीटर झाली आहे. वरुडमध्ये ३.०५ मीटर, मोर्शीत २.४१ मीटर आणि तिवसा येथे १.२५ मीटर घट नोंदवली गेली. चांदूर बाजार आणि अचलपूरमध्ये मात्र भूजल पातळीत वाढ झाली. भूजल दुष्काळ निर्देशांकानुसार चांदूर रेल्वे गंभीर, चिखलदरा व धारणी मध्यम, तर पाच तालुके सौम्य आणि सहा तालुके सामान्य श्रेणीत आहेत. अतितीव्र श्रेणीत एकही तालुका नाही.ॲग्रिस्ट्रॅकची जिल्हा सरासरी प्रगती ८७.१५ टक्के आहे. चिखलदरा ११५.९१ टक्क्यांसह सर्वाधिक, तर अमरावती ६६.७९ टक्क्यांसह सर्वात कमी आहे. डिजिटल पीक सर्वेक्षणाची सरासरी ७५.८४ टक्के असून वरुडमध्ये ९७.३२ टक्के आणि मोर्शीत ५५.५६ टक्के प्रगती नोंदली आहे.



# मराठी भाषा विद्यापीठाच्या हिवाळी-२०२६ परीक्षेचे शुल्क माफ, दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना दिलासा

**अमरावती/का.प्र.**

शासनाच्या निर्देशानुसार हिवाळी २०२६ परीक्षेसाठी पात्र दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कातून पूर्ण सूट देण्याचा निर्णय मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूर यांनी घेतला आहे. तसेच, ज्या पात्र विद्यार्थ्यांनी यापूर्वीच परीक्षा शुल्क भरले आहे, त्यांना नियमानुसार शुल्क परत करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या या निर्णयामुळे आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

यासंदर्भात मराठी भाषा विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. सुबोध भांडारकर यांनी परीक्षा नियंत्रक डॉ. राजेश बर्डे यांना पत्र पाठवून आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. शासनाच्या



दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफीसंदर्भातील सूचना तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून प्राप्त निर्देशांच्या अनुषंगाने ही कार्यवाही करण्यात येत आहे. हिवाळी २०२६ परीक्षेसाठी शासनाच्या निकषांनुसार पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांची पात्रता तपासून त्यांना परीक्षा शुल्कातून पूर्णतः सूट देण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. याशिवाय, ज्या पात्र विद्यार्थ्यांनी यापूर्वी परीक्षा शुल्क भरले आहे, त्यांना नियमानुसार शुल्क परत करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, ज्या पात्र विद्यार्थ्यांनी अद्याप परीक्षा अर्ज भरलेला नाही, त्यांनी शासनाच्या निर्देशानुसार परीक्षा शुल्क न भरता ऑनलाइन परीक्षा अर्ज सादर करावा. अशा विद्यार्थ्यांची पात्रता तपासून आवश्यक कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर त्यांचे परीक्षा अर्ज विहित मुदतीत प्रमाणित करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. विद्यापीठ प्रशासनाने या संपूर्ण प्रक्रियेत शासनाच्या लागू अटी व निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. दुष्काळग्रस्त भागातील पात्र विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींमुळे परीक्षेपासून वंचित राहावे लागू नये, हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

## पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या

# तीन विद्यार्थ्यांची किर्लोस्कर न्यूमॅटिक कंपनीत निवड; ६.५ लाखांचे वार्षिक पॅकेज

**अमरावती/का.प्र.**

पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावती येथील यांत्रिकी अभियांत्रिकी (मेकॅनिकल इंजिनिअरिंग) विभागातील तीन विद्यार्थ्यांनी कॅम्पस प्लेसमेंटमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. प्रणव लव्हाळे, राज सोलंके आणि रिया बागडे या विद्यार्थ्यांची नामांकित किर्लोस्कर न्यूमॅटिक कंपनीमध्ये निवड झाली असून, त्यांना वार्षिक ६.५ लाख रुपयांचे (६.५ LPA) पॅकेज मिळाले आहे.

किर्लोस्कर न्यूमॅटिक कंपनी लिमिटेड ही १९५८ मध्ये स्थापन झालेली पुणे, महाराष्ट्र येथील नामांकित औद्योगिक अभियांत्रिकी कंपनी आहे. कंपनी एअर कॉम्प्रेसर, औद्योगिक रेफ्रिजरेशन, प्रोसेस गॅस सिस्टीम्स आणि मेकॅनिकल ट्रान्समिशन क्षेत्रांत कार्यरत आहे. औद्योगिक यंत्रनिर्मिती क्षेत्रातील योगदानामुळे कंपनीला विशेष ओळख मिळाली आहे.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दर्जेदार तांत्रिक शिक्षण, व्यावहारिक ज्ञान आणि रोजगाराभिमुख



प्रशिक्षण देण्याच्या प्रयत्नांना या यशामुळे प्रोत्साहन मिळाले आहे. विद्यार्थ्यांच्या मेहनतीसोबतच विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन आणि महाविद्यालयाच्या प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाचे योगदान या यशासाठी महत्त्वपूर्ण ठरले आहे.

निवड झालेल्या विद्यार्थिनींना संचालक डॉ. पी. एम. खोडके, कॉर्पोरेट रिलेशन्स डीन प्रा. मोनिका जैन, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. प्रतीक भट्टड, मेकॅनिकल विभाग प्रमुख डॉ. सोमदत्त तोंडरे व प्रा. मनीष वालेचा, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वृंद यांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील उज्ज्वल वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आज शिक्षक आमदारांच्या भाग्याचा फैसला

## -विभागातील ८१ केंद्रांवर मतदान, -बहुरंगी लढतीत मतदार संभ्रमात



**अमरावती/प्रतिनिधीः-** विधानपरिषद अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या २६ उमेदवारांच्या भवितव्याचा फैसला आज, शुक्रवारी (दि.२३) शिक्षक मतदार करणार आहेत. या मतदारसंघात एकूण ३५,८१० मतदार आहेत. महायुती व महाविकास आघाडीतील बंडखोरीनंतरही अधिकृत उमेदवारांची स्थिती मजबूत दिसत असून, प्रत्यक्ष मैदानात मात्र शिक्षक मतदार या बहुरंगी लढतीत संभ्रमात पडल्याचे चित्र आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते, काँग्रेसच्या उमेदवार आदिती पोहरे यांचे पारडे जड मानले जात आहे. अकोल्यातील पोहरे घराण्याच्या सून आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या कन्या असल्याने आदिती पोहरे यांना अमरावती व अकोला या दोन्ही जिल्ह्यांतून मोठा पाठिंबा मिळत आहे. शिवाय यवतमाळ, वाशीम आणि बुलढाणा जिल्ह्यातही त्यांचे भक्कम संघटन आहे. 'शिवाजी परिवार' आणि पोहरे कुटुंबीयांच्या अचूक नियोजनामुळे त्यांच्या प्रचाराला मोठी गती मिळाली आहे. माजी मंत्री यशोमती ठाकूर, खासदार बळवंत वानखडे, डॉ. सुनील देशमुख यांनी प्रचारात पूर्ण ताकद पणाला लावली असून, विविध शिक्षण संस्था व संघटनांचा पोहरे यांना पाठिंबा आहे. मुस्लिम शिक्षक मतदारांचा कलही त्यांच्या बाजूने दिसून येत आहे.

दुसरीकडे, विद्यमान आमदार किरण सरनाईक यांच्या ☞(पान २ वर)

### ■ अमरावतीत सर्वाधिक मतदार

शिक्षक आमदार निवडणुकीत सर्वाधिक मतदार अमरावती जिल्ह्यात असल्याने उमेदवारांचा मुख्य भर याच जिल्ह्यावर राहिला आहे. जिल्हानिहाय मतदारसंख्या पाहता अमरावती : १००९७,बुलढाणा : ९१२४, यवतमाळ : ६९३२, अकोला : ५९४२,वाशीम : ३७१५ असे एकूण मतदार : ३५,८१० आहेत. विभागातील एकूण ८१ मतदान केंद्रांवर मतदान पार पडणार आहे. ही प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी २४३ अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत, तर आणीबाणीच्या परिस्थितीसाठी ५३ अधिकारी राखीव ठेवण्यात आले आहेत. या निवडणुकीची मतमोजणी २७ ऑक्टोबर रोजी पार पडेल.

### ■ 'नुटा' ने चार उमेदवारांना दिला पाठिंबा

नागपूर युनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन म्हणजेच 'नुटा'ने या निवडणुकीत मोठे औदार्य दाखवत थेट चार उमेदवारांना उघड पाठिंबा जाहीर केला आहे. 'नुटा'ने आदिती पोहरे, डॉ. प्रशांत विघे, अविनाश बोर्डे आणि दिलीप कडू यांना पाठिंबा दिला आहे. त्यामुळे इतिहासात पहिल्यांदाच 'नुटा'ची एकगठ्ठा मते एका उमेदवाराला न मिळता विभागली जाणार आहेत. संघटनेने आपल्या सदस्यांना सद्सद्विवेकबुद्धीचा वापर करून या चारही उमेदवारांना पसंतीक्रमानुसार मतदान करण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे पहिल्या आणि दुसऱ्या पसंतीसह तिसऱ्या पसंतीची मतेही विजयात अत्यंत निर्णायक ठरणार आहेत.

# कट्टर वैरी रवी राणा - बच्चू कडू एकत्र

### शिक्षक मतदार संघ निवडणुक :



**अमरावती/प्रतिनिधीः-** राजकारणात कोणीही कायमचा वैरी नसतो आणि कोणीही कायमचा मित्र नसतो, फक्त आपले हित संबंध कायम असतात, हे तत्व सत्य मानले जाते. त्याचा प्रत्यय अनुभव जिल्ह्याच्या राजकारणातही येऊ लागला आहे. शिवसेना शिंदे गटाचे विधान परिषद सदस्य बच्चू कडू आणि युवा स्वाभिमान पक्षाचे आमदार रवी राणा हे महायुतीत असले, तरी त्यांच्यातील वैर हे सर्वश्रुत. पण, हे दोन कट्टर विरोधक आज गुरूवार २२ ऑक्टोंबर रोजी एकत्र दिसले. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या. ☞(पान २ वर)

# टाटा मिनी बस चोरीचा छडा

## जुन्या व्यवहाराच्या वादातून वाहन चोरी; चांदूर बाजारातून बस जप्त



**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकाने १२ लाख रुपये किमतीची टाटा कंपनीची मिनी बस चोरीचा गुन्हा उघडकीस आणला आहे. चांदूर बाजार येथील गोविंद प्रभू मंगल कार्यालयाजवळील पार्किंगमधून चोरीची ही बस जप्त करण्यात आली. जुन्या अपूर्ण व्यवहाराच्या कारणावरून हा प्रकार घडल्याचे तपासात समोर आले असून, या प्रकरणात दोन पुरुष आणि एका महिलेचा सहभाग असल्याची माहिती पोलिसांनी दिली.



या प्रकरणातील फिर्यादी नितीन राजेंद्र खंडार (वय ४०, रा. सारंग नगर, रहाटगाव, अमरावती) यांच्या मालकीची ३५ आसनी टाटा मिनी बस (क्र. एमएच २७/ए-९८८०) असून, तिची अंदाजे किंमत १२ लाख रुपये आहे. ही बस चालक प्रवीण ठाकरे चालवत होते. बस चांदूर बाजार नव्हे, तर अमरावतीतील विलासनगर रोड परिसरातील सहकार नगर येथील सुधीर निखरे यांच्या घराजवळ उभी केली जात होती. बसची चावीही निखरे यांच्या घरी ठेवली जात होती. १९ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास बस नेहमीच्या ठिकाणी उभी असल्याचे फिर्यादीने पाहिले होते. मात्र, २० ऑक्टोबर रोजी पहाटे ३.३० वाजताच्या सुमारास चालक प्रवीण ठाकरे यांनी फोन करून बस जागेवर नसल्याचे सांगितले. फिर्यादीने परिसरात शोध घेतला आणि सुधीर निखरे यांच्याकडे चौकशी केली. मात्र, बसबाबत कोणतीही माहिती मिळाली नाही. अखेर अज्ञात व्यक्तीने बस ☞(पान २ वर)

# आधी पत्नीची मग मित्राची हत्या

## -एकाच आरोपीकडून अमरावतीत डबल मर्डर

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील गाडगे नगर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील अबू बकर कॉलनीमध्ये एक थरारक घटना समोर आली आहे. एकाच आरोपीने पत्नी आणि आपल्या मित्राची गळा आवळून हत्या केल्याचे स्पष्ट झाले आहे. अमरावती शहरातील ही शक्यतो पहिलीच अशी घटना असल्याचे बोलले जात असून एकाच आरोपीने एकाच वेळी दोन मर्डर केले आहेत.





बुधवारी रात्री गाडगे नगर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील अबू बकर कॉलनीमध्ये एका ४५ वर्षीय विवाहित महिलेची गळा आवळून हत्या झाल्याची घटना समोर आली होती. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पती रफीउल्ला खान हफीजउल्ला खान (वय ४८, रा. अबुबकर कॉलनी, सुन्नी मशीदजवळ, अमरावती) याला ताब्यात घेतले. पोलिसांनी दिलेल्या ☞(पान २ वर)

# फटाके फोडण्यास विरोध केल्याने बाप-लेकावर प्राणघातक हल्ला

## दोघे गंभीर जखमी, शिरजगाव बंड येथील घटना

### चांदूरबाजार पोलिसांत सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**बेलोरा/प्रतिनिधीः-** चांदूरबाजार पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या शिरजगाव बंड येथे रात्रीच्या सुमारास वाढदिवसाच्या निमित्ताने चाललेल्या फटाक्यांच्या आतिषबाजीस विरोध केला असता, सात जणांच्या टोळक्याने बाप-लेकावर लोखंडी पाईपने प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अमरावती येथे उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, शिरजगाव बंड येथील साहेबराव रवाळे यांच्या मुलाचा रात्री



वाढदिवस होता. या वाढदिवसाच्या निमित्ताने रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर फटाक्यांची आतिषबाजी सुरू होती. फिर्यादी सचिन सुधाकरराव रवाळे यांनी 'एवढ्या रात्री ☞(पान २ वर)

# प्रभाग क्र.४ मधील गुंठेवारी भूखंडांचे हस्तांतरण व फेरफार नोंदी नियमित करा

## स्थायी समिती सदस्य आशिक अन्सारी यांची मागणी

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी नगर परिषद हद्दीतील विठ्ठल नगर, मातामाय मंदिर मागे, प्रभाग क्र. ०४ मधील नागरिकांनी ३५ वर्षांपूर्वी निवासी प्रयोजनासाठी गुंठेवारी पद्धतीने खरेदी केलेल्या भूखंडांच्या हस्तांतरण व फेरफार नोंदी महाराष्ट्र जमीन तुकडेबंदी व तुकडेजोड अधिनियमातील लागू सुधारित तरतुदींनुसार नियमित करण्याची मागणी नगरसेवक तथा स्थायी समिती सदस्य मो. आशिक मो. शरीफ अन्सारी यांनी केली आहे.

याबाबत त्यांनी नगराध्यक्ष अविनाश गायगोले व मुख्याधिकारी गट-अ विजय लोहकरे यांना सविस्तर निवेदन सादर केले आहे. प्रभाग क्र. ०४ मधील नागरिकांच्या वतीने देण्यात आलेल्या



या निवेदनात म्हटले आहे की, सदर भूखंडांशी संबंधित खरेदीखत, ७/१२ ☞(पान २ वर)

# चिखलदऱ्यातील टाऊन हॉलजवळ पट्टेदार वाघाचे दर्शन

**अमरावती/प्रतिनिधीः-** पर्यटन नगरी चिखलदऱ्यातील टाऊन हॉलजवळ पट्टेदार वाघाचे दर्शन झाल्याने लोकांमध्ये प्रचंड दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे सकाळी ८ ते ९ च्या दरम्यान मुख्य रस्त्यावर वाघ दिसल्याने आणि तो लोकांच्या दिशेने धावून येत असल्याची वार्ता पसरल्याने खळबळ उडाली आहे. त्यानंतर तो वाघ काळा पाणी तलावाच्या दिशेने जाताना दिसला. माहिती मिळताच, गविलगड रेंजच्या वन अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी केली. माहितीनुसार चिखलदरा येथील मध्यवर्ती भागात बुधवारी सकाळी वाघाचे दर्शन झाल्याने नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे. ज्या रस्त्यावर वाघ दिसला तेथून अप्पर प्लेटो भागातील अनेक विद्यार्थी दररोज पायी शाळेत जातात. या व्यतिरिक्त, ☞(पान २ वर)



# वडाळीत गावठी दारू हातभट्टीवर गुन्हे शाखेचा छापा

### ७५ लिटर गावठी दारू, १५० लिटर मोहमास जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात अवैधरित्या गावठी हातभट्टीची दारू तयार करून तिची विक्री करणाऱ्यांविरुद्ध गुन्हे शाखेने विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेंतर्गत फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील परिहारपुरा, वडाळी परिसरात सुरू असलेल्या गावठी दारूच्या हातभट्टीवर छापा टाकून पोलिसांनी ७५ लिटर गावठी दारू, १५० लिटर मोहमास आणि दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे इतर साहित्य असा एकूण ☞(पान २ वर)



# कॅन्सर जनजागृती अभियान शनिवारपासून

## -रविवारी निघणार भव्य जनजागृती रॅली

## -असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडियाचे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** ऑक्टोबर हा आंतरराष्ट्रीय स्तन कर्करोग जनजागृती महिना म्हणून देशभरात साजरा केला जात आहे. या निमित्ताने असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडियाच्या वतीने शनिवार २४ व रविवार २५ ऑक्टोबर रोजी स्तन कर्करोग जनजागृतीसाठी दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त रविवार २५ ऑक्टोबर रोजी भव्य जनजागृती रॅली हॉटेल मैफिल इन येथून निघणार आणि सांस्कृतिक भवनमध्ये समापन



होणार असल्याची माहिती आज गुरुवार २२ ऑक्टोंबर रोजी पत्रकार परिषदेत आयोजकांनी दिली.

त्यांनी सांगितले की, शनिवार २४ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३० ते दुपारी ८.३० वाजे पर्यंत हॉटेल ग्रँड महफिलच्या रुबी हॉलमध्ये मार्गदर्शन कार्यक्रम होणार आहे. पहिल्या सेशनमध्ये प्रसिद्ध तज्ज्ञ डॉ. चिंतामणी, डॉ. सिद्धार्थ दुबाशी, डॉ. गिरीश जाखोटे, डॉ. दिलीप गुप्ता, डॉ. दिशा जहागिरदार, डॉ. अनिल डोकर, दुसऱ्या सेशन मध्ये अमोल देशपांडे, डॉ. प्राची महाजन, डॉ. जयश्री इंगोले,तिसरे सेशन डॉ. ☞(पान २ वर)

# बडनेरा झिरी मंदिरातून चांदीचा मुकुट, छत्र, गदा लंपास

### -मध्यरात्री चोरट्यांचा धुमाकूळ

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा येथील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री झिरी मंदिरात मध्यरात्री मोठी चोरी झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. अज्ञात चोरट्यांनी मंदिरातून सुमारे १० किलो चांदीचा ऐवज लंपास केला आहे. या घटनेमुळे भाविकांमध्ये संताप आणि भीतीचे वातावरण पसरले आहे. माहिती नुसार



बडनेरा येथील झिरी परिसराती प्रभू श्रीरामाचे प्रसिद्ध मंदिर आहे. बुधवार २१ ऑक्टोबरच्या मध्यरात्री मंदिराचे चौकीदार महादेवराव जाधव हे कामावर गैरहजर होते. याचाच फायदा घेत चोरट्यांनी मंदिराला लक्ष्य केले.चोरट्यांनी आधी मंदिराच्या छोट्या गेटचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला.आत प्रवेश केल्यानंतर चोरट्यांनी पुरावा नष्ट करण्यासाठी मंदिरातील सीसीटीव्ही यंत्रणा बंद केली. त्यानंतर☞(पान २ वर)

# खाण-क्रशर संघाच्या पदाधिकाऱ्यांकडूनच सदस्यांच्या व्यवसायाची 'पोलखोल'!

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** खदान आणि क्रशर व्यवसायातील कथित अनियमिततांवर कारवाईची मागणी करणारे निवेदन खाण व क्रशर उद्योजक संघानेच दिल्याने जिल्ह्यातील खदानधारकांमध्ये खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, ज्या संघटनेचे सदस्य म्हणून अनेक उद्योजक काम करतात, त्याच संघटनेच्या निवेदनातून सदस्यांच्या व्यवसायातील नियमपालनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. सहा मीटर खोलीच्या अटीचे उल्लंघन, ब्लास्टिंगसाठी आवश्यक परवानग्यांचा मुद्दा आणि विनापास गौणखनिज वाहतुकीच्या तक्रारींमुळे खाण व्यवसायातील अंतर्गत मतभेदही आता चव्हाट्यावर येऊ लागले आहेत.

गुरुवारी 'अवैध उत्खननाविरोधात खाण व क्रशर असोसिएशनने थोपटले दंड' या मथळ्याखाली प्रसिद्ध झालेल्या वृत्तानंतर खाण-क्रशर व्यावसायिकांमध्ये या प्रकरणाची जोरदार चर्चा सुरू झाली. संघटनेच्या निवेदनातून नेमक्या कोणत्या खदानधारकांच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित केले गेले, तक्रारीमागील भूमिका काय होती आणि संपूर्ण व्यवसायाला संशयाच्या भोवऱ्यात ओढण्याची वेळ का आली, असे प्रश्न उपस्थित होत आहेत. या तक्रारीची माहिती संघटनेतील काही पदाधिकाऱ्यांनाही वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर समजल्याची चर्चा असून, त्यामुळे संघटनेच्या अंतर्गत कार्यपद्धतीवरही प्रश्न निर्माण झाले आहेत.

**सहा मीटरची अट; मग ३० मीटर खोलीपर्यंत उत्खनन कसे?-** तात्पुरत्या परवान्याच्या आधारे सुरू☞(पान २ वर)

### -सहा मीटरच्या अटीचा भंग,

### ब्लास्टिंग परवानगीवर प्रश्नचिन्ह -जिल्हाधिकाऱ्यांच्या चौकशी आदेशाचे पुढे काय?

### -दोन महिने उलटूनही अहवालाची माहिती गुलदस्त्यात

### -महसूल यंत्रणेच्या भूमिकेवर संशय


जनमाध्यम

अवैध उत्खननाविरोधात खाण-क्रशर असोसिएशननेच थोपटले दंड!

खदानधारकांच्या बेकायदा ब्लास्टिंगचा मुद्दा ऐरणीवर

### ■ जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश; दोन महिन्यांनंतरही अहवाल कुठे?

या प्रकरणात जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी संबंधित उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील खदानींची तपासणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिल्याचे समोर आले होते. मात्र, या चौकशी आदेशाला दोन महिने उलटूनही संबंधित अधिकाऱ्यांनी कोणता अहवाल सादर केला, तपासणी पूर्ण झाली का आणि नियमभंग आढळलेल्या खदानींबाबत काय कारवाई करण्यात आली, याची माहिती उपलब्ध होऊ शकलेली नाही.चौकशीचे आदेश काढणे आणि त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशांनंतरही तपासणीचा निष्कर्ष समोर येत नसेल, तर या प्रकरणाचा पाठपुरावा नेमका कुठपर्यंत झाला, याचे उत्तर प्रशासनाने देण्याची गरज आहे. महसूल आणि खनिकर्म विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेने तपासणी केली असल्यास तिचा अहवाल सार्वजनिक होणार का, तसेच कारवाई झाली असल्यास त्याचा तपशील काय, हे प्रश्न अनुत्तरित आहेत.